नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास


राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

मूल्य १ रुपया

युगवाणी



नाना जोग

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

२६ वे विदर्भ साहित्य संमेलन, काटोल

१. सर्व सभासदांना सूचित करण्यात येते की, शुक्रवार दि. १६ व शनिवार दि. १७ सप्टेंबर १९६६ रोजी २६ वे विदर्भ साहित्य संमेलन **काटोल** येथे भरणार आहे. महाराष्ट्र राज्याचे **मुख्यमंत्री माननीय श्री. वसंतरावजी नाईक** हे शुक्रवार दि. १६ सप्टेंबर ६६ रोजी सायं. ६ वाजता संमेलनाचे उद्घाटन करणार असून मराठी वाङ्मयाचे थोर अभ्यासक आणि सुप्रसिद्ध साहित्यिक **प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे** संमेलनाध्यक्षपद मंडित करणार आहेत. सर्व सभासदांनी संमेलनास उपस्थित राहावे, ही विनंती.

२. संमेलनापुढे मांडावयाचे ठराव घटना नियम १८ (इ) प्रमाणे १४ दिवस अगोदर सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ या पत्त्यावर पाठवावेत.

३. संमेलनप्रसंगी शनिवार दि. १७ सप्टेंबर १९६६ रोजी सकाळी ९ वाजता काटोल येथे संमेलनाच्या जागेत **साधारण सभा** भरेल. सभेपुढे पुढील विषय राहतील.

१. मागील सभेचा अहवाल.

२. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

गणपूर्तीच्या अभावी सभा स्थगित झाल्यास ती त्याच ठिकाणी त्याच दिवशी अर्ध्या तासाने भरेल.

नागपूर
दि. २९ ऑगस्ट १९६६

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस,
वि. सा. संघ, नागपूर

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ–पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक :
मा. नी. गलगलीकर

वर्ष २१] सप्टेंबर १९६६ [अंक ५

सूक्ति–धन

" जगात कोण अजरामर आहे ! आपण सगळेच मरणार आहोत ! (उसळून) —पण प्रथम भीष्माचार्यांचाच बळी पडला—मगच दुःशासन, दुर्योधन मेले ! जास्तीत जास्त जगण्याची प्रत्येकाला इच्छा असते, तशी मलाही आहे ! मलाही, होता होईल तो मरण येऊ नये म्हणून मीही धडपडत असतो ! घरात–घराबाहेर, जमिनीवर—आभाळात, माणसाकडून–पशूकडून, शस्त्रांनी–अस्त्रांनी, दिवसा–रात्री, केव्हाही–कसंही मरण येऊ नये म्हणून मीही देवांवर दबाव टाकतो ! एका पळाचा अवधी मिळाला तर कुठल्याही पेचप्रसंगांतून निसटण्याचा मीही बंदोबस्त करतोच ! बस् एक पळ–जस्ट अ मिनिट् !—एक पळ मला पळायला पुरतं ! (लगेच वास्तवतेची आठवण झाल्यासारखा एकदम गंभीर होऊन) पण इतकंही करून, माझ्या साऱ्या बंदोबस्तावर मात करणारा अखेरचा एक ऐतिहासिक पेचप्रसंग येईलच ! त्या प्रसंगी, उंबरठ्यात मला मारणारी शक्ती माझ्यासमोर उभी होईल ! —महादेवासारख्या, हलाहल पचवणाऱ्या, उघड्यावर, थंडीवाऱ्यात राहणाऱ्या, व्यसनी, अर्धनग्न,—ज्यांना आपण नंगे म्हणतो !—अशा नंग्या माणसातली माणुसकी, सिंहासारखं पाशवी साहस, आणि निसर्गासारखा निर्घृण न्याय, एका तिन्ही सांजेच्या वेळी एकत्रित होऊन नरसिंहासारखा जागृत होईल, त्याक्षणी माझा सोन्याचा खांब दुभंगून पडेल आणि उंबरठ्यात माझ्या विशाल उदराला नख लावून माझी आतडी बाहेर येतील ! (पुन्हा जोराने उसळून) पण तुम्ही !—सोन्यावर आधारलेल्या साऱ्या संस्थांतून निसटून, स्वतःपुरते सदेह स्वर्गारोहण करण्यासाठी हपापलेले तुम्ही !—जाता जाता, आपल्या असत्यावर स्वाक्षरी करण्यासाठी, तुमचा अंगठा त्या सत्यसृष्टीत सोडून जाल !—तुमचा दुर्विलास—तुमची ट्रॅजेडी ही आहे !

—नाना जोग
(सोन्याचे देव)

कविता—

कंटाळा

दूरवर पहावे तर, ओसाडच ओसाड आर्त हाकांचे गडद पडसाद
हुरहुरी सारखी वळणे घेत, क्षितिजाशी चमकत नदीची रेघ
दिशा उदास, आभाळ भकास रितेपण भरून अंतरंगात
डोळे मिटून सूर्य नुसता विझल्या जिद्दीसारखा निपचीत
कर्णकर्कश कर्णा वाजवीत, मनात मळभळ धूर भरीत
मधेच येते मालगाडी, सुस्तपणे स्वत:स रेटीत
सारे रिकामे डबे तिचे, 'खडखड–खडखड' खडखडतात
चोवीस तास नंतर मनात.

एकेक युग, श्वासांचे आवर्तन प्रत्येकच, रात्रंदिवस
ज्यातून उलगडतात निरर्थकाचे हळुवार सारे पदर.

—प्रभाकर पुरुषोत्तम सिरास

येई हस्ता

वारे वारे वारे वारे
वारे वारे वारे वा.
निळे ढग काळे झाले,
काळे ढग निळे गा !

आले आले कोण आले ?
एक काळा, थोर हत्ती.
थेंब आले थेंब आले;
त्याच्या झूलेतील मोती !

येई हस्ता, शुभ्रदंता,
पर्जन्यरूपा, अनंता !
जिरव माझी सर्व मस्ती;
मला वाटे मी नियंता !

—म. म. देशपांडे

का मी असे समजले ?

तुझ्या स्वप्नाळु डोळ्यातली ओसंडती धुंदी
माझ्या इवलाल्या पाऊलावर रंगवून गेली
लाल चुटूक मेंदी...तुझ्या अस्पष्ट तानेची
एक लेकर...कसे सांगु ? प्रीत तुझी
बोलून गेली कानात
तुझा ओझरता स्पर्श.. वीज बनला देह माझा
क्षणात गेला लवलवून
पण—
उगाचच घातली होतीस शीळ तू
अन्...वेडे पाखरू आसावले
तुझ्या मनात काहीच नव्हते
मग का मी असे समजले

—आशा लिमये

वाटा हरवलल्या

प्राणाभोवती गरगरणारी अंधाराची चक्रे
तसाच कोसळणारा पाऊस बर्फाचा
हिमवर्ण फुले मातीत गळणारी
सुतक घेऊन बसलेल्या फांद्या
अंधाराच्या कुशीत
हृदय दुभंगून टाकणारा प्रचंड आवाज
कोसळणारे कडे दु:खाचे
दुथडी भरून वाहणारे रक्त
मेलेल्या उरातून
चढण अतिशय बिकट
दिशाच दिसू नये असे घनदाट धुके
डोळ्यातून रक्तात शिरणारे
वाटा हरवलेल्या
पाय बर्फ होऊन पडलेले.

—कुसुमानंद

अिथे तर सारी वाळूच तापलेली !

रखरखलेल्या वाळवंटासारखे उसासणारे आयुष्य
ऊसाच्या चिपाडागत जीर्ण देह
काळीज पोखरून निघालेले
स्वप्नांच्या दूरवर उडत जाणाऱ्या विद्रुप चिंध्या
आपलेच हाल आपल्या डोळ्यांनी पाहणे
सारखी वाढत असते रक्तातली आग
धमन्या तडकून जातील कदाचित
मेंदू असंबद्ध विचारांचे गोदाम
युगांपासूनचे दुःख पाठीशी चिकटलेले
आर्ततेने व्यापुन टाकलेले उजाड काळीज
आणि भोवतीच्या साऱ्या दिशा
जुने पक्षी दूर उडून गेलेले
मी एकाकी, एकला
तहानेने व्याकुळ
नद्या वाहतात भरून
पण ओठ फाटलेले
पत्रे खरी असतात का ?
क्षणिक भावनांचा उमाळा
भविष्याचा दावला जातो गळा
धावणे...सारखे धावणे...ऊर फाटेपर्यंत
कळा उठताहेत उरात आणि साऱ्या रक्तात
प्रत्येकजण कोंडलेला आपल्या घरात
वाटेला अंत नाही तसा माझ्या दुःखाला
मेलेल्या कुत्र्याच्या तंगडीला दोरी बांधून
न्यावे फरफटत
तसे नियती ओढत आहे मला जिवंतपणी
कुत्र्यापेक्षाहि हलके माझे जिणे
आग...तेजाबाची आग
कुठल्या समुद्रात बुडवू मी मला ?
इथे तर सारी वाळूच तापलेली !

—कुसुमानंद

एक कोच—

एक कोच—
मूर्तिमंत निःस्संकोच.

नत टेबल,
व्यवसायी अति 'स्टेबल्.'

निच स्टूल,
उचलावे कुणिहि मूल.

नच खुंटी,
देह, शीर्ष 'सबकुछ' ती.

निष्प्रमांग,
निद्रानाशे, पलंग.

स्त्री– खुर्ची
नित्य नव्या फॅशनची.

जाळी, साक्ष
फाजिल चौकस गवाक्ष.

धर्मद्वार
क्षणिक भेट विरह फार

आत मनुज,
विसंवादि शैथिल्यच

—शरद काळे

अंतरीची आस

विसावले मन
देवा तुझे पायी
अंतरीची आस...पूर्ण करी

नाम संकीर्तन
घडो या श्रवणी
होऊ दे उन्मनी...अवस्था ही

विठ्ठल निनादो
टाळ मृदंगात
गर्जो राऊळात...नाम तुझे

—कुसुम जामदार

प्रवासी

पडक्या घरात जमले कोणी तिघे प्रवासी
केला विचित्र सौदा त्यांनी परस्परांशी

त्यातील एक मागे तिरळा, कुटील डोळा
नजरेमधुन आला कामांध सर्प काळा

दुसरा मनात हासे फाडून स्वच्छ सदरा
दोन्ही करात आला त्याच्या दुरून वारा

तिसरा म्हणे इथे मी राहीन एक रात
भितीतल्या मुलीला होतील पुत्र सात

तिकडे रडेल 'तो' मग घेऊन 'तो' उराशी
तो पान थुंकूनिया येईल उंबऱ्याशी

डोळ्यात बोट तिचिया हलकेच काजळाचे
पंखावरी तरंगे ते रान पैंजणांचे

टोपीस सावरून दुसरा बने पुढारी
रे ! फेडली कधी का ? तुम्ही तिची उधारी

पहिला म्हणे स्वतःशी मी रक्त ओकलो रे
ही शुद्ध प्राणगंगा प्राशून घ्या तुम्ही रे

भितीतल्या मुलीने फेकून आग तप्त
ती बोलली तयांना जाळाल पुत्र सात

मग पाळणा तयांनी बांधून उंच केला
दोरी कुणी धरावी त्यांच्यात वाद झाला

नव्हतोच मी घसरलो भितीस तू बिलगला
हलकेच भित खचली अन् कावळा उडाला

गेले तिघे प्रवासी सोडून त्या घराला

—सुधाकर देशमुख

अनुक्रमणिका

घर

—शशिकान्त नारायण केळकर

ते घर.

त्या घरात सहा माणसं रहातात. एक : म्हातारी आजी, वय वर्षे सत्तर. दोन : वडील, वय वर्षे पंचेचाळीस. तीन : तरुण मुलगा, वय वर्षे अठरा. चार तरुण मुलगी, वय वर्षे सोळा. पाच : आई, वय वर्षे चाळीस. सहा : लहान मूल, वय नऊ महिने.

ती सगळी माणसं एकमेकांच्या द्वेषाने सारखी धगधगत असतात.

पूर्वी पूर्वी ते नऊ महिन्यांचं चिमुकलं मूल झुलणाऱ्या पाळण्यात अगदी शांत गोड हसऱ्या चेहऱ्याने निजलेलं असायचं. कधी कधी ते त्याच्यावर लोंबकळणाऱ्या रंगीबेरंगी लाकडी चिमणीकडे पाहून आपल्या छोट्या छोट्या हातांनी टाळ्या वाजवून मनसोक्त हसायचं. नाहीतर हातातला खुळखुळा पाळण्याच्या बाजूवर आपटत ट्याहा, ट्याहा करीत रहायचं. तर कधी कधी ते प्लॅस्टीकच्या रेशमी कपडे घातलेल्या सोनेरी पिंगट केसांच्या बाहुलीला छातीजवळ धरून अर्थ नसलेल्या स्वरांनी कुजबुजत राहायचं. तेव्हा ते अगदी निर्व्याज, स्वच्छ होतं. तेव्हा त्याला आजीच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्यांच्या खरखरीत जाळ्यावरून हात फिरवताना, तिचा कापरा आवाज ऐकताना खूप गम्मत वाटायची. आईच्या पदराखाली गोल आकाराच्या मऊ उबदार स्पर्शाच्या धुंदीत ते झोपी जायचं. वडलांच्या डोळ्यातून ओसंडणाऱ्या स्निग्ध भावात ते स्वतःला विसरून जायचं. वहिणीच्या उमलत्या छातीच्या धपापत्या उबेनं ते उल्हसित व्हायचं आणि भावाच्या खरपूस होणाऱ्या चेहेऱ्याकडे व त्याच्या हनुवटीवर उगवणाऱ्या कोवळ्या दाढीकडे ते कुतुहलान पाह्यचं.

पण तेव्हा त्या मुलाबद्दल घरात कुणालाच आपुलकी वाटत नसे. कारण ते घर ज्या एका द्वेषाच्या भावनेनी धुमसत होतं, त्या घरातली माणसं ज्या एका सुडाच्या भावनेच्या धाग्यांनी बांधल्या गेली होती, तो धागा अजून त्या मुलापर्यंत पोचला नव्हता. म्हणून की काय त्या माणसांचं त्या मुलाशी वागणं अत्यंत विसंवादी होतं.

आई त्याला सारखं सारखं पाळण्यातून उचलून आपल्या मांडीवर घेऊन पदराखाली गुदमरून टाकी. मग हळूहळू त्या मुलाला पदराखालच्या काळोखाचं, दोन गोल मऊ आकारांचं, त्यांच्या काळसर लाल पैशाएवढ्या तोंडाचं भय वाटू लागलं. वडील त्याला उघड्या अंगानं जवळ घेऊन त्याचे एकावर एक मुके घ्यायचे. पुढे पुढे त्याला त्यांच्या घामट त्वचेची, पांढुरक्या केसाची, दाढीच्या खरखरीतपणाची शिसारी येऊ लागली. आजीजवळ असताना त्याला वाटायचं की ते थरथरणाऱ्या सुरकुत्यांचं जाळं हळूहळू त्याच्या भोवती विणल्या जाणार आहे आणि मग आजोसारखाच, कंपित आवाज घेऊन, तोही खोलीच्या एका कोपऱ्यात जगाच्या अंतापर्यंत रेंगाळणार आहे. बहीण जेव्हा प्रेमाच्या मिषानं त्याला छातीजवळ जास्त दाबायची तेव्हा त्याला तिच्या अमर्याद वासनेची किळस यायची आणि भाऊ जेव्हा जातायेता त्याच्या पाळण्याला राक्षसी झोके द्यायचा, त्याच्या हातातली पिंगट केसांची देखणी बाहुली हिसकावून रडणाऱ्या त्याच्याकडे पाह्यचा आणि खदाखदा हसायचा, त्याचे

गाल सुस्करायचा तेव्हा त्याला त्याची भयंकर चीड यायची.

आणि मग हळूहळू त्याही मुलाला त्या सगळ्या माणसांचा द्वेष वाटू लागला. त्या सगळ्यांना बांधणारी तिरस्काराची, शत्रुत्वाची भावना त्याच्यातूनही ओवल्या जाऊ लागली. त्याच्यामुळे त्या घरातील तुटलेले द्वेषाचे वर्तुळ त्यानेच पूर्ण केले.

आता ते मूल, आई त्याला घ्यायला त्याच्यावर ओणवली म्हणजे आकांडतांडव करीत असे, तिच्या पदराखाली चाळवाचाळव करीत असे. वडील मुले घ्यायला सरसावले की त्यांच्या नाकाडोळ्यात बोटे घालीत असे. आजीने त्याला जवळ घेतले की तिच्या गळ्याला घट्ट मिठी मारीत असे मग आजी अगदी घाबरीघुबरी होऊन, कशीबशी त्याची मिठी सोडवून बऱ्याच वेळ तोंड उघडं टाकून धापा टाकीत बसे. बहिणीने त्याला छातीशी कवटाळले की ते तिचे केस ओढीत असे व भाऊ जवळ आला की भोकांड पसरून हातपाय झाडीत असे.

त्या घरातील म्हाताऱ्या आजीला वर्षानुवर्षे कापरे, बोवडे शब्द बोलून, थरथरत राहून आणि खरखरीत सुरकुत्यांच्या जाळ्याची गुंतागुंत अधिकाधिक वाढवून अगदी उबग आला होता. धुगधुगी ठेवण्यापुरतं तेवढं रक्त तिच्या पांढुरक्या कातडीवर वटवटीत वाटणाऱ्या जाड हिरव्या निळ्या शिरांतून वहात होतं. भूमितीमध्ये बिन्दूला जसं केवळ नावाला अस्तित्व असतं पण लांबी, रुंदी, जाडी काहीच नसतं तसलं केवळ नावाचंच निरर्थक निर्विकार अस्तित्व बाळगून ती अगदी वैतागली होती. प्रत्येक क्षणाला ती माणसं, ते घर व ते अस्तित्व टाकून देण्याची तिची इच्छा जास्तजास्त उफाळत होती आणि प्रत्येक क्षणाला होणाऱ्या निराशेबरोबर तिचा त्या घराबद्दलचा, त्या माणसांबद्दलचा द्वेष वाढत होता, फोफावत होता.

वडलांना त्यांच्या बायकोची—म्हणजे आईची—त्यांच्या तरुण मुलाची, तरुण मुलीची, म्हाताऱ्या आईची—म्हणजे आजीची—आणि त्या एवढ्याशा लहान मुलाचीसुद्धा चीड येत असे. ह्या सगळ्यांचं ओझं त्यांनी का म्हणून वाहायचं? निदान त्यांच्या म्हाताऱ्या आजीने तरी इतकं रेंगाळायचं कारण काय? काळाबरोबरच्या झटापटीत झालेल्या हजारो जखमांसारख्या वाटणाऱ्या सुरकुत्यांसकट ती काळाच्या उदरातच का गडप होत नाही? त्यांच्या बायकोलासुद्धा दुर्मुखलेल्या चेहेऱ्यात सकाळसंध्याकाळ त्यांच्या पोटाला व रात्री त्यांच्या वासनेला खाद्य पुरविण्याशिवाय दुसरं काही करता येऊ नये काय? की आणखी काही कुणी करायचंच नसतं? हा हळूहळू काळसर हनुवटी होणारा मुलगा दिवसरात्र जळफळत, शिव्या देत असतो. एवढं पेटायचं कारण काय? त्यापेक्षा घर सोडून का जात नाही? आणि या तरुण मुलीच्या टपोऱ्या वक्षांचा अर्थ तिचं लवकरच लग्न करायला हवं एवढाच घ्यायचा का? तिचं तरी लक्ष घरात लागतं आहे का? नजर तर सारखी घराबाहेर भिरभिरत असते आणि घरात वेंधळ्यासारखी वागते. शेवटी ह्या एवढ्याशा पोरानंसुद्धा प्रेमानं जवळ घेतलं असता नाकाडोळ्यातच बोट घालावं ना? 'अरे, खस्ता खाऊन मी तुम्हाला जगवतो आहे मग तुम्ही अशी माझ्याशी सात जन्माचं वैर असल्यासारखी दुर्मुखलेली, मडकलेली, चिडलेली का असता? मग माझ्यावर रेलून रहाता तरी कशाला?' या विचारांमुळं त्यांचं हृदय प्रत्येक वेळी जळून खाक व्हायचं. त्यांना वाटायचं की त्यांच्या मस्तकावरून एखादी आगगाडी धडधडत जावी व त्याचे त्या घराशी, माणसाशी असलेले संबंध धारदार सुरीने कापल्यासारखे अगदी पूर्ण करून जावेत. ते स्वत: अगदी मोकळे स्वतंत्र व्हावेत.

हनुवटीवर हळूहळू उगवणाऱ्या कोवळ्या दाढीबरोबरच त्या तरुणाच्या डोळ्यात लालसर रंगाचा जगाबद्दलचा त्वेष साचत होता. गुद्दागुद्दीत एक सॉलीड पंच लगावून एखाद्याचे दात पाडावेत तशा त्याच्या भावना, त्याच्या वासना, त्याचा उन्माद समाज ढासळून टाकीत होता. कुत्र्यासमोर शिळ्या भाकरीचा घाणीने लडबडलेला पैशाएवढा तुकडा फेकावा तशी त्याच्या अमर्याद उचंबळत्या उन्मादापुढे लग्न, नोकरी, पगार वगैरे भिकारडी सक्तीची आमिषे समोर केल्या जात होती. हिंस्र स्वैर सिंहाला फटके मारून, पिंजऱ्यात कोंडून गोगलगाय बनविणाऱ्या रिंगमास्टरसारखा समाज त्याला गुळगुळीत, वीर्यहीन बनवीत होता, त्याच्या महत्वाकांक्षा, त्याची क्षितिजाचा वेध घेणारी नजर छाटून टाकत होता. आणि तो अगदी असहाय केविलवाणा होत होता. उरात नुसता डोंब उसळत होता पण ती पोलादी कोंडी फोडण्याचा मार्ग त्याला

सापडत नव्हता. संवेदनाशक्ती तीव्र असल्याने त्याला सर्वमान्य जीवनाच्या साच्यात थंडपणे व मूर्खपणे स्वत:ला ढकलून स्वस्थ जगणेही अशक्य होते. त्यामुळं मग तो चेकाळत होता. असलं निरर्थक, निर्जीव अस्तित्व वहाल करणाऱ्या आईबापांवर उलटत होता. त्यांचा शक्य तेवढा सूड घेत होता. त्यांना त्रास देऊन, वाटेल तशा शिव्या देऊन—त्यांना जास्तीत जास्त जखमा होतील—वेदना होतील असलं वर्तन करीत होता.

आणि ती तारुण्यात येणारी मुलगी ? उमलणाऱ्या छातीच्या कुतुहलावरोवर आणि वयावरोवर वाढणाऱ्या एका विचित्र हुरहुरीवरोवर आयुष्याच्या रटाळपणाची, पांचटपणाची धास्तीही आपल्या मनात बाळगत होती का ? जगात तिला भेटणाऱ्या हनुवटीवर कोवळी लव वाढत असलेल्या तिच्या भावासारख्या तरुणावद्दल तिला वाटणाऱ्या बेभान आकर्षणावरोवर त्याच्या डोळ्यातील वैफल्याची गडद छाया असलेला लालसर रंगाचा त्वेष तिला कोळपून टाकीत होता काय? तिच्या तशाच एखाद्या तरुणावरोवरच्या संसाराच्या हळुवार अस्फुट कल्पना घराच्या चार भिंतीआड छपराच्या दवावाखाली चिरडल्या जाईल याची मन आणि आयुष्यही पोखरणारी विषारी जाणीव तिला झाली असेल का ? म्हणूनच ती अशी आयुष्याच्या उंवरठ्यावर थवकल्यासारखी दिसते म्हणूनच ती मूर्खपणे वासनेच्या क्षुद्र विटक्या भावनेला लोंवकळत थोडा वेळ तरी का होईना पण वेहोषी धुंदीत झुलण्याचा प्रयत्न करते. आयुष्याच्या सरपटणाऱ्या काळामध्ये यौवनाचे काही क्षणच वेहोषीचे असतात ते ती जास्तीत जास्त चघळून चघळून उपभोगण्याचा प्रयत्न करणार असते. कारण त्यानंतर बाकी उरलेलं असतं ते फक्त ती पहात असलेली निमूटपणे अंगावर जागोजाग थुंकी झेलणारं आईचं व थरथरणाऱ्या सुरकुत्यांच्या गुंतावळचात गुदमरणारं आजीचं आयुष्य. पण तिला तेवढसं यौवनसुद्धा स्वैरपणे उपभोगता येणं शक्य नसतं. त्यात तिच्या वाकीच्या माणसांचं अस्तित्व मोडता घालीत असतं, तिला वांधत असतं, अडवत असतं आणि म्हणून ती त्यांचा तिरकार करीत असते. त्या घराचा द्वेष करीत असते. त्या घरातून त्या माणसांतून पळून जावं असं तिला वाटत असतं.

खोलीच्या कोपऱ्यात काळोखात वसलेल्या आपल्या सासूसारखंच आपणही जगाच्या एका काळोख्या कोपऱ्यात आणखी अशाच चार माणसांसह अडगळीसारखे जगाच्या अंतापर्यंत पडून रहाणार आहोत व येथून आपली कधीच सुटका होणार नाही अशी आईची खात्री होती म्हणून ती त्या घरात कोणत्याच गोष्टीला विरोध करण्याचे धारिष्ट्य दाखवित नसे. स्वत: जळफळत का होईना पण ती त्या सगळ्या धगधगत्या माणसांना शांत ठेवण्याचा प्रयत्न करीत असे. पहाटेपासून मध्यरात्रीपर्यंत जीवापाड कष्ट उपसत असे. पण ती माणसं कधीच शांत होत नसत उलट सापासारखी जास्त जास्त फुसफुसत असत. ते ती घट्ट ओठ मिटून आणि छातीतले कढ गळचातच गिळून सहन करीत असे. पुढे पुढे तिला अपमानाची, निराशेची अगदी सवय होऊन गेली. त्या नवागत चिमण्याला तरी त्या कुवट अंधेऱ्या वातावरणापासून अलग ठेवण्यासाठी म्हणून ती त्याला आपल्या पदराखाली झाकून ठेवायची, त्याला वेगळं ठेवायचा खूप प्रयत्न करायची पण ते मूल पदराआड वळवळ करायचं, हातपाय झटकायचं, तिच्या स्तनांना चावायचं; मग तिला वाटायचं जाऊ द्या ना त्याला त्या कुवट अंधेऱ्या वातावरणात, त्याच्या नशिवातच असेल ते, तर ती त्याला काय करणार ? मग ती आणखी विषण्ण व्हायची. त्या अंधारातल्या अस्तित्वातून वाहेर झेप घेण्यासाठी अधीर होऊन डोळे तारवटून बसायची...

अशी ती सहा माणसं निरनिराळ्या कारणांनी एकमेकांचा, त्या घराचा भयंकर द्वेष करीत होती. तरीही प्रत्येक जणाला आत कुठेतरी अस्पष्ट जाणीव होती की जरी समजा एक दिवस ते घर, त्या घराच्या भिंती व छप्पर फोडून जमीनदोस्त केले असते आणि त्या सहाही जणांना उघड्या माळावर निळसर अफाट आकाशाच्या खाली मोकळे सोडले असते तरी ती माणसं चहूं बाजूला चारी दिशांकडे फाकली नसती, पळून गेली नसती. कारण त्या द्वेषाच्या, सुडाच्या भावनेचे त्या सहाही जणांभोवती एक वंधन होते, त्या धाग्याने ते न सुटण्याइतपत बांधल्या गेले होते—इतके की स्वतंत्र, स्वैर अस्तित्व त्यांना असह्य, अशक्य झाले असते आणि त्या उजाड माळावर, त्या निळसर अफाट आकाशाखाली त्यांनी एक घर पुन्हा उभे केले असते व त्यातच आपल्याला कोंडून घेऊन, एकमेकांचा व त्या घराचा सूड घेण्याच्या विचारी भावनेने पुन्हा एकत्र धगधगतच राहिले असते !

१९४५ नंतरच्या मराठी कवितेचे नवे स्वरूप

जयंत परांजपे

[ह्या लेखास कवी केशवसुत जन्मशताब्दी निबंधस्पर्धेमध्ये मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा शंभर रुपयांचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. — संपादक]

: १ :

आधुनिक मराठी कवितेची सुरुवात केशवसुतांपासून झाली. केशवसुतांच्या तुतारीने समाजमनाला आवाहन केले असेल किंवा नाही ते अलाहिदा. परंतु, केशवसुतांच्या कवितेने आधुनिक काव्याची तुतारी फुंकली यात मात्र संशय नाही. केशवसुतांनी 'विचार-प्रधान' कविता लिहिली, त्याचा मुदंड त्यांना बरेच वेळा मरावा लागत आहे. केशवसुतांनी कवितेतून मांडलेला विचार महत्त्वाचा नाही तर ज्या अस्तित्वाच्या अवस्थेत तो आविष्कृत झाला त्या अवस्थेचा तो अभिन्न भाग होता किंवा नाही, हे महत्त्वाचे आहे. 'जुन्या, पारंपरिक, पंडिती थाटाच्या कवितेत येऊ लागलेल्या आत्यंतिक सांकेतिकतेपासून त्यांनी मराठी कवितेचे रक्षण केले.' त्यानंतर तितक्याच समर्थपणे कविता पुढे गेली ती मर्ढेकरांच्या कवितेमुळे. कवितेच्या रूपात अंतर्बाह्य बदल घडून येण्याला जवळजवळ ४२ वर्षांचा कालखंड जावा लागला. परंतु, मराठी कवितेत, मर्ढेकरांच्या प्रयोगामुळे झाला नसेल इतका परिणाम त्यांच्या समीक्षेमुळे एकंदर ललित साहित्यावर आणि विशेषेकरून मराठी कवितेवर झाला. १९४५ सालानंतर कविता ही कलाकृती मानली गली हे या कालखंडाचे महत्त्वाचे वैशिष्टच आहे. प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोधांसारखा कवी आणि मार्क्सवादी विचार-सरणीचा समीक्षक देखील 'कलानिर्मितीची प्रक्रिया नाकारून' चालता येणार नाही असे म्हणतो, हे कशाचे निदर्शक आहे ?

१९४५ सालानंतरच्या मराठी कवितेला नव-कविता असे संबोधण्याचा प्रघात आहे. खरे तर, नवतेचे हे भूत मान्यवर टीकाकारांनी सहासात वर्षांपूर्वीच गाडले होते. कवितेत जुनी कविता आणि नवी कविता या पदांना विशेष असा कोणता अर्थ आहे ? मुकुंदराजांसारख्या आद्य कवीनेदेखील 'रोकडे स्वानुभव सौंदर्य' हेच कवितेचे प्राणतत्त्व मानले आहे. कवितेत आत्मप्रत्यय हवा, असे कवींपासून तो थेट काव्यसमीक्षकांपर्यंत सर्वांनी आवर्जून सांगितले आहे. मग, तुकारामाच्या कवितेतील आत्मप्रत्यय जुना आणि आजच्या कवितेतील आत्म-प्रत्यय नवा, असे वर्गीकरण कसे करता येईल ? जुने–नवे असे वर्गीकरण करणे बऱ्याच जणांच्या वाङ्मयीन प्रकृतीला मानवते. कारण नव्या म्हटल्या गेलेल्या कवितेची जी डोळ्यात भरण्यासारखी वैशिष्टचे असतात त्यांच्या कसोटीवर कोणतीही कविता पारखून घेणे सोईचे जाते.

१९४५ हे वर्ष टप्प्याचे वर्ष आहे काय ? जगभर भडकलेल्या दुसऱ्या महायुद्धाचे वारे १९४५ साली निवळू लागले होते. तथापि ज्या महायुद्धाने इंग्लिश, अमेरिकन, जपानी आणि ज्यू नागरिकांच्या जीवनाला प्रचंड हादरे बसले तसे हादरे एतद्देशीयांना बसले होते का ? मला वाटते, या देशापुरते तरी महायुद्ध आले नि गेले असे झाले. आपल्या सामाजिक जीवनाची उलथापालथ या जीवनामुळे झाली नाही. नाझींच्या राक्षसी त्रासाचे वर्णन करणारी ॲनी फ्रँक या देशात घडली नाही. महायुद्धाचे तीव्र चटके या देशातील नागरी जीवनाला बसले असते तर "Two Women" सारखी प्रत्ययकारी कादंबरी लिहिणारा अल्बर्ट मोराव्हिया या देशात जन्मला असता. मार्क्सवादी विचारसरणीच्या बुरख्याखाली ज्यांनी सारे

व्यक्तिजीवनाला दडपून टाकणारी राज्याची हुकूमशाही त्या देशात आणली त्यामुळे आतल्या आत तडफडणारी मने पॅस्टरनॅकच्या कादंबऱ्यात पहावयास मिळाली. पण महायुद्धाचा हा ध्वनी आम्ही फक्त दुरूनच ऐकला. महायुद्ध आले नि गेले. लक्षावधी ज्यूंचे शिरस्त्राण झाले, हिरोशिमा–नागासाकीसारखी शहरे उध्वस्त झाली, ज्या हिटलरने हुकूमशाहीचे चिलखत अंगावर चढविले त्यालाच शेवटी पळता भुई थोडी झाली. या साऱ्या घटना आम्ही एका कानाने ऐकल्या दुसऱ्या कानाने सोडून दिल्या. मर्ढेकरांच्या शब्दात सांगायचे तर—

पावसाळे आले गेले;
दोन युद्धें जमा झाली;
रस्त्याकडा विजबत्ती
कितीकदा आली गेली

जे जीवन आपण जगलोच नाही त्याचे घुमारे आपल्या कवितेत असावेत अशी अपेक्षा तरी का असावी ?

परंतु, १९४५ हे वर्ष मला महत्त्वाचे वाटते ते वेगळयाच कारणाने. १९४३–४४ हा काळ कवितेच्या दृष्टीने अवनतीचा काळ होता. 'झेंडूची फुले' लिहिणाऱ्या केशवकुमारांनी कवितेचे आणि एकूण काव्याचेच विडंबन केले होते. रविकिरणमंडळ तर केव्हाच संपुष्टात आले होते. अनिलांच्या कवितेत विचार आणि भावना यांचे व्यतिकरण नीटसे न साधल्यामुळे या कवितेत तरी विचाराची 'नाकापेक्षा मोती जड' अशीच स्थिती झाली होती.[1] दरम्यान कुसुमाग्रज, कांत, बोरकर, रेगे या कवींनी कवितेचा ओघ स्वतःच्या अल्प–अधिक सामर्थ्यानिशी चालूच ठेवला होता. कवितेच्या दृष्टीने १९४४ साल कसे होते त्याचे चित्र थोडक्यात प्रा. रा. श्री. जोग यांच्या पुढील अवतरणावरून सहज येऊ शकेल.

> "कविता लिहिल्या आणि छापल्या जातील, काव्यसंग्रहही प्रसिद्ध होतील, पण त्याची कमी झालेली प्रतिष्ठा मात्र परत कशी मिळेल ते सांगता येणे कठीण आहे."

मन विषण्ण करणाऱ्या या काळात 'अभिरुची'-चा जन्म झाला. १९४४ साल मला महत्त्वाचे वाटते ते महायुद्धामुळे नव्हे तर 'अभिरुची'सारख्या दर्जेदार मासिकाच्या आगमनामुळे. 'अभिरुची'चे सुरुवातीचे स्वरूप काहीसे छोटेखानी होते. परंतु, 'अभिरुची'ने कवितेला पुन: प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी जी धडपड केली ती महत्त्वाची नव्हती, असे कोण म्हणेल ? नऊ वर्षांच्या थोड्या काळात 'अभिरुची'ने आपला संसार आटोपला, हे खरे. पण तिने 'सत्यकथा', 'छंद' यासारख्या मासिकांना जणू प्रेरणा दिली. आजच्या पिढीतील शरच्चंद्र मुक्तिबोधासारखे कवी 'अभिरुची'ने पुढे आणले हे नाकारता येणार नाही. पण हे 'अभिरुची' पुराण याहून जास्त लांबविण्यात अर्थ नाही.

: २ :

यापुढील कवितेचा समालोचनात्मक आढावा घेण्यापूर्वी ज्या भूमिकेवर हे विवेचन आधारले आहे ती भूमिका थोडक्यात पाहिली पाहिजे. कविता म्हणजे कलाकृती. कोणतीही कविता खऱ्या अर्थाने कलाकृती असते तेव्हा आशय आणि अभिव्यक्ती यातील अभिन्नता आपल्याला जाणवते. अशा कलाकृतीसंबंधी लिहिताना तो आशयामुळे किंवा अभिव्यक्तीमुळे सुंदर आहे असा तपशीलाचा वर्गभेद आपल्याला करता येत नाही. आशय आणि अभिव्यक्ती यांच्या संपूर्ण संयोगीकरणातून आपल्या एकजिनसी अनुभवाची व्यापकता आणि खोली यांचा प्रत्यय येतो. अशा वेळी विशिष्ट हेतु–कल्पनेमुळे कलाकृतीचा आस्वाद घेण्याला प्रवृत्त झालेला वाचक अस्तित्वाची अनन्यसाधारण अवस्था अनुभवतो. अस्तित्वाच्या अनन्यसाधारण अवस्थेत, विशिष्ट हेतूंना प्रेरित होऊन निर्मिती करणारा सृजनोत्सुक कलावंत आणि त्या कलाकृतीच्या आस्वादनामुळे अस्तित्वाची अनन्यसाधारण अवस्था अनुभवणारा आस्वादक यांतील कलाकृती हा दुवा असतो. कलाकृतीचे अस्तित्व कलावस्तूत नसते तर सर्जक वाचकाच्या मनावर होणाऱ्या संस्कारात असते. कवितेच्या प्रत्येक वाचनाच्या वेळी होणारा संस्कार हा पूर्वीपेक्षा वेगळा असतो. म्हणूनच एका कलाकृतीतून अनेक कलाकृती संभवतात. मोना लिसाचे भावदर्शी डोळे जोपर्यंत आपण पाहात नाही तोपर्यंत ती एक कलावस्तू असते. याच कारणामुळे

अनुक्रमणिका

Harry Grossby ची चमत्कारिक वाटणारी कविता टी. एस. एलियटला अनुपम वाटते. ही कविता मुळातच पाहू.

'Black black black black black
Black black black black black
Black black black black black
Black black black black black
Black black Sun black black
Black black black black black
Black black black black black
Black black black black black
Black black black black black'

निर्मितीच्या क्षणी कलावंत एकप्रकारचा ताण सहन करतो. हा ताण टिकविणे तितकेच कठिण असते. अकाली ताणक्षय झाला तर निर्मिती अप्राप्य होते. या अवस्थेत कलावंत (या ठिकाणी कवी) शब्द, प्रतिमा, प्रतीके या साधनांचा वापर करतो. शब्द अत्यंत लवचिक साधन आहे. आणि या लवचिकतेचाच कवी उपयोग करून घेतो. शब्द लवचिक नसते (त्यांनी निर्देशित केलेल्या संदर्भांच्या दृष्टीने) तर कविता दुष्प्राप्य झाली असती. साध्यसाधनाची गल्लत होते तेव्हा अनवस्थेचा काळ येतो. शब्द, प्रतिमा, प्रतीके यातून संदर्भांचे निर्देशन होते. या संदर्भांतील दुवे (bonds) अधिक घट्ट असतात तेव्हा कवितेतील सर्व घटकांची बंदिश जास्त सघन आणि 'अर्थ'पूर्ण होते, कवितेतील कोणताही सुटा संदर्भ आशयविहीन असतो. इतर संदर्भ, त्यातील परस्पर दुवे आणि एका विशिष्ट कालमानात त्यांचा होणारा एकसंघ संस्कार हे सर्व विचारात घेऊन आपण तो विशिष्ट संदर्भ लक्षात घेतो. कवितेतील संदर्भांचे दुवे कच्चे असतील, किंवा त्यांची रचना विस्कळित असेल तर होणाऱ्या संस्कारात त्रुटी निर्माण होते. कवितेच्या वाचनामुळे आस्वादकाच्या अपेक्षा निर्माण होतात व कवितेच्या आस्वादनामुळे त्यांची पूर्ती होते. मोनालिसाचे भावदर्शी डोळे आपण पाहतो त्यावेळी संपूर्ण आकृतीत त्या विशिष्ट संदर्भांचा आपण विचार करतो. तिच्या डोळ्यावर आपली दृष्टी खिळते, याचा अर्थ असा की त्या संदर्भाला मध्यबिंदु कल्पून आपण इतर संदर्भांचा विचार करतो. आकृतीत हे इतर संदर्भ नसते तर ते भावदर्शी डोळे आशयविहीन ठरले असते. Harry Grossby च्या कवितेत 'Sun' चा विचार black black black...etc. या शब्दांच्या संदर्भ—निर्देशनाच्या साक्षेप केला पाहिजे. प्रत्येक वेळी black ने निर्देशिलेल्या संदर्भांच्या रंगछटा वेगवेगळ्या असतात. म्हणजेच black या शब्दाच्या लवचिकेचा फायदा Harry Grossbyने आत्यंतिक मर्यादिपर्यंत घेतला आहे.

मराठी कवितेतील मर्ढेकरांच्या कवितेचे महत्त्व मला जाणवते ते या दृष्टीने. घडणीचा विचार करता करंदीकर, चित्रे, आरती प्रभू, मधुकर केचे, म. म. देशपांडे यांची कविता मर्ढेकरांच्या कवितेजवळ आहे तीही याच दृष्टीने. याउलट संदर्भातील परस्परदुव्यांचे महत्त्व ओळखून रचना करणारे पु शि. रेगे, इंदिरा आणि ग्रेस यांच्या कवितेचा मी सोयीसाठी आणि सोयीपुरताच स्वतंत्र पंथ कल्पितो, तो केवळ एवढ्याच मर्यादित अर्थाने. सर्व संदर्भांच्या संघटनातून आपल्याला कवितेतील अनुभव घेता येतो. संदर्भसंघटन एका कालमानात होते. परंतु संघटन संदर्भाचे होते. कालमानाचे होत नाही. कवितेचा तोल ढळतो कारण संदर्भांचे संघटन नीटपणे घडून येत नाही. आस्वादकावर कलावंतच कलाकृती म्हणून संस्कार करण्याला (संदर्भसंघटन प्रक्रियेला विरोध करणारे) विरोध करणारे कित्येक घटक कलावस्तूत असतात.

क्वचित हे संघटन नीटपणे घडून येत नाही. कारण शब्दाच्या लवचिकतेचा नीटसा अंदाज कवीला न आल्यामुळे इतर काही संदर्भांची अनाठायी जागृती होते किंवा त्याच संदर्भाच्या विपरीत रंगछटा अनुभवाला मिळतात. वाचनाच्या पहिल्या आवृत्तीत सर्व संदर्भ हाती येत नाही किंवा त्यातील परस्पर दुवे कळत नाहीत. वाचनाच्या दुसऱ्या अथवा तिसऱ्या आवृत्तीत इतर आणखी संदर्भ हाती येतात आणि कलावस्तूच्या नव्या संस्कारात संदर्भांचे संघटन अधिकाधिक घट्ट होऊ लागते. (किंवा परस्पर दुवे कळतात) अत्यंत तर्करहित अनुभव कवितेतून सूचित करताना देखील हे संघटन अनिवार्यपणे आवश्यक ठरते. एखाद्या जास्तीच्या शब्दाच्या वा प्रतिमेच्या उपस्थितीमुळे संपूर्ण आकृतीच विस्कळीत झाल्यासारखी वाटते. संघटनाच्या अभावी कवितेत लयीचा अनुभव अशक्य असतो. काही वेळा "कविता कळली नाही, पण आवडली" असे सकृत्‌दर्शनी विसंगत वाटणारे विधान

आस्वादक करतो. वस्तुत: यावेळी तर्करहित अनुभवातील संदर्भसंघटन न घडता वाचक केवळ त्या शब्दांच्या नादाच्या लयीवर आधारित असा आपला निर्णय सांगत असतो. त्यामुळे हे विधान वरवर जरी विसंगत वाटत असले तरी ते तितकेसे विसंगत नसते !!! याला कारण आस्वादनाच्या मर्यादा. वाचक त्याचा पूर्वानुभव, अभिवृत्ती, बौद्धिक कुवत, शब्दातील संदर्भनिर्देशनाची लवचिकता जाणण्याची त्याची क्षमता, संदर्भातील परस्परदुव्यावर बोट ठेवण्याचे त्याचे सामर्थ्य, हे सर्व घटक विचारात घेऊन कविता वाचत असतो हे लक्षात घेतले म्हणजे या प्रक्रियेचे संकीर्ण स्वरूप सहज कळेल. संदर्भाची जागृती, त्यांचे संघटन, एका विशिष्ट कालमानात येणारा लयीचा अनुभव याचे आपण स्पष्टीकरण करीत असतो त्यावेळी आपण त्या कवितेची समीक्षा करीत असतो आणि ही समीक्षा केली म्हणजे काय केले हे सांगण्याच्या प्रयत्नात आपली इच्छा असो वा नसो आपण सौंदर्य-विचाराच्या कक्षेत येतो.

१९४५ नंतरच्या मराठी कवितेचे स्वरूप कळावे या हेतूने दोन आधुनिक कवींच्या कवितांचा मी येथे विचार करणार आहे.

संदर्भ, दुवे व कालमान या तिन्ही घटकांचा समीक्षेत आपणाला विचार करावा लागेल. केवळ कालमानावर भर देता येणार नाही. याच एका घटकावर अतिरिक्त भर दिल्याने म. म. देशपांडे यांच्या कवितेतील त्रुटी चिऱ्यांना जाणवली नसावी. म. म. देशपांडे यांची कविता येणेप्रमाणे :

अंतरिक्ष फिरलो पण
गेली न उदासी
गेली न उदासी
लागले न हाताला
काही अविनाशी
काही अविनाशी.

क्षितिज तुझ्या चरणांचे
दिसते रे दूर
दिसते रे दूर
घेऊनि मी चालु कसा
भरलेला ऊर
भरलेला ऊर.

जरि वाटे जड कळले
तळ कळला नाही.
तळ कळला नाही
जड म्हणते 'माझा तू'
क्षितिज म्हणे 'नाही'
क्षितिज म्हणे 'नाही'.

अंतरिक्ष फिरलो पण
गेली न उदासी
गेली न उदासी !

अत्यल्प शब्द आणि शब्दाने केलेले संदर्भसूचन ही या कवितेची वैशिष्ट्ये. या ठिकाणी, 'गेली न उदासी' हे चरण दोहरले आहे. सुरुवातीच्या चरणाने निर्देशित केलेला संदर्भ त्याच त्या चरणामुळे आणखी घट्ट होतो. संघटनप्रक्रियेत हे दोहरणे चालवून घेतल्या जाते, कारण संघटनाच्या प्रक्रियेला विरोध होत नाही आणि लयीचा अनुभव घेताना विघ्न येत नाही. तरीही साकल्याने या कवितेचा विचार करताना मला एक वेगळा विचार मांडावासा वाटतो. कवितेतील पहिल्या दोन 'कडवका'तील* संदर्भांची संघटना अत्यंत घट्ट आहे. परंतु, 'भरलेला ऊर' नंतर मात्र संदर्भातील दुवा किंचित निखळल्यासारखा वाटतो. याच चरणानंतर कवितेचा 'मूड' स्थिरावतो आणि कवी तीच भाववृत्ती पुन्हा दोहरत आहे की काय अशी शंका येते. त्यामुळेच पुढच्या ओळीत निवेदन आल्यासारखे वाटते. समीक्षेत रूपकाची भाषा नको. परंतु, तरीही तो उपयोग मी येथे जाणीवपूर्वक करीत आहे. एखाद्या आरशाचा बाह्य पृष्ठभाग समरूप वाटला तरी त्यात एखादी अशी defective line असते की जिच्या उपस्थितीमुळे प्रतिमेचे विभाजन होते. म. म. देशपांडे यांची कविता, मला तरी, अशी वाटते.

यानंतर आणखी एका कवितेतील संघटनाची दिशा सूचित करावयाची आहे. कवीचे नाव आहे ग्रेस. ग्रेस नेहेमीच तर्करहित अनुभव कवितेतून शब्दाकार

---

* हा पाली शब्द आहे.

करतात असे बरेच वेळा सांगितले जाते. परंतु, तर्करहित अवस्था म्हणजे तर्कविसंगत अवस्था नव्हे. येथे कवितेतील तार्किक संगती दाखविण्याचा प्रयत्न मी करणार आहे. ग्रेसच्या कवितेत हे किती कठीण आहे याची मला कल्पना आहे. कारण कवितेतील शब्दांचे बोट धरून प्रवास करताना त्याचा 'अर्थ' सांगण्याचा प्रयत्न आपण करू लागतो तेव्हा कवितेची दिशा बदलण्याची भीती वाटते आणि मग आपल्यासमोर उभा राहतो आपण जमविलेल्या शब्दांचा चेतनाहीन सांगाडा!

कविता अशी :

> साऱ्या इंद्रियांची माया
> आज गोठली प्राणात
> पंखाविण चढायाचा
> तुझ्या आभाळाचा घाट
>
> आज दु:खाला लागली
> मोळच्या उर्मिलेची ठेच
> भग्न शब्दांच्या ओठात
> रित्या आशयाचा घोट !
>
> आज तुझ्याच हातांनी
> माझे तुटायाचे पाणी
> सखे अभंगाच्यासाठी
> नको रडू इंद्रायणी !
>
> आता येऊ दे मरण
> देहीं पडतील हात
> बहु दुरून आले रे
> माझे सारे गणगोत !

कवितेतील पहिलाच पदबंध 'माझ्या इंद्रियांची माया' या ज्ञात पदबंधाला स्पर्शून जातो.

पहिल्या चार पंक्तीतील तिसऱ्या व चवथ्या पंक्तीचा विचार करू.

या ओळी भाषासंकेत झुगारून अशा का मांडता येऊ नयेत ? जसे :

> पंखाविण आभाळाचा
> घाट तुझ्या चढायाचा.

आता समोरच्या ओळी–पहिल्या प्रथम हे विसरले पाहिजे की 'तू' हे संबोधन कायम आहे. आता या ओळीतून हे "समजते' की आज माझ्या दुःखाला 'भोळ्या उर्मिले'ची ठेच लागली.' उर्मिला ही लक्ष्मणाची पत्नी. विरहिणी (हे अध्याहृत आहे). भोळ्या हे उर्मिलेचे विशेषण. चवदा वर्षे वनवासाला गेलेल्या पतीवर वेड्यासारखे वाटावे असे प्रेम करणारी उर्मिला म्हणून भोळी. या भोळ्या विरहिणीच्या दु:खाची ठेच मला लागली. तिचा 'अडथळा' येतो. (अडथळा ही कल्पना ठेच या शब्दातून उद्भवते) उर्मिलेचा मृत्यूशी संबंध नाही.

'भग्न शब्दांच्या ओठात' वाचल्यावर 'ओठावरचे शब्द' हा शब्दबंध आठवावा.

भग्न या शब्दाने सूचित केलेल्या संदर्भाचे दुवे इतरत्र कसे पसरले आहेत पाहा.

भग्न = शब्द
,, = ओठ
,, = रितेपण (रित्या)
,, = आशय
,, = घोट

तिसऱ्या कडवकातील 'तू' हे संबोधन पुन्हा येते. हे संबोधन कुणाला? मृत्यूला? की उर्मिलेच्या रूपाने वावरणाऱ्या विरहिणीला. येथे आणखी जाणवते ते असे : कवी 'पंखाविण आभाळाचा घाट चढाया लागला' म्हणून तर उर्मिला विरहिणी नाही? उर्मिलेच्या विरहातही एक सुप्त आश्वासन आहे. पुनर्मीलनाचे !

वाचनाच्या पहिल्या फेरीत मनाला चाटून गेले की उर्मिलेच्या उल्लेखाने जर केवळ 'विरहिणी' सुचवावयाची असेल तर 'विरहिणी' शब्द का वापरला नाही?—माझ्या प्रश्नाचे उत्तर या सुप्त आश्वासनात सापडले.

'संबोधनाविषयी कवीने सुरुवातीपासून शेवटपर्यंत मौन बाळगले आहे. परिणामतः या ओळीत दोन जाणीवा परस्परात अभिन्न झाल्यासारख्या वाटतात.' कवीसारखे मौन बाळगून आपणही पुढे सरकू.

सखे अभंगाच्या साठी
नको रडू इंद्रायणी.

या ओळीतील अभंग आणि इंद्रायणी हे दोन शब्द फार महत्त्वाचे आहेत. त्यांच्या नात्याशी दुर्बोधता बांधली आहे. सूचकतेच्या दृष्टीने तर या दोन ओळी, मला तरी, कमालीच्या महत्त्वपूर्ण वाटतात.

'अभंग' या शब्दाने तुकारामांचे अभंग स्मरावेत आणि इंद्रायणीच्या उल्लेखाने आपण अर्थाला विनासायास गाठ मारावी, हे स्वाभाविक आहे. कारण,

शब्द मोजता...मोजता
तुक्या दाराशी निजला.

यासारख्या दुसऱ्या कवितेतील ओळी आपल्या नजरेसमोर येतात. सखे हे उघड उघड संबोधन लक्षात घेता अभंगातून तुकारामाच्या आर्ततेचे सूचन कवीला करावयाचे असावे, असे वाटते. अभंगाच्यासाठी इंद्रायणीने का रडावे ते कळत नाही. (त्यापायी आलेले अनाठायी चेतनीकरण वेगळेच ! चेतनीकरणामुळे इंद्रायणी=देहकोष असेही वाटण्याचा संभव) 'अभंग' शब्दाचा आणखी एक अर्थ अविनाशित्व. तरीही, इंद्रायणी का रडते ते अजून नीटसे स्पष्ट होईना. परंतु, अचानक सांधा हाती आला. इंद्रायणीचे नाते सखेशी असावे. इंद्रायणी ही उर्मिलेसारखी कवीच्या अविनाशित्वासाठी रडणारी.

आता येऊं दे मरण
देही पडतील हात

या दोन ओळी वाचल्यावर संबोधनाविषयी बाळगलेले अर्थपूर्ण मौनच बोलू लागते.

'देही पडतील हात' ही कवीची आवडती कल्पना. हे हात 'हळदी'चे तर नाहीत ना ? संबोधनामुळे आलेला भावोत्कटतेचा पिसारा आवरून कवी काहीसा तटस्थ होतो. कवितेच्या लयीला विरोध न करता तो पुढे म्हणतो,

बहु दुरून आले रे
माझे सारे गणगोत.

यातील 'रे' मुळे वाचक गोंधळात पडतो. कारण संबोधन बदलते. परंतु, कवीच्या ताटस्थ्यातच त्याचे उत्तर मिळते.

येथवर कवितेतील संदर्भ संघटनाची दिशा दाखविण्याचा मी प्रयत्न केला. परंतु, अर्थ सांगण्याचा हा यत्न नाही.

या समीक्षणापूर्वी मांडलेली भूमिका पुढील आढाव्याचा पाया.

: ३ :

'शब्दावर थोडी हुकमत असली आणि लय तोंडवळणी पडली म्हणजे कविता लिहिणे फारसे कठीण नसते,' असे मर्ढेकरांनी 'काही कविता'च्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. शब्दावर आणि लयीवर हुकमत असलेल्या कवीत मला पु. शि. रेग्यांचे नाव प्रथम गुंफावे लागेल. रेग्यांची कविता सुबोध नसली तरी दुर्बोध मात्र क्वचितच नाही. परंतु, अन्वय लावून अर्थ समजून घेण्याच्या पद्धतीला मात्र ती कठीण वाटते. रेग्यांनी घेतलेला अनुभव त्यांच्या कवितेतून घ्यावयाचा झाला तर त्यांनी योजलेला शब्दक्रम (syntax) तोच कायम ठेवावा लागतो. रेग्यांचा संप्रदाय नाही. परंतु रचनाक्रमाचे हे जे वैशिष्ट्य आपल्याला त्यांच्या कवितेत दिसते तसेच ते इंदिरा, ग्रेस व क्वचित सुरेश भट या कवींच्या काव्यातही पाहावयास मिळते. स्त्रीसंबंधीच्या भावसंवेदनेतून विविध रूपे आणि त्यांच्या लयी उलगडून दाखविणारी रेग्यांची कविता, इंदिराबाईंचे हळवे स्पंदन आणि ग्रेस यांच्या कवितेतील तर्करहित अनुभव शब्दाकार करण्याचे सामर्थ्य या तिन्ही घटना आपल्या परीने वेगवेगळ्या आहेत. एकाच संप्रदायाचा वारसा न घेतलेल्या परंतु एकाच पंथाच्या या कवींचा विचार आपल्याला स्वतंत्रपणे करावा लागतो.

रेग्यांचे शब्द अतिशय सूचक असतात. या कवितेतील शब्दापाशी रेंगाळता येत नाही. पण त्यावरची खिळलेली दृष्टीही काढता येत नाही. त्याचे कारण रेगे हे 'शब्दानुभवी' आहेत, असे सांगता यावे. येथे सारे शब्द चेतक असतात. या चेतक शब्दांच्या सुललित (वा क्वचित प्रा. मुक्तिबोध म्हणतात त्याप्रमाणे दुर्ललित) घडणीतून रेगे सारे संवेदना विश्व जागे करतात. रेग्यांच्या कवितेचे हे सामर्थ्य ही मराठी कवितेला मिळालेली फार मोठी देणगी आहे.

त्यांची 'कुणी राक्षस' ही केवळ दोन ओळींची कविता आपण उदाहरणादाखल पाहू......

"कुणी राक्षस माझ्या मनीं गर्जला
नवीन सत्यें दाविन तुजला"

या कवितेत 'राक्षस', 'सत्ये' या शब्दांच्या रूढार्थाला काहीच अर्थ नसतो. या दोन्ही शब्दांमुळे जे सुचवायचे असते ते रेग्यांनी केव्हाच सुचवून टाकले असते. रेग्यांच्या कवितेच्या सूचक वाचकाला ते संदर्भ चटकन् समजतात. स्त्री–संबंधीच्या अत्यंत पार्थिव संवेदनेतून उत्कट रीतीने प्रत्यय देणारी रेग्यांची ही कविता पाहा :

लंपट ओले वस्त्र होउनी
अंग अंग तव लिंपुन घ्यावे
हुळहुळणारे वस्त्र रेशमी
होऊन वरवर घोटाळावे
भुइवर निखळुन नक्षत्रापरि तुज
दुरून रात्रीं तसे पहावे
पहाट होता पश्मीन्याची
शाल होउनी तुज छपवावे

असली कविता वाचून धुंद होणारा वाचक जेव्हा इंदिरांच्या कवितेकडे वळतो तेव्हा तो 'व्याकुळतो.' बाईंच्या संवेदनाच पार्थिव आहेत. विरहाचा आर्त सूर छेडणाऱ्या बाईंनी सुरुवातीलाच विलक्षण झेप घेऊन जे स्थान पटकाविले ते तसेच कायम ठेवायचे असेल तर त्याच त्या तारा छेडण्याशिवाय अन्य पर्याय नाही. दुसरी गोष्ट, ही कविता एकसुरी होत आहे असे म्हटल्याने तिचे महत्व कमी होत नाही. साडीचा पदर प्रियकरासमोर उलगडावा म्हणून वाट पाहणारी इंदिरा, तारेवरच्या जलबिन्दूतही 'काही तरी' 'हिरवे पिवळे' पाहणारी इंदिरा अशी बाईंची एकाच किती तरी रूपं मन मोहरून टाकतात. आकाशाचे 'सुनीळ मार्दव' पाहताना मन विषण्ण करणारी ती सनातन व्यथा पुन्हा अंकुरते आणि मग बाई लिहितात :

गजातुनी मी पहात बसले
आकाशाचे सुनीळ मार्दव
नारिंगी कौलारे रेखिव
कुंपण वेली हिरव्या कातिव
रंगविलासी हृदय लोभले
पाताळातुनि सरसर आली
लोखंडाची मुसळे भीषण
आकाशाला भिडली जाउन
पुरे टाकिले मजला घेरुन
किंकाळी हृदयाची थिजली !

अतिशय धावती लय, सहजसुंदर आविष्कार आणि साधे सरळ शब्द यांचा बाई वापर करतात. 'शेला' 'मेंदी' 'मृगजळ' आणि 'रंगबावरी' यातील बाईंची वाटचाल निरखून पाहणाऱ्या वाचकांना सुरुवातीच्या काळात ती कविता स्थिरीकृत स्वरूपाची वाटते. पण 'रंगबावरीत' मात्र बाईंचे एक वेगळेच दर्शन आपल्याला घडते. उदा०

उठली लगबग उन्हे मनातील
उभी टिपाया जंतर...मंतर
मेघ सरकुनी गेल्यावरची
पापणीतील हसरी थांदल.

कोणतीही कविता वाचली तरी तोच तो प्रत्यय येतो तेव्हा चिकित्सक नजरेचा टीकाकार, काहीसा नाखुषीनेच 'आपल्या प्रिय पतीशी चाललेला हा अखंड एकतर्फी संवाद' असल्याचे नमूद करतो. अशा टीकाकाराला 'रंगबावरी'त आणखी सापडावे. प्रिय पतीचे दुःख क्षणकाल विसरून नव्या नवलाईने साऱ्या घटनांकडे पाहण्यासाठी इंदिरा उत्सुक आहेत. अगदी नव्यानेच असा अनुभव घेताना देखील इंदिराबाईंच्या वाचकांना अपरिचित असलेली व्यथा अंकुरते तेव्हा तो गोंधळतो. नेहमीच्या आर्त सुरांच्या तारा छेडणाऱ्या बाई यावेळी कसल्या तरी अनामिक जाणीवेने कमालीच्या विमनस्क करणाऱ्या तारा छेडतात. ही चाहुल कसली ? मला वाटते, ही मृत्यूची विमनस्क करणारी चाहूल बाईंच्या कवितेत नव्यानेच येऊ पाहते आहे. एरवी अतिशय इंद्रियनिष्ठ प्रतिमांच्या घडणीतून आपले भावविश्व जागे करणाऱ्या बाई इंद्रियसंवेदनेच्या माध्यमालाच येथे बगल देतात.

मृत्यूचे हे मनाला भिडणारे दर्शन इंदिराच्या कवितेत नवीन असले तरी ग्रेसच्या कवितेत मात्र ते इतक्या अनेक वेळा येते की 'संध्याकाळच्या सावल्यांची' दाट छाया या कवितांवर पडलेली आढळावी.

या कवितेला मुळातच मृत्यूचे आकर्षण आहे. हा मृत्यू कधी हळदमिजल्या पावलात शिरतो तर कधी पैंजणांच्या नादात स्वतःचे शब्द पिसाटपण गुंफून देतो, मृत्यूचे हे संमोहन मृत्यूच्या कल्पनेभोवती रेशमी मुलायम गूढतेविषयी आहे की काय हे सांगता येत नाही.'

'ग्रेस ज्या पातळीवरून अनुभव घेतात ती पातळीच अत्यंत व्यक्तिगत असते. आणि व्यक्तिगततताच त्यांच्या कवितेच्या वाचकांना नडते. जीवनक्रमातील सुखदुःखाचे अनुभव येथे एका अत्यंत संवेदनक्षम तरुण कवीने टिपले आहेत. या कविमनाने वेचलेले सुखदुःख त्याचे बनत नाही. ' सुरांचे दिवे पेटत नाहीत.'

सुपा टोपलीच्या
तुझ्या संसारात
गार सावलीत
राहीन मी

मधे तुटताना
माझी प्राणतार
मला मांडीवर
घेशील ना !

असल्या कवितेतील अंतर्गत विरोधानेच तिची एकात्मता साधली आहे.'

बहुधा अतिशय तर्करहित अनुभव शब्दात पकडण्याचा प्रयत्न करणाऱ्या या कवितेविषयी आणखी काय लिहायचे !

: ४ :

ज्या काळात मराठी कवितेचेच विडंबन होऊ लागले होते, कवितेची प्रतिष्ठा ओसरली होती, त्या काळात बा. भ. बोरकर यांनी आपली भाववृत्ती जोपासली. शब्द, प्रतिमा याबाबत बोरकर फार श्रीमंत आहेत. परंतु, भाववृत्ती फुलविताना बोरकरांची श्रीमंतीच त्यांना नडली. साध्यसाधनातील गल्लतीमुळेच की काय बोरकरांना त्यांच्या शब्दकलेचा मोह होतो आणि मग अशी कविता आपल्याला वाचावयाला मिळते.

जखमि आज चंद्रमा
घावातुनि ढाळितसे घन तमांत रक्तिमा
लांछित जळ तप्त शिळा
वांछितात वंश कळा
' उघड तिळा ' ' उघड तिळा ' कण्हत क्रंदते क्षमा
वृक्षातुन गळति विषे
पक्षांची जळति पिसे
यक्षाचे विकट हसे निकट करि परिक्रमा
कमलातुन सुटति शाप
भ्रमरातुन कलिकलाप
गंगेतुनि उठुनि पाप धरि गजेंद्र विक्रमा
सघन गगन विगतधवा
ही हवाहि अहिप्रसवा
चरतुन पेरित वणवा घेरित जगा अमा
स्पर्धेच्या फणुनि दलि
श्रद्धेची वरदकलि
मी वधिली मज मधली हाय माय पूर्णिमा

क्वचित अतिशय विकेंद्रित स्वरूपाच्या प्रतिमानिर्मितीमुळे कवितेतील संघटनप्रक्रियेला विरोध होतो. बोरकर स्वतःच्या मर्यादा कधीकधी ओलांडतात आणि फार मोठे यश अशा वेळी त्यांना गवसते.

झाडें झाली निळीं निळीं करांगुळी गोवर्धन
धुंद आकाशच झालें मंद अस्मानी पर्जन्य
पांगुळलें जागोजाग काळे कालिंदीचे पाणी
अंधाराच्या कालियाचे त्यांत चमकले मणी
गंध-पिसाऱ्याचे मोर-वारे थबकले
आर्त केकावली त्यांची थप्प एकाएकीं
युगे पिळून वांकलीं जग जांभळाचे बन
उसवल्या आठवणी धरित्रीच्या कुशीतून
घरें कांबळी ओढून टक लाविती मुकाट
उजेडाने ओलावले त्यांच्या पापण्यांचे कांठ
कानीं माझ्या वाजे वेणू प्राण घुमे रुणूझुणू
उरीं कालियाचे डोल, गात्री हुंवरती धेनू
शांताचिया वृष्टीमधें अशी अद्भुताची सृष्टी
कां या लावण्यातहि मी असा सुखानेहि कष्टी ?

' याच काळात कुसुमाग्रजांची कविता पुढे आली. जीवनाचे ओंगळवाणे, किळसवाणे दर्शन कुसुमाग्रजांना

झाले नाही. त्यांना दैन्य दिसले. दुःख दिसले. जीवन जगता जगता कुसुमाग्रजांना 'काहीतरी' सांगावेसे वाटले. या वाटण्यामुळे पुष्कळवेळा कवितेलाच त्यांनी साधन बनविले. कुसुमाग्रजांना जो विचार सांगावयाचा असतो तो इतका महत्त्वाचा असतो की भावात्मकतेचे कितीही लेप चढविले तरीही इष्ट साध्य साधणे कठिण व्हावे! उदाहरण म्हणून कुसुमाग्रजांची ही कविता पहा—

कविता माझी विजयासाठी कधीच नव्हती
म्हणून तिजला नव्हती भीति पराभवाची
कविता माझी जगण्यासाठी कधीच नव्हती
म्हणून तिजला नव्हती भीति मरावयाची

या कवितेत कुसुमाग्रजांना काय सांगावयाचे आहे ते चटकन कळेल. आणि माझ्या म्हणण्याचा मतितार्थ देखील.

कांतांनीही कुसुमाग्रजांचाच 'अग्निसंप्रदाय' (किंवा प्रकाश संप्रदाय' बरेच दिवस पुढे चालू ठेवला. कांत हे शब्दशिल्पी आहेत. कांत ज्या काळात पुढे आलेत त्यापेक्षा आजच्या काळात ते पुढे आले असते तर फार मोठे कवी म्हणून समोर आले असते, इतके रचनेचे तांत्रिक कौशल्य कांतांजवळ आहे. आशय मनात घोळत राहावा आणि तो शब्दाकार होण्यासाठी कवीने जाणीवपूर्वक यत्न करावा असे बरेच वेळा घडत असावे. कारण तसे करताना एखाद्या प्रतिमेपाशी कांत फार जास्त वेळ थांबतात. आणि बहुधा त्यांनीच निर्मिलेल्या प्रतिमेच्या मोहक पाशात अडकून पडतात. उदाहरणार्थ कांतांची 'निदान' ही कविता पाहा—

पण जाऊ दे ते
एवढेच सांग मला
इतक्या वर्षांनंतर, अजूनहि—
गोरट्या कापूर गात्रांचा
पेटत्या रोमांचांचा
मोरपंखी आधार हवा का !
आपल्या प्रीतीला
अर्थाला डसणाऱ्या अनुप्रासासारखा ?

येथ 'अर्थाला डसणाऱ्या अनुप्रासासारखा' ही ओळ कशासाठी ? अनुप्रासाचे चेतनीकरण कशाबद्दल? या ओळीमुळे कवितेची दिशा कशी बदलते ते पाहा.

होय, तेव्हा—?
तेव्हा होते अनुप्रास अधरांचे
ध्वनि लावण्य–रंगाचे
बाहुंची गुंफा
बोटांची वेणी, अमृताची डहाळी
आकाश, तुझ्या गोऱ्या खांद्यावर उगवणारे
साऱ्यांचा अर्थ फक्त तुझ्या डोळ्याएवढा खोल–

अधरांचे अनुप्रास ?—ध्वनि लावण्याचे अनुप्रास ?... शेवटच्या ओळीतील 'तुझ्या गोऱ्या खुज्या खांद्यावर आकाश उगवते ?' (!) म्हणजे काय होते ?

१९४५ पूर्वी कितीतरी आधीपासून अनिल कविता लिहीत आहेत. 'सामूहिक जीवनदर्शनातून सांस्कृतिक ओघातून कविता प्रबंधाची रचना' अनिल करीत होते. परंतु, अनिलांच्या चिंतनपर कवितेतही विचार आणि भावना यांचे व्यतिकरण झाल्याचे आढळून येत नाही. 'निर्वासित चिनी मुलास' ही त्यांची दीर्घ कविता उल्लेखनीय आहे. परंतु, '१९४७' ही त्यांची कविता पाहा—

वर्तमानपत्रें
वाचवतहि नाहीत आता
खिन्नपणाने ती हातांत घेतों
टाकून देतों तशींच खाली
पाहून वरचे जाड मथळे
काळे काळे खिळें,
घण पोलादी
ठोकीत जातात माझ्या मस्तकात

× × ×

अरे ! आमच्या कालच्या भावा
असून आमच्या हाडामांसाचाच
वेष बदलून, केस वाढवून
दाढी मिश्यांचे
कफ चढवून कुठला तरी
बहकून दुष्ट भडकावणीने
झालास आमचा इतका वैरी
की वाटणीचा मांडून दावा
आईचे मागसी तुकडे करून !

वरील दोन्ही पद्यांशांना कविता का म्हणायचे, असा प्रश्न वाचकाला पडणे स्वाभाविक नाही का? तसा प्रश्न पडल्यास वाचकाला उगाच दोषही देण्यात अर्थ नाही. परंतु, 'सांगाती' मधे शेवटी लिहिलेली कविता मनोहर आहे. दहा अक्षरी रचनाबंधाचा वापर करून 'अजून यौवनात मी' म्हणणाऱ्या अनिलांनी केलेले माघातील संध्याकाळचे हे सुंदर वर्णन पाहा—

> संध्येच्या रंगछटा वृक्षांवर अडलेल्या
> लांबलांब पडछाया पुसट फिकट पडलेल्या
> शेंगांचे पिवळेपण कण्डतांना रुणझणतें
> उदासीन फांद्यांवर रुक्ष जिणे गुणगुणतें
> कललेल्या उन्हामधुन दिवस पुन्हा ढळलेला
> आळसल्या क्षितिजाला अर्थ सकळ कळलेला
> उरलेली कळ लपते कळकांच्या पोटातच
> खडकांना बळ मिळते विस्मृतीच्या घोटांतच
> वाटांच्या कुटिल जटा वळशातच आवळल्या
> दीर्घ उभा माघ निघे मागावर शांकळल्या!

: ५ :

बोरकरांच्या परंपरेतच मंगेश पाडगावकरांची सुरुवातीची कविता. अभिव्यक्तीचे वळण देखील 'धारानृत्य' मध्ये बोरकरांच्या वळणाचेच परंतु बोरकर शब्दांच्या फासात अडकले तर पाडगावकरांनी सहज सुंदर शब्दांचा वापर करून भाववृत्ती फुलविल्या. बोरकर-परंपरेचे हे नवे रूप टीकाकारांना फारच आकर्षक वाटले. त्यामुळेच 'उद्याचा थोर कवी', म्हणून पाडगावकरांचे फार कौतुक झाले. आणि त्याबरोबरच त्यांच्याबद्दल फार अपेक्षाही व्यक्तविण्यात आल्या. पाडगावकर जोपर्यंत जुन्या परंपरेला चिकटून होते तोपर्यंत ठीक होते. परंतु जेव्हा अनुकरणातून सुटून स्वतःची कविता ते लिहू लागले त्यावेळी शब्दांवर आलेली थोडी फार हुकमत आणि लयीची जाणीव यामुळे तांत्रिकदृष्ट्या पाडगावकरांची कविता सफाईदार बनू लागली. तरी संघटन-प्रक्रियेला विरोध करणारी किती तरी स्थळं त्यांच्या जाणकार टीकाकारांना जाणवू लागलीं. तर्कदृष्ट्या विसंवादी असलेल्या कवितेतून भावसंबद्ध अनुभव येणे शक्य असते. परंतु, पाडगावकरांच्या कवितेत क्वचित अशी भावसंबद्धताही जाणवत नाही. कित्येक कवितांत पाडगावकर निसर्ग उभा करतात किंवा अवे मधे निसर्ग-प्रतिमांचा वापर करतात. बहुधा प्रतिमांचे चेतनीकरण करण्याकडे त्यांची वृत्ती असते.

कित्येक दिवसांपूर्वी सदानंद रेग्यांनी 'किंचित काव्याचे' लहानसे पिल्लू बाहेर सोडले होते. त्यातूनच पुढे 'वात्रटिका' आली. पाडगावकरांनी या वात्रटिकांना वाढविले आणि जोपासले. परंतु एखाद्या जाणकार रसिकाला* लिअरचे 'Nonsense Syllables' हे पुस्तक चाळावयास मिळाले तर पाडगावकरांची ही नवी टूम कुठून निघाली त्याच्या उगमस्थानावर प्रकाश पडेल. खेद वाटतो तो या घटनेचा की पाडगावकरांनी जोपासलेल्या आणि गोंजारून वाढविलेल्या या वात्रट पिलाने प्रसंगी त्यांच्या कवितेचाच चावा घेण्यास सुरुवात केली आहे. कसे ते पाहावयाचे असेल तर त्यांची गोव्याच्या साहित्यसंमेलनात म्हटली गेलेली 'शेपटी' ही कविता पाहता येईल.

पाडगावकरांप्रमाणेच सदानंद रेग्यांनाही प्रतिमासृष्टीचे फार वेड. रेग्यांची कविता ही देखील प्रतिमांची एक साखळीच असते. परंतु, आरती प्रभूप्रमाणे या प्रतिमा संकीर्ण स्वरूपाच्या असतात. किंवा पु. शि. रेग्यांप्रमाणे त्या सूचकही नसतात. त्या प्रतिमाच कधी कधी अनुभूतिरूप घेतात. जसे—

> तृप्त मनाच्या
> गर्भ रेशमी
> श्रावण धारा
> पाहता पाहता
> येती......
> जाती......

---

* हा जाणकार रसिक म्हणजे प्रो. द. भि. कुळकर्णी. याविषयीचे विवेचन ते स्वतंत्ररीत्या करतीलच. तो त्यांचा मुद्दा.

मांडुन गोंडस
कांच तळघांचा
लख्ख पसारा

आणि ढगांच्या
घरटचा मचला
पक्षी उन्हाचा
उतरुन खाली
फुलपायांनी
संथ डुंबतो
त्यात
फुलवुनी
किरण पिसारा

तथापि रेग्यांच्या प्रतिमा कधीकधी अपरिहार्य वाटत नाहीत. प्रतिमांचे बहुधा नाटचीकरण झाले असते. त्यामुळेच pseudo lyricism कडे ही कविता वाटचाल करू लागते.

रेगे, पाडगावकर यांच्याप्रमाणेच वसंत बापट यांचीही 'सेतु'मधील कविता प्रचारकी थाटाची वाटत नसली तरीही अनाठायी वक्तृत्वाची त्यांची हौसही कमी झाल्यासारखी वाटत नाही. आणि हीच गोष्ट त्यांच्या कवितेला 'धोक्याचा कंदील' ठरते. वस्तुत: पु. शि. रेगे, इंदिरा संत, वोरकर, पाडगावकर, सदानंद रेगे हे सर्वच कवी सौंदर्यवादी आहेत. परंतु, रेगे आणि इंदिरा संत यांच्या कवितेत आशय आणि अभिव्यक्ती वेगळी अशी आपल्याला वेगळी दाखविता येत नाही. जेव्हा स्वत:च्या मर्यादांचे उल्लंघन करण्याचा पु. शि. रेगे प्रयत्न करतात, तेव्हा 'त्रिधा राधा'सारखी कविता जन्माला येते आणि जेव्हा स्वत:ची मर्यादा, अभिवृत्ती ते विसरतात तेव्हा त्यांची कविता फसते. आजच्या कवितेत या उपरोल्लेखित कवींमुळे (बापट, सदानंद रेगे, पाडगावकर) प्रतिमांचे चेतनीकरण, नाटचीकरण आणि अनावश्यक वक्तृत्व याबरोबरच सफाईदार (तांत्रिक दृष्टचा) रचना करण्याच्या कसवामुळे, या कवितेत प्रा. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे 'तरतरीत'-पणा आलेला ।दसतो. या तरतरीतपणाच्या मुळाशी या कवींची अभिव्यक्ती–वैलक्षण्याची, आस आहे. ज्याला 'छांदसी'च्या प्रा. रेग्यांनी सफाईदार म्हटले आहे किंवा 'नवीन मळवाट'मधे प्रा. मुक्तीबोधांनी 'अभिव्यक्ति–विलक्षणता' असे नाव दिले. त्याचे कारण कलानिर्मितीच्या वेळचा कलावंताचा जागरूकपणा, हे असावे.

: ६ :

कवितेच्या क्षेत्रात मर्ढेकरांनी कोणती 'क्रांती' केली तिकडे त्यानंतरच्या दुसऱ्या पिढीने नीटसे लक्ष पुरविले नाही. मर्ढेकरांच्या क्रांतीचा कोणताच चांगला परिणाम झाल्याचे या दुसऱ्या पिढीच्या कवितेवरून आढळून येत नाही. बालकवी हेच केवळ कवी होते असे मर्ढेकरांनी म्हटले म्हणून की काय या कवींनी निसर्ग–प्रतिमांचा सढळ वापर केलेला दिसतो. या वापराचा काहीसा विपरीत परिणाम नंतरच्या पिढीवर होण्याची फार शक्यता होती. १९५४ साली तारुण्याच्या ऐन उंबरठ्यावर असताना प्रसिद्ध झालेल्या चित्र्यांच्या 'चित्र'सारख्या कवितेवरील या त्रयीचा परिणाम कसा झाला ते पाहण्यासारखे आहे. या तीनही कवींनी इतर कवींसमवेत Pseudo Lyrical कवितेकडे वाटचाल सुरू केली होती. परंतु नंतर आलेल्या आरती प्रभू, म. मं. देशपांडे, अरुण कोलटकर, मधुकर केचे यांनी स्वत:च्या सामर्थ्याची जाणीव बाळगून कवितेवरील हे संकट टाळले. या कवींचा स्वतंत्रपणे विचार करावा लागेल.

मधुकर केचे : केच्यांची कविता विशिष्ट मर्यादांच्या चौकटीत फार मोठी आहे. तिचे सामर्थ्यही जाणवते आणि तिच्या मर्यादाही नजरेत भरतात. 'केच्यांची कविता बहुधा अभंगात अवतरते. अलिकडेच तिने अभंगाची चौकट ओलांडून मुक्तछंदात प्रवेश केला आहे.' मधुकर केचे अभंग लिहितात. पारळकरही अभंग लिहितात.' पण केच्यांच्या अभंगाला भावात्मक-तेची जोड द्यावी लागत नाही. त्यांचा अनुभव आविष्कारोन्मुख झाला की आपोआप स्फटिकवत बाहेर पडतो. आणि मग—

तुझ्याच मापाचे
मज दे शरीर
भक्तीहून थोर रती व्हाया

आलिंगाया मज
येशील जेधवा
झाकूनही देवा उसळेन

हुंगण्यास तुझ्या
अंगीचे फुलोल
माझेही जन्मेल नाक तेव्हा.

देई असा दिव्य
कोमळाचा स्पर्श
ज्यात वीर्यनाश संभवेना.

अशी रसरशीत कविता ते लिहून जातात.' केच्यांना प्रतिमांचा मोह नाही. अभंग लिहितांना शब्दाची रेखीव बांधणी करतात. केच्यांच्या अभंग–ओवीची संतकवींच्या अभंगरचनेशी तुलना करण्याचा मोह आवरत नाही. संत कवींच्या कवितेत आढळणारा झरा काही समीक्षकांना केच्यांच्याही कवितेत दिसतो. परंतु केच्यांच्या कवितेत अधिक डौलदार बनण्याची, तरतरीत दिसण्याची हौस आहे.' तुकारामाचे अभंग किंवा नामदेवाचे अभंग यातील कलाकुसर पाहण्याचा यत्न केला तर त्या रचनेत शब्द–बांधणीतील शैथिल्य कदाचित जाणवेल, परंतु, अत्यंत उत्कट आविष्काराच्या पोटी हे दोष लपून जातात. आणि तरीही—

मीही असा पिसा
पुरुष असून
दूध छातीतून सांडो पाहे

अशा भेदक ओळीतून कोणत्याही प्रकारे प्रतिमांचे संकर न करता केचे आपली प्रतीती उत्कट रीतीने मांडतात त्यावेळी राहून राहून ती कविता वाचत राहावी, असे वाटते. केच्यांची ही नवीन कविता पाहा :

खांद्यावरच्या खोडाला
फांद्या कल्पतरू ऐशा
माझ्या जखमेभवती
घोंगावती मधमाशा

रुक्ष वृक्षावरी स्तने
झरतात वक्षापरी
झाले विराणीचे दूध
क्षीरसागरास भारी.

'आरती प्रभूंची कविता म्हणजे अत्यंत संकीर्ण प्रतिमांची निर्मिती. या गुंतागुंतीच्या प्रतिमांमुळे त्यांची कविता समजणे कठीण होते. परंतु, पुनःपुन्हा ती कविता वाचली की बरेच काही हाती गवसते. त्यांच्याइतकी संकीर्ण प्रतिमासृष्टी, मला ग्रेसच्या कवितेत दिसली होती. या कवितेतील तर्कसंगती सांगता येणे शक्य असते.' आरती प्रभूंच्या कवितेत स $_1$...स $_2$...स $_3$ स $_4$...या संदर्भातील परस्परदुवे संकीर्ण असतात परंतु या दुव्यांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व कवी देत नाही. येथे संदर्भ हेच महत्त्वाचे असतात.

ही कविता वाचताना क्वचित ओंगळवाण्या, किळसवाण्या वाटणाऱ्या प्रतिमा आवश्यक आहेत का, असे बरेच वेळा विचारले जाते. खरे तर, या प्रतिमाच आवश्यक आहेत असा सकृतदर्शनी चमत्कारिक वाटणारा प्रश्न विचारता येईल. निर्मितीच्या प्रथमावयसा काळात आरती प्रभूसारख्या कवीला आपल्याला आलेला प्रत्यय प्रतिमेसारख्या अधिक व्यापक मापाचा वापर करण्यावाचून गत्यंतर नसते. अशा वेळी, प्रतिमांच्या संकीर्ण साखळीतून प्रवास करतांना बहुधा प्रतिमेत अडकून पडल्यासारखे होते. प्रतिमेत वा प्रतिमेपाशी अडकणे केव्हाही वाईटच. आरती प्रभूंच्या बाबतीत हे पुष्कळ वेळा घडते. असे घडते त्यावेळी प्रतीतीत विस्कळितपणा जाणवतो. 'प्रथमावयसा' काळातील ही प्रतिमांची 'नव्हाळी' पुढे कमी कमी होत जाते. 'दिवे लागण' मधील आरती प्रभूंच्या कित्येक कविता वाचताना मला असेच वाटले. 'इतिहास' ही त्यांची अलिकडेच प्रसिद्ध झालेली कविता वाचली म्हणजे आरती प्रभूंच्या विकासक्रमाचा आलेख काढता येईल.

मराठी कवितेच्या नव्या स्वरूपाचा विचार करताना म. म. देशपांडे यांच्या कवितेपाशी मी अडखळतो. गेली कित्येक दिवस त्यांच्या सुटया कविता मी वाचत होतो. वाचल्या आहेत. प्रत्येक वेळी ही कविता मला आवडली आहे. परंतु, संग्रहरूपाने ही कविता वाचताना मात्र थोडेसे असमाधान व्यक्त करावेसे वाटले. म. म. देशपांडे यांच्या व्यक्तित्वाच्या आणि आविष्काराच्या मर्यादाच त्यांच्या कवितेचे कुंपण ठरले आहे.

७ :

इंग्रजी साहित्यात महाकवी शेक्सपियरविषयी जितके बोलले तितके कमीच वाटते. तसेच मराठीत मर्ढेकरांचे. मराठी कवितेतील मर्ढेकर हा एक टप्पा आहे. कवितेने येथून खूप मोठे वळण घेतले.

मर्ढेकरांच्या कवितेची खरी कल्पनाच त्यांच्या समकालीनांना आली नसावी. मला वाटते हे एका दृष्टीने स्वाभाविकच आहे.

मर्ढेकरांनी कविता लेखनाला ज्या काळात सुरुवात केली त्याच काळात कुसुमाग्रज राख फुंकून अग्नी प्रज्वलित करीत होते, कांत रुद्रवीणेत तीच कविता वेगळ्या धर्तीने गिरवीत होते, अनिल चिंतनपर कविता लिहिण्यात गुंग होते, बोरकर सर्व शब्दसामर्थ्यानिशी भाववृत्ती जोपासत होते. अशा काळात पदोपदी इंग्रजी शब्द, ओंगळवाणे वाटणारे उल्लेख, कवितेतील चमत्कारिक वाटणारा रचनाक्रम, यामुळे वाचकाला धक्का बसल्यासारखे वाटले. या धक्का देणाऱ्या कवितेच्या आगमनामुळे रसिकात उघड उघड दोन तट पडले. एक गट त्या कवितेतील ओंगळवाण्या वाटणाऱ्या उल्लेखांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देत. 'अहो पापं अहो पापम्' करीत ती कविता धिक्कारली,तर काहींनी नवे काही तरी गवसल्याप्रमाणे तिचा उदोउदो सुरू केला.

खरे तर आजच्या काळात मर्ढेकरांच्या कार्याच्या स्वरुपाचे आकलन होणे कठीण आहे. मर्ढेकरांच्या सामर्थ्याचा आणि मर्यादांचा बरा वाईट परिणाम पुढील वीस वर्षांच्या कालखंडातील कवितेवर झाला. मर्ढेकरांविषयी भलत्याच अपेक्षा निर्माण करून त्या अपेक्षांची पूर्ती होत नाही असे दाखविणे आणि त्या आधारावर त्या कवितेची प्रतवारी लावणे इष्ट नाही. जे मर्ढेकरांना अभिप्रेत नव्हते, जे त्यांनी केलेच नाही त्याच घटना मर्ढेकरांच्या मर्यादा कशा ठरतील ?

मर्ढेकरांची कविता शेक्सपियर सारखी बहुपिडी नव्हती, इलियटसारखी प्रत्ययकारी नव्हती, अशी विधाने केली जातात. इलियट, ऑडेन या कवींच्या कवितांचा परिणाम मर्ढेकरी कवितेवर झाला. परंतु, मराठी कविता आणि इंग्रजी समकालीन कविता यातील अंतर तोडण्याचा प्रयत्न मर्ढेकरांनी केला नाही. कारण भांडवलशाही, साम्राज्यवादी मनोवृत्ती, दुसऱ्या महायुद्धाचे पेटू लागलेले वारे आणि अत्यंत तांत्रिक आणि यांत्रिक प्रगतीमुळे आलेली विसंगती यातून इलियट घडला होता. इलियटच्याच नव्हे तर कितीतरी सर्वसाधारण लोकांच्या श्रद्धांनाच हादरे बसू लागले होते. अश्रद्ध जीवनामुळे पसरलेली भकासता पाहून विषण्ण झालेल्या इलियटने पुनश्च Religion कडे धाव घेतली. इलियटच्या कवितेची जाण असलेल्या मर्ढेकरांनी अंतर तोडण्याचा प्रयत्न केला, हे खरे. पण तो मराठी कविता व समकालीन इंग्रजी कवितेतील अंतर नव्हे, कारण भांडवलशाहीचे, महायुद्धाचे चटके या समाजाला खरोखर तितके जाणवलेच नाहीत, हे मर्ढेकरांनी ओळखले होते. जसा पाऊस प्रत्येक वर्षी यावा तशी महायुद्धे येऊन गेलीत. इथे यांत्रिक प्रगतीचे तारू नुकतेच किनारा सोडून समुद्रात गेले होते. भांडवलशाही समाजरचनेमुळे पिळवटून निघणारा समाज नुकताच कुठे जागा होऊ लागला होता. पारतंत्र्याचे जोखड मानेवर होते. त्यामुळे भांडवलशाही की साम्यवाद या वादात शिरण्यापेक्षा पारतंत्र्याच्या शृंखलेतून विमुक्त होण्यासाठी समाजमन व्यग्र झाले होते. अशा काळात जी विसंगती इलियटला जाणवली, तीच विसंगती बीजरूपाने मर्ढेकरांना दिसली. काळातील समकालीन कवींच्या काव्यातही असमर्थता त्यांना जाणवत होती. म्हणूनच मर्ढेकरांच्या कवितेमुळे मराठी कविता आणि त्या कालखंडातील कालिक जाणीव यातील अंतर तोडण्याचा मर्ढेकरांनी प्रयत्न केला. आणि हा प्रयत्न पुष्कळ अंशी यशस्वी ठरला. तथापि, स्वतःच्या व्यक्तित्वाच्या मर्यादा ओलांडून स्वतःला स्वतःतून बाहेर फेकण्याचा प्रयत्न एखादा कवी करतो. मर्ढेकरांनी हे केले नाही.

शब्दांची नाणी झिजली आहेत, त्यांच्या ठराविक रचनाक्रमातून एक प्रकारच्या सांकेतिकतेकडे कविता झुकते आहे, कवितेतील शब्दांची लवचिकताच नष्ट होते आहे, ही जाणीव मर्ढेकरांना विकल करणारी होती. त्या जाणिवेपोटीच पर्यायी इंग्रजी

शब्दांचा सढळ वापर, क्वचित भोंगळवाणे वाटणारे संदर्भ, आणि चमत्कारिक शब्दक्रम यांतून मर्ढेकरांनी विसंगतीवर बोट ठेवले.

> झरणावती सरण लागले
> जिवंत आशा पडे उताणी

अशा ओळीतून ॲसिड फेकल्याचा भास होणे स्वाभाविक आहे. पण मला हे म्हणणे पटत नाही.

> शिशिरतुच्या पुनरागमें,
> एकेक पान गळावया
> का लागता मज येतसे
> न कळे उगाच रडावया
> पानात जी निजली इथे
> इवली सुकोमल पाखरे
> जातील सांग अता कुठे
> निष्पर्ण झाडित कापरे !

असे म्हणणारा हळवा कवी ॲसिड फेकण्याइतका निष्ठुर असेल असे मला वाटत नाही. मर्ढेकरांनी जणू एका सर्जकाची भूमिका स्वीकारली. सर्जकासारखेच ताटस्थ्य स्वीकारले आणि कठोरपणाचा ॲप्रन घेऊन आपल्या नेमक्या दुखऱ्या भागावर बोट ठेवले. या दुखऱ्या भागातील विसंगती दाखविण्यासाठी विडंबनाचे शस्त्र परजले. असली अवघड शल्यक्रिया करावयाची म्हणजे मग थोडे ओंगळवाणे दर्शनही आलेच.

> शब्द टराटरा फाडुनि टाकी
> सांगायाचे म्हणजे ओठी
> तसे राहिल माझ्या अगदी[1]
> पूर्ण नागडे, पूर्ण नागडे

हे पूर्ण नागडे, उघडे सत्य मर्ढेकरांच्या निंदकांना अस्वस्थ करणारे होते. ही सारीच मने

> परिस्थितीचे पिऊन ॲसिड
> लिबलिबली ही मने हडकुळी

अशी झाली होती.

मांडवलशाही समाजरचना, यांत्रिक जीवन आणि मानव्य यांच्याविषयी चिन्तन करता करता मर्ढेकरांना असल्या विलक्षण ओळी स्फुरल्या.

> पिपात मेले ओल्या उंदिर;
> माना पडल्या, मुरगळल्याविण
> ओठावरती ओळ मिळाले
> माना पडल्या, आसक्तीविण
> गरिब बिचारे बिळात जगले
> पिपात मेले उचकी देउन
> दिवस सांडला घाऱ्या डोळी
> गात्रलिंग अन् धुवून घेउन
> जगायची पण सक्ती आहे
> मरायची पण सक्ती आहे
> उदासतेला जहरी डोळे
> काचेचे पण;
> मघाळ पोळे
> ओठावरती जमले तेही
> बेकलाईटी बेकलाईटी !
> ओठावरती ओठ लागती
> पिपात उंदिर न्हाले ! न्हाले !

यंत्रयुगात तासकाट्यावर बसून धावणारी माणसे पाहिली की—

> ह्या नच मुंग्या : हीव माणसे
> मने अनामिक जरि साऱ्यांची
> लक्तरलेल्या मिनिटांचा वर
> सदैव बुरखा; लाज स्वतःची

असल्या ओळी न रचल्या गेल्या तरच नवल ! जिथे जिथे विसंगती दिसते तिथे तिथे हा कवी मन पोलादी करून त्याचे विडंबन करतो. पण या असल्या अश्रद्ध म्हटल्या गेलेल्या मनाचा हळवा पापुद्रा उलगडतो, जेव्हा 'उद्याच्या आई'ची चाहूल त्यांना लागते. तेव्हा मग मर्ढेकर म्हणतात :

> पोरसवदा होतीस
> कालपरवापावेतो
> होता पायातही वारा
> कालपरवापावेतो
> आज टपोरले पोट
> जैसी मोगरीची कळी

पडे कुशीतून पायी
छोट्या जीवाची साखळी
पोरसवदा होतीस
कालपरवापावेतो
थांब उद्यांचे माउली
तीर्थ पायांचे घेईतो.

जुन्या दोहरल्या गेलेल्या प्रतिमांच्या रचनाक्रमातून नवी समानता प्रस्थापित करू इच्छिणारा एखादा कवी

किती होतीस ग भोळी
कालपरवापावेतो
याद नव्हती देहाची
कालपरवापावेतो
हात हातात देताना
लाज लाजतेस किती;
वेढवेढून पदर
अंग झाकतेस किती ?

अशी रचना करतो.*

'मर्ढेकरांची कविता चिंतनातून स्फुरलेली आहे. हे चिंतन कधी व्यक्तिगत तर कधी सामाजिक. मर्ढेकरांच्या कवितेचा प्रवास व्यक्तिनिष्ठेकडून सामाजिकतेकडे झाला. मर्ढेकरांनी जीवनाकडे पाहण्याची काहीशी विफलतावादाकडे झुकणारी वृत्ती स्वीकारली.'

कुणि मारावे, कुणी मरावे
कुणी जगावे खाउनि दगड
वितळवून कुणि आयुष्यांना
ओतावे अन् सोन्याचे घड.
कुणी रडावे, बडवावे कुणि
कुणी हसावे पिऊन वायू
कुणी दाबून जखम आजची
जरा उद्याचा काढावा पू.
या जगण्यातुन, या मरण्यातुन
हसण्यातुन अन् रडण्यातुन ह्या
अशाश्वताच्या मुठी वळूनी
अपाप वरती चढतिल बाह्या;
अखेर घेता टक्कर जरि मग
युगायुगांचे फुटेल भाल
अशाश्वताच्या समशेरीवर
शाश्वताचिही तुटेल ढाल !

मराठी कवितेने या ठिकाणी घेतलेले वळण पुनः पुन्हा न्याहाळून पाहताना थोडंसे म्हणावेसे वाटते.

अशीच जावी वर्षे काही
आणि महात्मा यावा पुढचा
अम्हास आम्ही पुन्हा पहावे
काढुनि चष्मा डोळ्यावरचा.

'शिशिरागम', 'काही कविता', 'आणखी काही कविता' यातील मर्ढेकरांचा प्रवास वैयक्तिकतेकडून सामाजिकतेकडे झाला तर विंदा करंदीकरांचा प्रवास सामाजिक जाणिवेकडून व्यक्तिनिष्ठेकडे झाला. 'शिशिरागमा'तील सुरुवातीची कविता जशी मर्ढेकरी वाटत नाही तशीच सुरवातीची करंदीकरांची सामाजिकतेची पसरट जाणीवही खास करंदीकरांची वाटत नाही. 'उद्याच्या आईची' चाहूल लागली की मर्ढेकर सश्रद्ध होऊन लीनतेने झुकतात तर मातृत्वाच्या जाणिवेने ओटीपोटी सुखावलेल्या स्त्रीकडे पाहून आपण अनावश्यक झाल्याच्या जाणिवेने करंदीकर काहीसे बेचैन होतात आणि म्हणतात,

तुडुंब भरलिस मातृत्वानें;
काजळ वाहवले गालावर
मोहर गळला मदिर क्षणांचा;
कळी प्रगटली; निवले अंतर
त्या उत्कट क्षेपेतच
पोचलीस पुढच्या क्षितिजावर
(मला उमगले मी अनवश्यक)
फितुर जाहले तुजला अंबर !
त्या दिवशी मी तुला शापिले—
तुला वाटले कौतुक ते तव
तुडुंब भरलिस, ओळखले मी
जामिन तुजला कुळी शहाण्णव.

कवितेतील अंतर्गत विरोध येथे कवितेचा तोल सांभाळतो. जी घटना मर्ढेकरांची मर्यादा ठरली ती ओलांडण्याचा जेव्हा करंदीकरांनी स्वतः पुरता प्रयत्न

---

* ही कविता प्रस्तुत लेखकाची....हे उदाहरण युक्त नाही असा दावा मांडता यावा !

केला त्यावेळी 'त्रिवेणी 'सारखी मराठी कवितेचे लेणं ठरलेली कविता पुढे आली. करंदीकर स्वतःचा संवेदनाप्रधान अनुभव विविध प्रतिमांतून आविष्कृत करतात. तर्कदृष्टचा विसंवादी, परंतु तरीही अत्यंत भावसंबद्ध अनुभव आपणाला या कवितेतून येतो. जेव्हा अनुभवातील भावसंबद्धता जाणवत नाही त्यावेळी करंदीकरांचा 'मुक्त सुनीता 'सारखा फार मोठा प्रयत्न फसतो. जेव्हा प्रयोग यशस्वी होतो तेव्हा फार मोठे यश करंदीकर हिरावून नेतात. जसे 'दादरा--एक तालचित्र '.

लय आणि शब्द यांवरील हुकमतीमुळे एखादा कवी किती वेगवेगळे प्रयोग करू शकतो, त्याचे करंदीकर हे, एक उदाहरण आहे. करंदीकरांची 'बाल–गीते ' हे त्यांचे आणखी डोळ्यात भरण्यासारखे यश ! या बालगीतांचा स्वतंत्र विचार करावा लागावा. परंतु, विस्तारभयास्तव केवळ उल्लेख करतो.

स्वानुभवाच्या डोहात खोल बुडी मारून काही तरी 'शाश्वत ' सापडविण्याचा यत्न करणारे चित्रे हे मराठी नवकवितेचे एक आशास्थान आहे. शब्द, प्रतिमा, प्रतीके, त्यांचा रचनाक्रम, त्यांची कवितेतील स्थाननिश्चिती आणि कवितेचे 'स्थलकालसापेक्ष ' असलेले महत्त्व ओळखून प्रत्येक घटकाचा संदर्भ–निर्देशनासाठी जाणीवपूर्वक वापर करणारा दुसरा कवी आज तरी, नजरेच्या टप्प्यात नाही. चित्र्यांच्या कविता वस्तुतः दुर्बोध नाहीत. परंतु, त्यातील संदर्भाच्या व्यक्तिगततेमुळे कविता दुष्प्राप्य वाटू लागते. (क्वचित परसंस्कृतीतील संदर्भाच्या निर्देशनामुळे चित्रे आपली परीक्षा तर पाहत नाहीत ना म्हणून वाचक काहीसा नाखुष होतो.) अस्तित्वावस्थेचा ताण पेलण्याचे आणि आपला अनुभव 'संदर्भ निर्देशना 'तून उत्कट रीतीने प्रकट करण्याचे चित्र्यांचे सामर्थ्य फार मोठे आहे अशा वेळी रूपक अध्याहृत मानून,

> **मला सुखाच्या फुटल्या फांद्या**
> **पसरलीस तू वेदनातुनी**
> **मुळे होऊनी; अभिलाषेच्या**
> **मांड्यामधली जळती धमनी**
>
> **मला सुखाच्या फुटल्या फांद्या**
> **फिरविलेस अन् तू आपुले मुख;**
> **त्या लज्जेच्या फळाफुलातच**
> **अजून लवलेले माझे सुख.**

अशा ओळी ते लिहून जातात. 'निमित्तांचे दरवाजे अचानक उघडले म्हणून आपण भेटलो' अशी वृत्ती स्वीकारली की मग समागमाची अवस्था वर्णन करताना देखील स्वतःला स्वतःच्या दूर ठेवण्याचे कसब साधते.

> **निद्राशिल्पित देह एक दडला प्राजक्तपुष्पात या**
> **माझे उर अशा विलक्षणी क्षणी अंधारते कापते**
> **स्पर्शातीत समागमात तुझिया शून्यावरी हा टळे**
> **पारा किंतु मनात नाहि उरला दिक्काल कोमेजता**
> **विश्वाच्या जडतेत स्पंदन करी भारावले काळिज**
> **तू नेलेस कुठे जरी न कळले काळातुनीहि वर**
> **जेथे खोल जळात आज पडल्या छायापरी चांदण्या**
> **विश्वाश्चर्य मनात अन् उमटले पाण्याहुनी निर्मळ**

चित्र्यांच्या कवितेने मराठी कवितेला पुढे नेले किंवा नाही हा पुन्हा चर्चेचा विषय ठरेल. परंतु. आजच्या घटकेला असे विधान करणे धाडसाचेच ठरणार आहे. १९६० नंतरच्या त्यांच्या कविता वाचताना टीकाकारांना 'चित्रे स्वानुभवाच्या गर्तेत' आहेत असे वाटते. परंतु, मला वाटते, ही चित्र्यांची संक्रमणावस्था आहे. 'संवेदनांचा गुंता विचरून' शाश्वत सापडविण्याची विलक्षण धडपड चित्रे करीत आहेत. ही अवस्था रँबोच्या विकासक्रमातील दुसऱ्या अवस्थेला समांतर जाणारी अशी अवस्था आहे. म्हणूनच अत्यंत व्यक्तिगत संदर्भनिर्देश करणाऱ्या या कवितेसंबंधी आज तरी काही विशेष बोलता येत नाही.

: ८ :

शरच्चंद्र मुक्तिबोध : मर्ढेकरांच्या काळात राहूनही मर्ढेकरी संप्रदायाचा परिणाम वा प्रभाव श. मा. मुक्तिबोधांच्या कवितेवर झाला नाही. 'अभिरुची 'च्या जन्मापासून मुक्तिबोध सातत्याने एका वेगळ्याच पाऊलवाटेवर चालत आहेत. या कवितेला मार्क्सवादी जीवनदृष्टीचे अधिष्ठान लाभले

आहे. या 'यात्रिका'च्या व्यक्तित्वाचा मार्क्सवाद हा कणा आहे. तरीही ही कविता प्रचारकी थाटाची बनली नाही हे एक नवल आहे. सार्त्रसारखा तत्त्वज्ञ कलावंतदेखील मार्क्सवादाकडे वळला त्यावेळी कलेकडे उपयुक्ततेच्या दृष्टीने पाहू लागला. मुक्तिबोधांच्या बाबतीत हे कसे घडले नाही? याचे उत्तर मुक्तिबोधांनी थोडक्यात दिले आहे./ ते लिहितात : कलानिर्मितीची प्रक्रिया नाकारून कलानिर्मितीचा 'अट्टाहास' करणे व्यर्थ आहे.

विचार आणि भावना व्यतिकरण साधल्यामुळे मुक्तबोधांची कविता केवळ विचाराधिक्यापासून बचावली आहे.)

मानवा, मानवा काय ही स्थिती
किडयांचे मरण जिण्याची भीती

या सहजोद्गारात मार्क्सवाद कुठे आहे?

अशाश्वताच्या समशेरीवर शाश्वताची ढाल तुटेल असे मन विषण्ण करणारे दृश्य मर्ढेकरांना दिसले, तर जेव्हा पूर्णत्वासमोर अपूर्ण मानवता दुबळी असल्याचा कवीला साक्षात्कार होतो त्यावेळी, कवी म्हणतो,

पूर्णत्वासमोर, पूर्णत्व शोभते
अपूर्ण टाकते मानेस खाली.

लोंबकळणाऱ्या 'त्रिशंकू'ला पायाखाली भूमी नसल्याचे दिसते त्यावेळचे हे वर्णन पाहा.

आणि घाबरून खाली
भूमि पायाखाली मुळातच नसे
खाली हेलावतो महोदधि एक
जनतासागर
त्याचिया लाटांत भयानक जोश
त्यातच सोडून गेलेला उत्साह,
अदम्य प्रवाह जोराने उसळे
त्यावर महान उदात्त आशय दिव्य आकारांचे सूक्ष्म,
आणि भव्य
अह्यारवर फिरुनी लहरींच्यावर
अरे! समुद्राचा प्रत्येक कण तो
बारा सूर्यासम अतीव झळझळे

कारण प्रत्येक कण ते काळीज
तडफडते ज्यात स्वप्नस्थ वास्तव.

(मुक्तिबोधांचे वेगळेपण त्यांच्या स्वप्नस्थ वास्तवात आहे. त्यामुळे नैराश्य किंवा विफलतावादी मनोवृत्तीचा परिणाम आपल्यावर होत नाही.]

: ९ :

गेल्या वीस वर्षांत याशिवाय बरीच कविता लिहिली गेली. मनमोहन, वासंती गजेंद्रगडकर, आ. ना. पेडणेकर, सरिता पदकी, तुळशीराम काजे, सुरेश भट, बाबा मोहोड, पद्मा, पद्मा गोळे, संजीवनी मराठे, पुरुषोत्तम पाटील, वामन इंगळे, तु. शं. कुलकर्णी, रा. म. जाधव, शांता शेळके, श्रीनिवास कुलकर्णी, शंकर रामाणी, वि. ज. बोरकर, रवींद्र सुर्वे, रमेश तेंडुलकर...इ. अनेक कवींचा उल्लेख करता येईल. सर्वच कवींच्या कवितांचा परामर्श घेणे येथे अशक्य आहे. तथापि, बऱ्याच दिवसांपासून लेखन करणारे श्रीकृष्ण पोवळे आणि नव्या पिढीतील नारायण सुर्वे या दोन कवींकडे लक्ष वेधणे मला अगत्याचे वाटते. नारायण सुर्व्यांच्या 'सत्यकथा' व 'मौज'च्या यंदाच्या दिवाळी अंकांतील दोन्ही कविता उल्लेखनीय आहेत.

: १० :

आधुनिक मराठी कवितेच्या गेल्या वीस वर्षांतील स्वरूपाचा आपण येथवर विचार केला. या वीस वर्षांत फार मोठ्या प्रमाणावर कवितानिर्मिती झाली. या काळात स्थूल कवितेकडून मराठी कवितेने सूक्ष्मतेकडे प्रवास केला आहे. कविता अतिशय रेखीव वनू लागली आहे. नीटनेटके रेखीवपण कुणालाही आवडावे. परंतु, अलिकडे या नीटनेटकेपणाच्या अतिरेकामुळे की काय त्यात नटवेपणा येऊ पहात आहे. पुष्कळशा सर्वसाधारण कवितांतून खुळचा वाटाव्यात अशा विस्कळीत प्रतिमा, त्यांचे चेतनीकरण, अनुभवाचे नाट्यीकरण, अनावश्यक वक्तृत्वाचे स्तोम, हे दोष जाणवतात. तर काही चांगल्या कवींची भाषा अ-मराठी असल्याचे जाणवते.) कोणत्याही परिस्थितीत अ-मराठी भाषेचे समर्थन करणे कठीण आहे. मर्ढेकरांनी रचनाक्रम बदलला

परंतु हे कवी रचनाक्रम बदलण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा त्यांची भाषा इंग्रजी वळण घेऊ लागते. चित्र्यांची इंग्रजी वळणाची भाषा किंवा मुक्तिबोधांच्या भाषेवरील हिंदीची जबरदस्त छाप यांचे समर्थन कोणत्या तत्त्वावर करायचे !

दुसरे परसंस्कृतीतील संदर्भाविषयी. अशा संदर्भांच्या उल्लेखाने कविता वाटते असे नाही. परंतु, असे कित्येक संदर्भ आजचे कवी अधेमधे पेरतात, की सामान्य वाचकालाच काय पण जाणकार टीकाकाराला ते हुडकून काढणे दुरापास्त होते. हे संदर्भ त्या व्यक्तित्वाचा अपरिहार्य भाग असतात काय ? असे वाटत नाही. एक घटना मात्र मला स्वागतार्ह वाटते आणि ती ही की आजचे कवी 'वृत्ता'चा उपयोग करीत आहेत. [मधुकर केच्यांनी आपला अनुभव अभंगातून आविष्कृत केला आहे. पृथ्वी व शिखरिणी या वृत्तात ग्रेस यांनी किती तरी रचना केली आहे. चित्र्यांनीदेखील सुरुवातीच्या काही कविता या वृत्तातच लिहिलेल्या आढळतात. परंतु हे कवी वृत्ताचे हवे तितके मान कधी कधी ठेवत नाहीत. केवळ मात्रादोषावर कवितेचे रसग्रहण करणे इष्ट नसले तरी वृत्तदोष हे कवितेचे न्यून आहे हे विसरल्यासारखे वाटते.]

या वर्षीच्या विंदा करंदीकरांच्या किती तरी कविता 'धृपदी' आहेत. करंदीकरांनी किती तरी प्रयोग केलेत. त्यांतील हा आणखी एक. काही दिवसांपूर्वी धृपद पाडगावकरांना अडचणीचे वाटले होते. भाववृत्तीची तीच ती लय आळविण्यासाठी कवीला धृपदाचा फार उपयोग होऊ शकतो करंदीकरांनी तीच गोष्ट पुन्हा नव्याने सिद्ध केली आहे. 'सांगाती'मधील अनिलांचा दहा ओळींचा रचनाबंध मनोवेधक आहे. [अनिलांनी मराठीत मुक्तछंद आणला. आणि मर्ढेकरांनी त्यांच्या कवितेत मुक्तछंदाला फाटा दिला. अतिशय नादमधुर अशी मुक्तछंदातील कविता मराठीत फारशी लिहिली गेली नाही. परंतु, मुक्तशैलीतील पु. शि. रेग्यांची ही आकर्षक अक्षररचना पाहा.]

उमाठ्याच्या खांद्यावरे दवंधर चांपेपण
तिचे होते.
तिला हवा होता
साळुंकी वाऱ्याचा
लाज. भिऊ शेला
आणि पुन्हा—
अडवणाऱ्या खोडीच्या पावसाची
घनंतर बरसात
मी केव्हाच दिले आहेत म्हणून
माझे श्वास, उच्छ्वास
वाऱ्याला.

जाता जाता काही घटनांचा निर्देश करणे आवश्यक वाटते. गेल्या तीन वर्षांत बरीच समर–गीते लिहिली गेली. या समर–गीतांचा विचार केलेला नाही. कारण कविता ही कलाकृती असते असे प्रस्तुत लेखात अध्याहृत मानले आहे. एखादे उत्कृष्ट समरगीत कलाकृती या सदरात येऊच शकत नाही असे प्रस्तुत निबंधकाराला वाटत नाही. तसे घडले असते तर समरगीतांचाही विचार येथे करता आला असता.

आणखी एक घटना. मान्यवर कवींच्या काव्यात संकीर्ण प्रतिमांच्या निर्मितीमुळे आलेल्या दुर्बोधतेमुळे, आणि क्वचित ओंगळवाण्या वाटणाऱ्या उल्लेखांमुळे या कवितेलाच विरोध करणारे कितीतरी पंथ साऱ्या महाराष्ट्रात गटागटाने विखुरलेल्या अवस्थेत अस्तित्वात आले आहेत. ही प्रवृत्ती चांगली की वाईट हा प्रश्न अलाहिदा. परंतु आधुनिक मराठी कवितेच्या स्वरूपाचा विचार करताना या विरोधी प्रवृत्तीची दखल घ्यायला हवी.

कवितेतील सफाईदारपणा, रेखीवपणा, तांत्रिक कौशल्य, वृत्ताविषयी कवीची आवड, साऱ्या गोष्टी स्वागतार्ह आहेत. तरीही मनात कुठे तरी असमाधान राहते. केशवसुतांच्या कार्यामुळे, मर्ढेकरांविषयी लिहिताना प्रा. गंगाधर गाडगीळ यांनी मर्ढेकरांनाही दुसरे केशवसुत म्हटलेच आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वाने संपूर्ण मराठी उजळून टाकील अशा एखाद्या तिसऱ्या केशवसुताची वाट पाहणे एवढेच आपल्या हाती आहे. फक्त दरम्यानच्या काळात दुसरा केशवकुमार मात्र पुन्हा जन्मायला नको ! ! !

———

व ऱ्हा डी मा ण सं....६

वामन इंगळे

—मधुकर केचे

"वामनरावांनी तुम्हाला तात्काळ घर सोडून जायला सांगितले आहे." रात्री अकरा वाजता मला वसू निरोप सांगतो आणि तेवढ्या अवेळी नागपूर-सारख्या अपरिचित शहरात मी कोठे जावे हे न कळून रस्तोरस्ती भटकतो. आणि—

"तुम्हाला मी गावाला बोलावले होते खरे; पण मुळीच येऊ नका. आम्ही इतःपर तुमची वाट पाहणे बंद केले आहे." हे असे पत्रही एक दिवस येते; वामनरावांकडूनच.

तरीही आमच्या अतूट मैत्रीचा रौप्य महोत्सव फार दूर नाही. अजून आमची भांडणे होणारच नाहीत असे प्रत्यक्ष ईश्वरही सांगू शकणार नाही. कारण त्याने माणसे घडवण्याची भट्टी लावताना वामनरावांच्या वेळी फारच गलथानपणा केला. प्रेमळ-पणाचे द्रव त्यावेळी जेवढे आत्यंतिकतेने त्या निर्मात्याने वापरले तेवढीच जराशाने बिनसून जाण्याची वृत्तीही जरा जादाच त्यात टाकून दिली. त्यातून वामनराव इंगळे नावाचा प्राणी जन्माला आला.

मुरारची व त्यांची मैत्री माझ्या आधीची. प्रेम इतके की ते केवळ सख्या भावांचेच राहू शकेल. मुरार एकदा त्याच्या कॉलेजतर्फे बैरामजी ट्रॉफीत भाषण द्यायला अमरावतीस आला. आम्ही दोघेही टुकार भाषणे केली. त्यामुळे एकदम मैत्री जुळली. ती इतकी की त्याचे सर्व नातलग व मित्र हे माझ्याही वाट्याला आले. त्यातलेच वामनराव.

आम्ही तिघेही त्यावेळी जीवनातले एक आवश्यक कर्तव्य म्हणून शब्द ठोकत होतो. तिघांच्याही कविता सारख्याच प्रमाणात संपादकांकडून वापस येत होत्या. सत्यकथेबद्दल तिघांनाही आकर्षण होते. टकी लागलेल्या डोळ्यांनी आम्ही त्या मासिकाकडे पाहात होतो. त्या नजरेने जर एखाद्या जेवत्या माणसाकडे पाहिले तर नक्कीच त्याचे पोट फुगेल. मला तर वाटते आमच्या तशा नजरेमुळेच सत्यकथेच्या काही कवींना 'दीठ' लागली असावी.

तिघे एका गावात राहिलो नाही. तरीही एक-मेकांची ओढ होती. मी अमरावतीस आणि वामनराव –मुरार नागपुरात. असे दूर राहूनही आम्ही सतत जवळ होतो. कविता व तिच्यामुळे आलेल्या व्याधी-उपाधी एवढेच आमचे साम्य नव्हते. रात्री फिरण्याची आवड व सूर्य फार लवकर उगवल्यामुळे त्याला शिव्या देणे याबद्दलही आमचे साम्य होते. आपल्या चांगल्या कविता मूर्ख संपादकांना कळत नाहीत याबद्दल तर आमचे मलतेच एकमत होते.

लोकांनाही आमची समानता मान्य असावी. एकदा वरखेडच्या कविसंमेलनात आम्ही गेलो. ते यात्रेचे दिवस असल्यामुळे गावाच्या गर्दीपासून निवांत रस्त्यांने गोंधळ घालण्यासाठी आम्ही रात्रभर भटकलो. दिवस आता उजाडणारच अशा कठोर सकाळी परत आलो. आमचे सुजलेले डोळे, एकमेकांशी बरेच दिवसात भेटी न झाल्यामुळे तुंबून राहिलेल्या शिव्या वगैरेतले काही अवशेष उताऱ्यावर येईपर्यंत टिकून

होते. ते पाहून एक भगवद्‌भक्त कवी तुकडोजी महाराजांच्या कानी लागले म्हणे. आम्ही तिघेही रात्रभर महारपुऱ्यात दारू प्यायला गेलो होतो असे त्यांनी अफवल्याचे आमच्या कानी आले. ते चुगली बहाद्दर नागपूरचेच. त्यामुळे त्यांना धडा शिकवण्यासाठी तात्काळ नागपूरला या हे निमंत्रण वामनरावांनी मला पोस्टाने पाठवले. तेथे जाऊन तो 'कार्यक्रम' आटोपल्यावरही आठ दिवस नागपूरलाच मुक्काम करावा लागला.

त्याबद्दलचे वामनरावांचे मुद्दे असे की नागपूरला राहण्यामुळे नुकसान काहीच होणार नाही. कॉलेजचे पिरेड्स अटेंड करायचे तर ते अमरावतीच्या V. M. V. चेच कशाला ? मॉरिस कॉलेज मेले काय ? आणि आपल्यासारख्या समदृष्टी लोकांनी दोन कॉलेजात फरक करायचाच कशाला ? आम्ही अमरावतीला पाहुणे आलो तर,तुमच्या कॉलेजात शिकू. तुम्ही येथे आला तर आमच्या कॉलेजात शिका.

मग प्रत्येक प्राध्यापकाशी ओळख. कारण उपऱ्या विद्यार्थ्यांना ती जमात वर्गात बसू देत नाही. तेव्हा,

"नमस्कार सर. जरा यांची ओळख करून द्यायची आहे. हे श्री. रा. रा...... "

"काय करतात ? "

यावरचे उत्तर फारसे प्रतिष्ठित नाही. त्यामुळे प्राध्यापकांच्या त्या प्रश्नाकडे सरळ दुर्लक्ष करून वामनराव मला सांगत, "आणि, हे डॉ. देशमुख 'मराठीचे साहित्य शास्त्र'वर त्यांनी डॉक्टरकी..."

"वा, वा ! फार सुंदर पुस्तक आहे ते. मी तर एका दमात वाचून काढले."

माझ्या या निखालस खोटेपणाबद्दल प्राध्यापकांची खात्री झाल्यामुळेच मी कोण ही उत्सुकता वाढीस लागावी. म्हणूनच, "हे केचे काय करतात ?"

खरे उत्तर—काहीच करीत नाही; पण अनुचित सत्य नेहमी टाळावे. त्यामुळे—"फार मोठे कवी आहेत."

"कोठे देतात छापायला ?"

अरे बापरे ! पण वामनराव बिरबलाचे वंशज, "कोठेच देत नाहीत. फारच प्रसिद्धीपराङ्मुख आहेत."

आणि मग त्यांच्या तासाला जाऊन बसण्याची परवानगी मिळे.

नागपूरला मी इतक्यांदा मुक्काम करी त्यातला हा एक मुद्दा. दुसरा म्हणजे,

"यार तुम फिकर क्यौ करते ? अरे, एक पाहुणा उधार जेवू घालणे आमच्या खाणावळवाल्यास काही जड जाणार नाही."

असे मग मुक्काम वाढत गेले. ते नागपूरचे म्हणजे मोठ्या शहरातले म्हणून मी त्यांना बराच दबकून वागे. ते दोघे होतेही मोठे रुबाबदार. स्नान न करताही मोठे लख्ख वाटत. मुरारला मिशा आल्याच नव्हत्या. वामनरावांनी मात्र सुंदर मिशा राखल्या होत्या. नाकाच्या टोकापासून दोन्हीकडे दोन केसाळ गोमी ऐटबाजपणाने सरपटत गेल्यासारख्या त्या मिशा ! वामनराव विद्यार्थी वाटण्यापेक्षा एखाद्या अमकेमियाखाँचे साथीदार वगैरे वाटत. हॉटेलात भज्याची प्लेट यायला वेळ असला तर त्या टेबलाचा तबला होई. तबला ढोलक वगैरे मंडळींशी त्यांचे बरेच सख्य असे. त्यांचे वडील काटोलचे प्रख्यात लावणी पवाडेकार होते. बापाचे गुण पोरात उतरले.

मला त्यांच्या कविता मात्र मुळीच आवडत नसत. मुक्तिबोधांचा त्या मंडळीवर बराच प्रभाव. त्यांचे युग, पीडा वगैरे शब्द वामनरावांच्या कवितेत असत. त्याचेही येवढे 'हे' नव्हते. पण मुक्तिबोधांची एक प्रिय पण विचित्र चाल वामनरावही वापरीत. गणपतीच्या अंत्ययात्रेतून परतताना आमच्या गावाकडचे लोक एका विशिष्ट चालीवर एक गाणे म्हणत,

'॥ हर हर महादेव संभू । कासी विसोनाथ गंगू ॥'

अगदी त्याच चालीवर, "आव शिळचा कढीला ऊत। ननाना नना नाना नाना" इ. कविता ते म्हणत. 'उसळला वरती तेजोगोल, निमाले भान कळाले मोल' या मुक्तिबोधी ओळींच्या चालीवर ते चाले. मर्ढेकरांनी मराठी कवितेत मेलेला उंदीर, जंतू, मुंग्या वगैरेंच्या सुकाळातही वामनराव भर घालीत. मला ते

कार रुचणारे नव्हते. आमची त्या विषयांवर खडाजंगी होई. शेवटी मात्र आमच्यापैकी एखाद्याची कविता वामनराव सुंदर चालीवर गाऊन दाखवीत. मग सारे गोड होई. त्यांचा आवाज अतिशयच गोड होता व आहे.

नागपूरचे ते दिवस आठवले म्हणजे संपूर्ण वामनराव समोर उभे राहतात. अभ्यास सोडून आम्ही तेथे सर्व काही करीत असू. विनोदाला तर नुसता ऊत येत असे. एक दिवस वि. सा. संघाच्या कुंपणावर दोनतीन माकडे बसलेली पाहून वामनराव म्हणाले, "ते बघा तुमचे आजोबा !"

मी नेहमी आजोबा पुराण लावी त्यावर हा टोला होता. मी त्यांना तात्काळ म्हटले, "छे, ते माझे आजोबा नाहीत. त्यांना 'असे' काही छंद नव्हते. साहित्य संघाच्या बाहेर राहणारा तो एक सभ्य माणूस होता."

"अहो पण असं काय बोलता ? तेथे तर एक कोणाची तरी आजीही दिसते आहे. तेव्हा ते नक्कीच तुमचे आजोबा !"

असा हा दिलवाला माणूस. पण देवाघरच्या भट्टीत काही तरी भेसळ झाली. जराजराशा गोष्टीने त्याचे वाया जाते. आम्ही तिघे एवढे मित्र ! लोकांनी हेवा करावा अशी आमची जवळीक. पण लोकांआधी आम्हीच एकमेकांचा हेवा करू लागलो. मागच्या जन्मी सवती होतो की काय कोणास ठाऊक ! तिघांपैकी एकाला नेहमी इतर दोघे जास्त जवळ आल्याची शंका येई. आणि त्याचा परिणाम म्हणजे तसे ऐन मध्यरात्री मला खोलीतून हाकलून देणे ! तशा प्रसंगी आमच्या तिघांचीही खात्री असे की इतःपर काही उभ्या जन्मात आम्ही भेटणार नाही.

आणि तो उभा जन्म आठपंधरा दिवसांनी खलास होई. हळून वामनरावांचे पत्र येई. त्याला उत्तर दिले नाही तर पुन्हा एक चिडके पत्र. हे सर्व पोट्टेपणाच्या वयात शोभून दिसले. आता आम्ही सारेच संसारी झालो. नोकरीदार, मुलंबाळंवाले झालो, तरीही ते कायमच आहे. एखादी मैत्री चिरकाल टिकण्यासाठी ज्या शपथा घ्यायच्या असतात त्याच आम्ही वैर टिकवण्यासाठी घेतल्या. पण प्रेम व भांडणे यातले काहीही अखंड टिकले नाही. टिचलेही नाही. हे असेच चालत राहणार आहे.

आमच्या तिघातही वामनराव जास्त लहरी; आणि तेवढेच जास्त प्रेमळ ! शिक्षण त्यांनी बी. ए. वरच थांबवले. त्यांची स्वतःची कारणे काहीही असो; पण माझे आपले ठाम मत आहे की आमच्या त्या वेळेच्या भांडणाचाच तो परिणाम आहे. त्यांनी ते मनावर इतक्या भावनाविवशतेने लावून घेतले असावे. आम्ही दोघे म्हणजे मुरार व मी अमरावतीला एम्. ए करण्याचे ठरवले. मुरार आपली सोबत सोडून गेला हे त्यांना लागून गेले. त्यांनी तारा, पत्रे इ च्या माध्यमातून आग्रह, विनंत्या, धमक्या काय वाटेल ते सुरू ठेवले. शेवटी वैतागून ते नागपूर सोडून काटोलला अज्ञातवासात गेले. आम्ही इतके पाठीशी लागलो; पण त्यांनी एम्. ए. नाही केले ते नाहीच केले. येवढे प्रेम कवीच आपल्या मित्रांवर करू जाणे. कवी तोही त्याच्यासारखाच हवा. आपल्या पत्नीवर, मुलाबाळांवर ज्याचा वर्षाव करायचा तो त्यांनी आमच्यावर करून पाहिला. पण आमचे पोरवय बदलत गेले होते. त्यांचे मात्र ते कायम राहिले. सुंदर अशा बुद्धिनिष्ठ 'विटा' करणारा माणूस असा लेकरूपणाने वागून जातो, नुकसान करून घेतो. त्यांनी आपल्या प्रेमळपणाने जेवढा आत्मघात करून घेतला तेवढा त्यांच्या खास शत्रूंनीही केला नसता.

माझ्या सर्व नातलगांनी--मुरारच्याही एकदम स्वीकारलेला एकमेव माणूस म्हणजे वामनराव. जीवनातली दुःखे असह्य झाली म्हणजे वामनराव तडक मुरारच्या गावाकडे निघतील. त्याच्या आईच्या गळचात हात गुंफवून मनसोक्त रडतील. तो 'मायपणा' असा आस्वादून झाला म्हणजे पुन्हा गावाला जातील. चांदूर-बाजार सारख्या आडगावी काही कारण नसताना त्यांनी मास्तरकी स्वीकारली. स्वतःचा संत्र्यांचा मळा जरी नीट लक्ष लावून पाहिला तर चार हेडमास्तरांना ते स्वतःकडे सालाने ठेवू शकतील. अशा सुखवस्तू माणसाने चांदूरची नोकरी पत्करली. मी तेव्हा आकोटला होतो. तरीही वामनराव नेमाने अमरावतीस

यऊन माझी चौकशी करून जात. दरम्यान त्यांचे लग्नही झाले होते. त्यामुळे त्यांच्या प्रेमळपणाला योग्य वाट मिळाली होती. लहरीपणा बराच कमी झाला होता. स्वतःच ते नोकरीचे आडगाव निवडल्याचे तोटे मात्र त्यांना बेचैन करीत होते. काही प्रसंग आला तर कोणाला हाक मारावी हे त्यांना कळत नव्हते. अशा वेळी अमरावतीस येऊन त्यांनी माझ्या वहिणीला म्हटले, "बाई, तुला एक पेढेवाली वात सांगतो. तुला पुढच्या महिन्यात माचा होणार आहे." बाईने मग पुढची सारी व्यवस्था केली. वामनरावच्या मनावरचा मार उतरला पण मी म्हणतो त्या गावी जाऊन असे फजीत होण्याचेच काय कारण होते ?

ते गाव सोडण्याबद्दल त्यांना मी हजारदा सांगून पाहिले. ऐकण्याचे नाव नाही. त्या गावाने या वेड्या माणसाच्या लहरीपणाला काय चटक लावली म्हणून एक दिवस बघायला गेलो. एका बकाल रस्त्याने अंधार वाटेस्तो आम्ही भटकलो. आकर्षण कोठेही काही दिसले नाही. रात्री येऊन जेवण आटोपले. काव्याचे नशापाणी आटोपून एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढीत पहुडलो. जरासा डोळा लागणार तोच वामनरावांनी मला हाक मारली. त्या अपरात्री कोण्यातरी खेड्याचे लोक आले होते. त्या गावातल्या भजनात तबला वाजवायला वामनरावांना ते घेऊन गेले. हे होते त्यांच्या वास्तव्याचे प्रमुख आकर्षण. सौ. विजूताईला अशी अपरात्री मंडळी येणे व वामनरावांनी तबला किंवा ढोलक बडवायला उल्हासाने निघून जाणे याची सवय झाली होती. मी काही बोलून उपयोग नव्हता.

तेवढ्याच अकारणीपणाने त्यांनी चांदूरही एक दिवस सोडले. मध्ये काही वर्षे गेली. मग गृहस्थ अमरावतीस आले. तेव्हा कळले की ते पुन्हा काटोलास आहेत. काटोलला ये म्हणाले. अजूनही तशी पत्रे येतात. वाटते, चांगले असो, वाईट असो या माणसाने आपले पोरपण जपले. आपण तर ते जपू शकलो नाही. तेव्हा अशा निरागस माणसाशी मिसळण्याचा आपल्याला अधिकारच काय ? सारा व्यवहार सांभाळून, दोन्ही वेळा ढेकर देऊन मगच अशा काव्य जगणाऱ्या प्रेमळ माणसाचे कौतुक करणारी आम्ही सूज्ञ माणसे. त्यांनी त्या बेछूट फकिराकडे जायचे कशाला ? त्याला लुटायला ? सहज हवापालट म्हणून ? पैशांचा निर्मोह, कवितेची नशा, प्रेमळपण, स्वतःला रक्तबंबाळ करणारा लहरीपणा यांचा एक कण तरी आम्ही जगलो काय ? नाही — तर मग त्या वामनरावांकडे आम्ही कोण्या आधाराने जावे ? त्यांची अस्वस्थ निमंत्रणे मात्र मला मंडावून सोडतात.

वामनरावांच्या कविता मला आवडल्या नाहीत. वामनराव मात्र आवडले. त्यांच्या कविता मला नसल्या तरी संपादकांना आवडल्या. आमचे त्यावेळेचे आराध्य-दैवत 'सत्यकथा'! त्यातही त्यांच्या कविता आल्या. इतर बाबतीत व्यवहार डोकावला तरी कवितेच्या कीर्तीच्या बाबतीत मात्र आम्ही फार वेगळे वागलो. आमच्यापैकी कोणाही एकाची कीर्ती ही सर्वांची समाईक मालमत्ता असे. कोणीही कोणाचा द्वेष केला नाही. सत्यकथेत कविता आल्या तरी वामनरावातला कवी लवकरच आटोपला. एखादा शब्द उगीच जास्त लाडवण्याची त्यांची सवय मात्र माझ्या नेहमीची लक्षात राहिली. त्यांनी स्वतःच बनवलेला एक 'जळनई' हा शब्द त्यांनी कौतुकाने दोनतीनदा वापरला होता. त्यांच्या कविता आरंभी जरी मर्ढेकरी, पाडगावकरी व पुष्कळदा करंदीकरी धर्तीच्या होत्या तरी पुढे मात्र त्यांना स्वतःचा स्वतंत्र थाट आला. गूढ अभंग ते रचू लागले. बरेचदा ते अभंग विक्षिप्त वाटून जातात. खेड्यातली अवधुती भजने, एकनाथाची भारुडे, अभिजात लावण्यापवाड्यातले दुर्मिळ सौंदर्य त्यांनी आपल्या रचनेत जोपासले आहे. म्हणूनच त्या कविता राकट, खेडवट पण शब्दापाठचे काही तरी सांगणाऱ्या वाटतात. रचनेचा ओबडधोबडपणाही एक सौंदर्य देऊन जातो. छंद मासिक चालले असते तर त्यांच्या त्या आगळ्या रचना पुन्हा पुढे गेल्या असत्या.

" वाघाच्या गळ्यात टाकल्या साखळ्या
तुझ्या–माझ्या आणा झाल्या मोकळ्या "

असे लोककडवे वापरून त्यांनी मित्रभेटीच्या विषयावर एक सुंदर कविता 'छंद'ला दिली होती. बहुधा ती मुरारवर असावी. त्यावेळी वरचे ते कडवे त्यांनी मुद्दाम 'आगळ्या टाइपात छापा' असे संपादकास कळवले होते. ते तसे नेहमीच्या कवितेहून वेगळ्या अक्षरात छापले गेल्यामुळे कवितेचे अर्थवाहन होण्यास मदत झाली होती. आजकाल वेगवेगळ्या

अक्षरात कविता छापण्याची टूम निघाली आहे. अक्षरे वेगवेगळी वापरली तर मानसशास्त्राच्या दृष्टीने अर्थाकलन निरनिराळे होते यावर माझाही विश्वास आहे. सत्यकथेच्या दिवाळी अंकात तसा एक प्रयोगही झाला आहे. पण त्याही आधी तीच बीजे असलेली कल्पना वामनरावांच्या डोक्यातही उगवली हे मात्र नमूदनीयच !

कविता वरीचशी थांबली. वामनराव थांबले नाहीत. कविता जगण्याच्या काळातच त्यांनी गद्य लिहिणे चालू ठेवले होते. विशेषत: तरुण–भारत मध्ये आम्ही दोघेही हात रमवून घेत होतो. वामनराव कथाप्रकार हाताळीत होते. त्या गद्यावर कवितेची — तीही नवकवितेची छाया पडलेली दिसे. त्यावद्दल पुन्हा आमची भांडणे होत. एक दिवस तेही बिना औषधाने निघून गेले. त्यांनी जरा मोठा कॅनव्हास घेतला. मॅजेस्टिकने काढलेली त्यांची 'काळा समुद्र' ही दीर्घकथा मला पोस्टाने आली ! तिच्यामध्ये लोकांना काही चेहेरे ओळखीचे असल्याचा संशय आल्याने ती फार वाचली गेली.

'काळा समुद्र' ही कृती वामनरावांची अविस्मरणीय रचना. विकृत लैंगिकतेचे एक वेगळेच चित्र त्यांनी त्यात चितारले. विशेष म्हणजे फार मोठा संयम राखून त्यांनी लिहिले. समलिंगी संभोगावद्दल इतके स्पष्ट व सूक्ष्म लिहायला इतर कोणी धजलाच नसता. वामनराव फ्रान्समध्ये जन्माला आले असते तर सार्त्रसारखे गाजले असते. Childhood of a Leader या कथेत सार्त्रदेखील त्या कोवळच्या छोकऱ्याच्या तेजदार गुलाबी नरम छातीचे वर्णन करताना मिटक्या मारीत असावा अशी शंका येते. वामनरावांवद्दल मात्र येत नाही. येवढ्या तरुण वयात म्हणजे धोकेवाज वयात हा विषय त्यांनी अत्यंत तिऱ्हाईतपणे हाताळला !

परवाच त्यांची 'कवचकुंडले' ही कादंवरी वाचली. तीही अशीच सूक्ष्म आणि पूर्वीच्या कृतीहूनही आटोपशीर आहे. विषयही एकदम निराळा आहे. सातपुड्याचे जंगल, तेथली जगाला अज्ञात संस्कृती, त्यांच्या जीवनातली उपेक्षित मूल्ये व गूढ वातावरण यामुळे वाचक एकदम हरखून–हारवून जातो. लैंगिक विकृती, गूढ वातावरण, संगीताच्या नशेदार मफिली व आपल्याच नादात जगणारे लोक हे त्यांच्या कथाकादंवऱ्यांचे आवडते विषय. त्यांच्या 'एकट'–पणाचे, अज्ञातवासप्रियतेचे, लहरीपणाचे हे जणू पुरावेच.

अनेकदा लोकांना सारखा हसतमुख दिसणारा हा प्रसन्न माणूस. पण गूढतेची, आर्त दु:खाची त्याला असलेली आवड एखादेवेळी मात्र अचानक प्रगट होते, असेच एकदा आम्ही आमनेरला गेलो. नेहमीची खेळीमेळी, थट्टा करण्याची, विनोद जगण्याची हौस येवढेच त्या सहलीचे कारण. काटोलच्या दिलीपच्या घरी (ते घर झाडचाचे म्हणून) काटोलास चहा न घेता त्याच्या जन्मगावी तो घ्यावा असा आमचा ठराव झाला. दिलीपला रजा घ्यावी लागली, मग बराच लांब असा मोटारचा प्रवास आम्ही आटोपला. एका गावाला आमचा आणि सडकेचा संवंध संपला. तेथून कित्येक कोस पुढे पायी जायचे ! तेही आरंभले. दिवस ओले होते. पंधरावीस मिनिटांच्या अंतराने पाऊस कोसळून जाई. रस्त्यातले नाले पुन्हा पुन्हा अडवू लागले. धोतरवाल्यांचे ठीक असते. पाणी ओलांडताना ओचे वर केले की भागते. आम्ही पँटवाले. नाला दिसला रे दिसला की, "हं चला सोडा पँट" पुढे पुढे सांगणेही नलगे.

असे खिदळत खिदळत आमनेरला पोचलो. त्या गावाला एक नदी. त्या महिन्यात ती फारच विक्राळ वाहते. तिच्यात रानम्हशीसारखे थोरले काळे दगड भरपात्रात वसतीला आहेत. त्यांच्याशी झुंजत जेव्हा पुराचे पाणी रेटू लागते तेव्हा भयंकर आवाज होतो. शिवाय लाटा हमरीतुमरीवर येऊन जखमी होतात. त्या दृश्याकडे पाहिल्यानंतर वामनराव हारवले. वेळात वेळ काढून त्यांनी जवळच्याच एका खेड्यातला एक जुना–गढ वाडा मला पाहायला नेले. मयाण मध्यरात्री तो कसा दिसत असेल याची कल्पना करायला लावली. भुताखेताच्याही काही कल्पना त्यात टाकून दिल्या.

अर्थात हे असे वामनराव कवीमधीचेच ! वाकी म्हणजे विटा, इनोद, वगैरे वगैरे.

(पुढील मजकूर पान १६८ वर)

पावित्र्य, पराक्रम घाली मजला सदा मोहिनी

वैकुंठ गणपतराव इंगळे

आजच सकाळी— जिच्याविषयी प्रवासातही सतत ओढ व आत्मीयता वाटत होती त्या पूजनीय जन्मभूमीत दहा वाजता येऊन पोचलो. काल दिवसभर झाशीला मुक्काम होता. झाशीच्या राणी प्रातःस्मरणीय ! लक्ष्मीबाईंचा उभारलेला भव्य व आकर्षक स्फूर्तिदायक पुतळा डोळे भरून मनसोक्त पाहिला. जिवंतपणामुळे, हुबेहुबपणामुळे व लक्ष्मीबाईच्या चेहऱ्यावरील देदीप्यमान तेजामुळे झाशीचा अल्पसा मुक्काम सुद्धा मोठा चैतन्यदायी वाटला. तसे झाशी अत्यंत साधारण व अविकसित शहर आहे. पण तिच्याशी निगडित शौर्यशाली इतिहासामुळे तिला अनुपम महत्त्व प्राप्त झाले आहे. झाशीचा किल्ला देखील आम्ही उत्सुकतेने पाहिला. ज्या तटावरून राणी लक्ष्मीबाईंनी घोडा फेकला, तो तर शतकानुशतके स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या लोकांच्या बाहूंना अखंड स्फुरण देत राहील.

ज्या अनेक हुतात्म्यांनी स्वतःचे रक्त शिंपून हिंदुस्थानची बाग फुलविली, त्या हुतात्म्यांच्या समाधीचे मोठ्या भारावल्या मनाने व भक्तिभावाने दर्शन घेतले व मनातील आदरांजली कृतज्ञतापूर्वक त्यांच्या पायावर वाहिली. खरोखरच

नित्य भरतील त्या यात्रा
हुतात्म्यांच्या चितेपुढती
अर्पिले प्राण देशाला
तयांच्या या स्मृती उरती.

मथुरा-वृंदावन या महान् तीर्थक्षेत्रांना दिलेल्या भेटीमुळे मनाला तेजाची एक चकाकी लाभली आहे. मनातील कोपरा न् कोपरा पवित्र वातावरणाने व्यापून गेला आहे. ज्या पवित्र स्थळी भगवान श्रीकृष्णांचा जन्म झाला, त्या जागेला भेट देण्याचे परमभाग्य आम्हाला लाभले. तेथील धूळ मोठ्या श्रद्धेने कपाळावर लावली त्या ठिकाणचे नुसते भग्नावशेष पाहावयाला मिळतात. यमुनेच्या काळ्याभोर स्निग्ध पाण्यामुळे मातीला एक प्रकारची विशेष स्निग्धता लाभलेली आहे. भगवान श्रीकृष्णाच्या जन्मस्थळावर हिंदूंनी पूज्यबुद्धीने उभारलेली मंदिरे औरंगजेबाने कैकदा नाहीशी केलीत. इतकेच नव्हे तर कृष्णजन्मस्थळाच्या केवळ दोनचार हातच मागे औरंगजेबाने पश्चिमाभिमुख अशी टोलेजंग मस्जीद बांधली. तथापि श्रीकृष्णाविषयीची भक्ती जनमानसांतून कमी करण्याचा त्याचा आकस फलद्रूप झाला नाही. आणि होणार कसा ? केवळ हिंदूंचेच नव्हे तर अनेक भाविक मुसलमानांचे देखील भगवान श्रीकृष्ण हे प्रेमविषयक आराध्य दैवत होऊन बसलेले होते. या जन्मस्थळावरची माती श्रद्धापूर्वक मी कपाळावर धारण केली व तिचे काही कण घरीही आणले आहेत. ज्या कादंबवृक्षावर चढून श्रीकृष्णाने ज्याच्या शरीरावर बेभान आनंदाने थयथया नाचून त्या लोकजीवनशत्रू कालियाचे मर्दन करण्याकरिता यमुनेच्या डोहात उडी मारली, तो पुरातन वृक्षही आम्ही पहिला. त्या ठिकाणी झाडावर चढत असताना निर्माण झालेल्या पाऊलचिन्हांवर कोरलेल्या पादुकांचे सश्रद्ध अंतःकरणाने दर्शन घेतले. या वृक्षापासून कालियादह ही जागा काही फर्लांगावर आहे. कालिदहाच्या भागातील माती काळधाकुट्ट रंगाची आहे. यमुनाकाठचे गवत खुरटे पण पात्रात क्षणाक्षणाला हवेच्या झोताने लवलवणारी लव्हाळ्यांची संख्या अगणित. सध्या या ठिकाणचे यमुनेचे पात्र छोटे, तरी भयानक दिसते. कालियाच्या वास्तव्याच्या साहचर्यामुळे तेथील वातावरण रौद्रभयानकतेचा ठसा मनावर उमटविते तेथील सृष्टीसौंदर्यही अंतःकरणाला वेध लावणारे. याच त्या गाजलेल्या भागात दुष्टांचा

नाश व सज्जनांचे रक्षण करण्याचे जीवनदायी व्रत श्रीकृष्णाने सर्वसामर्थ्यानिशी सत्यं, शिवं, सुंदरम् याच्या वर्धनाकरिता पूर्ण केले. यमुनामाईच्या किनाऱ्यावरील पुरातनकाळापासूनचा यमुनेच्या प्रवाहाला समांतर असा कंसाच्या वाड्याचा उंच उंच कडा–काळाचे आघात व टक्केटोणपे खात उभा असताना आजही आढळतो. तेथून पुढे काही अंतरावर कंसनाशाच्याप्रीत्यर्थ बांधलेला प्रचंड विश्रामघाटही अवलोकिला. यमुनेवरील भव्य व कलादर्शी घाटाचे व यमुनेच्या पाण्यावर उठणाऱ्या चैतन्यदायी व स्फूर्तिदायक तरंगांचे दर्शन घेत घेत आम्ही यमुनेत नौकाविहार केला. यमुनेच्या प्रवाहाबरोवर आम्ही जसजसे जाऊ लागलो, तसतसे आकाशातील तांबड्या ढगांनी ईश्वराच्या रूपाचे मनोहर आकार व साक्षात्कार आमच्या चर्मचक्षूसमोर व अंतःचक्षूसमोर उभे केले. यमुनेचे पाणी क्षितिजाला भिडलेले आहे; असे दूरवर टाकलेल्या नजरेला दृश्य दिसत होते. यमुनामाईच्या चिंतनाने मी माझे सर्व नातेवाईकांचे, सुहृदांचे, कास्तकार व मजूरबंधूंचे अभीष्टचिंतन केले. माझ्या अभागी आईला मी जेव्हा मुक्ती चिंतिली; तेव्हा तर परमेश्वरविषयक व माताविषयक श्रद्धेमुळे माझे डोळे डबडबून आले.

कृष्णाच्या पवित्र लीला ज्या ठिकाणी झाल्यात, त्यांपैकी अनेक स्थळांना आम्ही आस्थापूर्वक व जिज्ञासू वृत्तीने भेट दिली. त्या लीलांच्या आठवणीने मन उचंबळून येते. रमण रेत पाहताना काय वाटले, हे शब्दबद्ध करता येणे भावनेच्या पलीकडचे आहे. नंद यशोदा या भाग्यवान् मातापितरांचे मंदिर पाहिले व त्यांना मनातल्या मनात आठवणींनी आलेली मूक श्रद्धांजली वाहिली. मथुरा वृंदावनाच्या असंख्य याचकात माझ्या मायचा भिरभिरत्या व व्याकुळ नजरेने शोध केला. पण खरोखरच माझ्या मातेला यमुनामाईने व गंगामाईने आपल्या तारक पोटात सामावून घेतलेले दिसते.

राधाकृष्णाच्या लीलांनी भारावलेली स्थळे आम्ही पाहिली. त्यांचे एकमेकांवरील अलौकिक प्रेम; एकमेकासाठी प्राणार्पणाची तयारी, त्यांचा दैवी विहार, त्यांची कूजिते व गुपिते यांनी समृद्ध झालेली व आशिर्वचलेली भूमी पाहिली. ज्या कृष्णाला राधेसारखी परमभक्त प्रेयसी मिळाली तो श्रीकृष्ण धन्य होय. त्यांचे आदर्श प्रेम हे समस्त विश्वातील लोकांना एक आदरणीय व मार्गदर्शनपर होऊन बसले आहे. श्रीकृष्णाच्या दर्शनाशिवाय ती अन्नाचा कण घेत नसे. त्यांची मनोभावाने पूजा केल्याशिवाय, पदसंवाहन केल्याशिवाय व आपल्या प्रेमळ विभ्रमांनी श्रीकृष्णाला सुखविल्याशिवाय ती पाण्याचा थेंबही घेत नसे. त्याच्या पायाला काटा रुतला तर वेदना तिच्या अंतःकरणाला व्हावयाची. इतका त्यांचा अभेद झाला होता, म्हणूनच त्यांच्या पवित्र व एकनिष्ठ प्रेमाचा आदर्श ठेवावयाचा. अत्यंत साधारण कुटुंबात जन्म घेतलेल्या राधा व कृष्णाने अजर व अमर अशी कीर्ति प्राप्त केलेली आहे एकदा आई–वडिलांना सोडून कृष्णभूमीत आल्यावरोबर ती पूर्णपणे वृंदावनाची झाली, व तिने आपल्या चरित्राने व चारित्र्याने गोकुळ निर्माण केले. श्रीकृष्णाच्या जीवनचरित्राला तिने स्फूर्ति देऊन श्रीकृष्णाप्रमाणे सगळ्या विश्वाच्या डोक्यावरील तो मुकुट बनली. राधा–कृष्णाच्या सरस, सुरस, रसमधुर, मधाळ व एकजीव मैत्रीविषयी जेवढे लिहिले तेवढे थोडेच. कारण त्याला नाही काही सुमार अथवा अंत. परमेश्वर हा अनंतच असणार व त्याची क्रीडाभूमी वसुंधरा ही देखील विपुल व बहुरत्नाच असणार. या भागात आम्ही भरपूर विचरलो. झाडेझुडुपे, फुलझाडे, लतामंडप, वापी, हौद, विविध रंगांच्या फुला–फळांनी मोहरलेली व डवरलेली झाडे, त्याचा सुगंध यांनी तात्कालिक घटनांचा जिवंत चित्रपट आमच्या डोळ्यासमोर उभा केला आणि साक्षात् तो पवित्र इतिहास. आणि चालू काळ किती खुरटा व क्षुद्र आहे हे त्याने दाखवून दिले. चेहऱ्यावर वात्सल्य, प्रेम, कळकळ ओथंबणाऱ्या–यशोदामाईची आठवण करून देणाऱ्या बाईमध्ये आम्हाला यशोदामाईचा साक्षात्कार झाला. तिच्याजवळचे मूल म्हणजे कृष्ण व तिचा यजमान म्हणजे नंद यांनी आम्हाला खाणावळीत इतके सुंदर, स्वादिष्ट गरमगरम पुऱ्यांचे, रवडीचे, बटाट्याच्या भाजीचे व सरसूच्या तेलातील मोहऱ्यांनी व हिंगाने सुगंधित झालेल्या लोणच्याचे जेवण दिले की त्यामुळे मथुरेच्या पौराणिक गोड स्मृतींना उजाळा मिळाला. आजही त्या पतिपत्नीचे स्निग्धमधुर संभाषण आठवले म्हणजे त्यांच्या मुखातून स्रवणाऱ्या पवित्र ब्रजवाणीमुळे मनाचा कोपरा न कोपरा उजळून जातो.

ब्रह्मावर्ताविषयी अनेक कारणांनी जिज्ञासा वाटत होती. म्हणून कानपूरला भारतसमाज सेवकांच्या अधिवेशनातील श्री. जवाहरलालजींचे दर्शन घेऊन आणि भाषण ऐकून कानपूरहून बिजलीवर चालणाऱ्या आगगाडीने ब्रह्मावर्ताकडे निघालो. काही अंतर एक्कयावर बसून पार करावे लागले. मार्गावर पडणाऱ्या फुलबागा, फळबागा, उसाचे मळे पाहून प्रसन्नता वाटली. शेवटी ब्रह्मावर्त या प्राचीन व ऐतिहासिक स्थळी व तीर्थक्षेत्री जाऊन पोचलो. गंगेचे एवढे विशाल पात्र ब्रह्मावर्ताशिवाय इतरत्र कोठेच पहावयाला मिळाले नसते. पण जंगलांनी वेढलेला भाग असल्यामुळे या ठिकाणचे गंगेचे पाणी गढूळ व मचूळ आहे. पात्राची रुंदी व पाण्याची खोली पाहून मात्र डोळे फाटतात. तेथे नौकाविहार देखील केला जात नाही. एखादाच निर्भय कोळी या तीरावरून त्या तीरावर नाव हाकारण्याचे धैर्य दाखवितो. कारण अनेक मगरी पाण्यामधून किनाऱ्यावरच्या जमिनीवर वा रेतीवर येऊन बसतात. मात्र या ठिकाणी गंगेवर बांधलेला घाट अत्यंत भव्य व प्रेक्षणीय आहे. घाटाच्या बाजूलाच महादेवाची व ब्रह्मदेवाची प्राचीन मंदिरे व त्यांचे उंच कळस लक्ष वेधून घेतात. येथूनच ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली असे म्हणतात. आणि म्हणून भारतात इतरत्र कोठेच नसलेले विधात्याच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केलेले भव्य पण साधे मंदिर व सृष्टिकर्त्याचे दर्शन घेण्याचे दुष्प्राप्य भाग्य लाभते. याच ठिकाणी ध्रुवबाळाची दुर्मिळ मूर्ती व त्याच्या पादुका यांचेही दर्शन घेता येते. ध्रुवबाळाच्या तेजस्वी डोळयाकडे पाहून मेरु पर्वतासारखा त्याचा अचल स्वभाव, निश्चयी डोळे व अढळपदाचे भव्योदात्त ध्येयासाठी धडपडणारे त्याचे मन दृग्गोचर होते. येथील देवालयाच्या बाजूच्या टेकडया तेथील दऱ्या व गुंफा अत्यंत प्रेक्षणीय असून अनेक साधुसंत तेथे देहदंडन व परमेश्वराचे स्मरण करीत ध्यानस्थ बसलेले दिसतात. महाराष्ट्रातील श्री. घाटे नावाच्या एका सत्पुरुषाचे येथे दर्शन होऊन त्यांच्या बरोबर संभाषणसुखाचा लाभ झाला. छोटेसे असलेले ते गाव दूध, मिठाई व फळफळावळ यांनी समृद्ध असलेले दिसले. वर्षातून दोनतीनदा तेथे यात्रा भरून त्या ठिकाणी हजारो भाविक, ब्रह्मयाच्या, महेशाच्या आणि ध्रुवबाळाच्या दर्शनाने उचंबळलेल्या मनाने आपल्या श्रद्धेचे समाधान करवून घेतात.

या ठिकाणी गंगेवर सीतामाईच्या नावाने उभारलेला भंस्मरणीय ओटा आहे. याला लागूनच असलेल्या घनदाट वनात सीतामाई परित्यक्त स्थितीत राहत होत्या. त्यांच्या स्मरणार्थ हे चिरंतन स्मारक आहे. या जागी चिरंजीव झालेल्या भगवान श्रीरामाच्या लव, कुश या चिरंजीवांचे पित्यावरोबर कर्तव्य—कठोर युद्ध याच भागात झाल्याचे लोक श्रद्धेने सांगतात. झाशीच्या राणी तांबेकुलोत्पन्न लक्ष्मीबाई यांचे बालपण ब्रह्मावर्तालाच व त्याच्याच परिसरात गेले. येथेच त्या घोडयावर बसणे, दांडपट्टा खेळणे शिकल्या. शौर्याचे, तेजस्वितेचे व युद्धकौशल्याचे दृढ संस्कार येथेच त्यांच्या मनावर झाले. त्यांच्याही नावाने गंगेवर एक स्मारक उभारलेले आहे. या निगडित पौराणिक व ऐतिहासिक घटनांमुळे माझ्या मनाला ब्रह्मावर्ताला अत्यंत मानसिक विश्रब्धतेचा अनुभव आला.

आणि ब्रह्मावर्त आधुनिक इतिहासात अजरामर झाले ते १८५७ च्या युद्धाने. स्वातंत्र्याची दुर्दम ऊर्मी असलेल्या हिंदू मुसलमानांनी आपल्या तलवारीचे तेजस्वी पाणी इंग्रजांना चाखविले. ब्रह्मावर्ताला कोणत्या विशिष्ट स्थळी वा ठिकाणी या चकमकी झडल्या आणि कसकसे घनघोर रणकंदन झाले; इंग्रजांची कशी त्रेधातिरपीट उडाली आणि त्यांची मुंडकी गंगेच्या प्रवाहावरोबर कशी वाहून गेली, याच्या चित्तथरारक प्रत्ययोत्पादक कथा—हा स्वातंत्र्यसंग्राम ज्यांनी आपल्या चमचक्षूंनी पाहिला अशा दीर्घायुषी एका बाबाजीने आम्हाला सांगितल्या. युद्धातला डावपेच म्हणून ब्रह्मावर्ताचा कानपूरवरोबर असलेला संबंध कसा तोडून टाकला होता आणि ब्रह्मावर्तला इंग्रज सैनिकांची आणि अधिकाऱ्यांची कशी कोंडी केली होती हे ऐकून भारतीय बहादुरांच्या पराक्रमापुढे माथा आदराने लवल्याशिवाय राहत नाही. जणू ते इतर भारतीयांना भगतसिंगाप्रमाणे असा संदेश देत होते—

दरो दीवार पर हसरतसे नजर करते हैं ।
खुश रहो अहले वतन हम तो सफर करते हैं ।।

कानपूर या खूप दूरवर आणि लांबवर पसरलेल्या अनियोजित ओबडधोबड आणि गलिच्छ वस्तीत काचेच्या एका परमेश्वराच्या मंदिराशिवाय दुसरे काही विशेष पाहण्यासारखे नाही. पण कानपूला गंगेच्या किनाऱ्यावर मात्र मन खूप रमते. गंगेवरील घाटाची रचना फार

सुबक व सुंदर आहे. घाटाच्या ४० ते ५० पायऱ्या उतरून गेल्यानंतरच गंगामाईच्या पाण्याच्या आचमनाचा लाभ होतो गंगामाईचे जल बर्फासारखे गार असल्याचे आढळले. नौकेतून विहार करीत करीत नावाड्याने आम्हाला त्या किनाऱ्यावर नेले. प्रवाहामधून जात असता चौफेर नजर टाकली असता चारी बाजूंनी गंगाजलाने आपल्याला वेढलेले आहे आणि आपल्याला गंगामाईच्या साक्षात् हृदयातच प्रवेश मिळाला आहे असे वाटते. आणि गंगामाईच्या जलावर उठणारे तरंग! ते पाहण्यात दृष्टीला एका अनिर्वचनीय सुखाचा लाभ होतो. खरोखरच गंगामाई जगन्नाथपंडितांना प्रातःस्मरणीय, चित्तशुद्धिकारक, पापांचा नाश करणारी, तारक व भव्य आणि उदात्त, कार्य करण्याकरिता स्फूर्तिदायी वाटावी अशीच तिची थोरवी आहे. त्याच ठिकाणी गंगेच्या किनाऱ्यावर घाटाच्या उच्च बिंदूवर परशुधारी भगवान परशुरामाचे मंदिर आहे. गंगेकडे दृष्टिक्षेप केल्यामुळेच परशुरामाच्या डोळ्यातील क्रोधाच्या ज्वाला विझल्या असाव्यात आणि स्फुल्लिंग निमाले असावेत. येथे शेजारी गंगामाईवर एक अतिविशाल सेतू बांधला आहे. पुलाखालून गंगामाईचे पाणी प्रपातासारखे धावताना आढळते. चौथाऱ्यावरून खाली कोसळताना निर्माण होणारा बर्फशुभ्र फेसाचा पुंजका पाहून जीवन असावे तर इतके उजळ, या भव्योदात्त ध्येयवादाचे नयनरम्य आणि तेजस्वी दर्शन घडते.

गंगामाईसंबंधी काहीतरी विशेष पवित्र आहे यात शंकाच नाही. गंगामाईच्या केवळ दर्शनानेही मनात आनंदोर्मी उठतात. तर गंगामाईच्या जलातील अवगाहनामुळे केवढचा ब्रह्मानंदाचा अंतःकरणात कल्लोळ उठत असेल, हा अनुभव ज्याचा त्यानेच घ्यावा. खरोखरच गंगामाईचा सहवास हा जेवढा घडला तेवढा तो अधिकाधिक हवाहवासा वाटतो. तिच्या दर्शनाची, स्तुतिस्तोत्रांची, तिच्या जलाच्या आचमनाची तिने दिलेल्या सत्कार्यस्फूर्तीची गोडी केवळ अवीट व एकमेवाद्वितीय होय.

जयगंगे—जय भागीरथी हा उद्घोष इतर उद्घोषासारखा तांत्रिक अथवा औपचारिक नाही. तर खरोखरच तो गंगेविषयीच्या अपार श्रद्धेने भिजलेला व थबथबलेला आहे. मृत्यूच्या वेळी तोंडात घेतलेल्या गंगोदकामुळे ऐहिक आधिव्याधींपासून मुक्त होऊन मुक्तीच्या अमृतत्वात विलीन झाल्याचा अनुभव आत्म्याला येतो, ते काही उगीचच नव्हे. नास्तिकातल्या नास्तिकाला, संशयात्म्यातल्या संशयात्म्याला विचार करायला लावण्याचे सामर्थ्य, कार्यप्रवृत्त करण्याचे आणि संशयनिवृत्तीचे सामर्थ्य देशाला सुजलाम् सुफलाम् करण्याचे अनंत सुप्त सामर्थ्य गंगेत आहे. अशा या गंगामाईला श्रद्धापूर्वक असंख्य आणि अनंत प्रणाम!

गङ्गा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा।
पापं तापं च दैन्यं च हरति श्रीपतेः पदम्॥

(पान १६४ वरून)

प्रौढ बाया, लहान मुले, विभिन्न लोक यांच्याकडे वामनरावांची सदाची ओढ आहे. आई लहाणपणीच त्यांना टाकून गेली. ती सरळ देवाघरी गेली असती तर दुःखाला निश्चिती आली असती. पण ती कोठे तरी जीवंत असणेही शक्य आहे. ईश्वराने तिला सोन्यासारखा पुत्र दिला. संपत्ती दिली. पण ते सर्व भोगण्याची जाण मात्र दिलीच नाही, कसला तरी भ्रम होऊन ती गेली. अजून तिची प्रकृती तशीच असेल का? कुठे? कशी? वामनरावांनाच नव्हे, मलाही ते प्रश्न अस्वस्थ करतात. नियती वामनरावांशी फार कठोर वागली. ते मात्र जगाशी सारे विसरून वागतात. प्रौढ बायांशी वागताना मात्र त्यांची आई त्यांना अस्वस्थ करते. आपली मुलेही ज्या झोंबीने आपल्याशी वागणार नाहीत ती जवळीक वामनरावांकडून त्यांना मिळते. लहान मुलांशी वागतानाही ते असेच रंगतात. त्यांना स्वतःला आईविना बाळपण भोगावे लागले. त्याची ती भरपाई असेल. विक्षिप्त म्हणजे जगावेगळी पण टिकाऊ जीवनमूल्ये जपणारी टाकाऊ माणसे रंगवण्यातही ते रस घेतात.

वामनराव! वामन इंगळे नावाचा एक लागट दोस्त आपल्याला आहे याची कधी कधी फारच जोराने जाणीव होते. त्याचे पत्र आलेले असते. "तुम्ही काटोलला या. की मी येऊ! तुम्हीच या." काय उत्तर द्यावे कळत नाही. त्यांच्या लेखनाला नक्की घाट येत चालला आहे. स्वभावही ठरत चालला आहे. तरीही अजून पुष्कळ घाटायचे आहे. अजून पुष्कळ ठरायचे आहे. आज फक्त एवढेच की वामनराव लिहीत आहेत.

कांतीयेच्या लीला

वामन इंगळे

एका माणसाच्या मनाविषयी बोलण्यापेक्षा एका गावाच्या मनाविषयी बोलणे कठीण असते. गावाचे मन म्हणजे त्यात राहणाऱ्या मनांची सरधोपट बेरीज नसते. एका मनाला आवरणे रामदासाला किती कठीण गेले हे आपणास माहित असते. परंतु तरीही आपण समाजाचे मन, गावाचे मन, अशा कल्पना मानीत असतो. कारण त्यांच्यात आरोग्यदायी आत्मगौरवाजवळच लोकशाहीतील काही नाईलाज (necessary evils) अगदी टेकून बसलेले असतात. काहीतरी गृहित मध्य केल्याशिवाय समूहांची आणि समूहासाठी लागणाऱ्या तत्त्वविचारांची धारणाच होऊ शकत नाही. हे प्रकरण भूमितीतील त्या लांबी रुंदी नसलेल्या रेषेसारखे असते. असे सामूहिक मन गृहीत धरण्यात प्रत्येक वेळी चूकच होईल असेही काही नसते. फक्त ते ज्या ठिकाणी व्यक्त झाले असे आपण समजू, त्याचा आलेख नेहमीच सरधोपट मार्गाने काढला जाणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. समूह अथवा समाजात एकात्मतेची शक्ति असते, त्याबरोबरच एकट्या माणसाइतकाच समूह चुका करू शकतो, या शक्यतेवर ध्यान असले म्हणजे आत्मगौरवातील दर्पाची नांगी आणि कृतक प्रदर्शने यांचा जाच टळू शकतात. आणि मग उरलेला आत्मगौरव हा एखाद्या क्रीडामग्न झऱ्याच्या पाण्यासारखा नितळ बनू शकतो. गाव करी ते राव न करी, हे ठीकच. पण सध्या आपण ज्या कारणासाठी king can do no wrong ला उडवून लावतो त्याच सगळ्या कारणासाठी समाजपुरुषाचे दोषही दाखविण्याचे धैर्य राखले पाहिजे.

जगप्रसिद्ध संत्रा

काटोल हे नाव उच्चारल्याबरोबर बहुतेकांच्या डोळ्यापुढे शेंदरी रंगाचे संत्र्याचे फळ उभे राहते. मुंबई–पुणेकर त्यालाच चुकून नागपुरी संत्रा म्हणतात. आता या फळाची लागवड अमेरिकेतही होणे काही अशक्य नाही. परंतु त्याचे खरे मूळ आहे काटोल आणि त्याचा परिसर. सैन्याने मरावे आणि नाव मात्र सेनापतीचे व्हावे असे हे आहे. काटोल हा प्रत्येक बाबतीत नागपूरचा लहान भाऊ आहे आणि काही बाबतीत तर हे छोटे भय्या सुभानअल्ला आहेत. पन्नास वर्षांनंतर माझ्या नातवाने राजस्थानातून संत्रा आयात केला तर मला नवल वाटणार नाही. कारण सायट्रससिला नावाचा रोग हे सुंदर पीकच नष्ट करीत आहे. सरकारी योजना आणि नवे संशोधन काय करील ते खरे. एरव्ही आर्य (!) देशांना राज्याबरोबर परकीय संस्कृतीची आयात करावी लागली तसेच हेही होईल.

पूर्व दिव्याची एक झलक

तुम्ही पुणेकर, मुंबईकर, औरंगाबादकर यांपैकी कुणीतरी असता. माझ्यासारखा एखादा ' गाईड ' तुम्हाला एसकर्शनसाठी घेऊन जातो. ' ही दुष्टबुद्धी प्रधानाची पेठ बुधवार. हा चंद्रहासाचा किल्ला. हा अर्जुनाने बाण मारून निर्माण केलेला अर्जुन नाला. ही जांब नदी. हिने हे सर्व महाभारत नयनसाक्षी केलेले. ' गाईड सांगत जातो. पण तुम्हाला आठवते की हीच चंद्रहास कथा बेंद्रयांनी आणि महादेवशास्त्र्यांनी दक्षिणेतली म्हणून सांगितलेली असते. हा शेवटी इतिहास संशोधनाचा विषय असतो. पण हे सर्व येथेच घडले असा येथल्या आबालवृद्धांचा समज असतो, यात मात्र शंका नसते.

मग डॉ. कोलत्यांची साक्ष देऊन कांतीयेची लीळा पुढे येते. ' हेच ते अन्नपूर्णेचे द्वीप. दहाव्या शतकात चक्रधर येथे आले. उघळीनाथांनी त्यांना

वयस्तंभिनी दिली. नंतर चक्रधरांनी रामटेकपंथे बीजे केले.' कांतीयेची लीळा तुमच्यापुढे साकार होऊ लागते.

वर्तमान रम्य मात्र नाही

एवढे पूर्वदिव्य असून रम्य भावी काळ कसा नाही ? असा प्रश्न येईल. अमेरिकेला तर पूर्व दिव्यच नाही. मग रम्य 'वर्तमान' काळ कसा ? हे त्याचे एक प्रश्नोत्तर. आज आपला संपूर्ण देशच जीवन-विषयक प्रश्नांनी गोंघळल्यासारखा झाला आहे, तेथे काटोलचा काय पाड ? भाळावर सदैव चितारेखा असणारा वसंत बापटाचा शेतकरी येथे आहेच. मजुरी फार वाढली हो. मजूर कामच करीत नाही, असे म्हणणारा मोठा शेतकरीही येथे आहेच. मागाहून एकाच वृक्षाच्या या दोन फांद्यांमधील अंतर सतत वाढवीत ठेवणारा हुशार राजकारणी आला, हे वेगळे सांगायची गरजच नाही. त्याबरोबरच स्वातंत्र्ययुद्धात आणि पाकिस्तानी आक्रमणाच्या वेळच्या युद्धात भाग घेणारे (कै. कॅ. प्रभाकर बारोकर, शहीद मेहेर) निष्ठावंत सैनिकही येथे होऊन गेलेत. काखेत प्रवाशी पिशवी अडकवून झेंडा ऊंचा रहे हमारा असे म्हणत फिरणारे सर्वश्री. गोविंदराव सराफ, मारोतराव चालखोर, शंकरराव, जीवनलाल आणि अरविंद बाबू हे त्यांपैकी विनीचे काही. स्वातंत्र्यानंतर लक्ष्य वदलले. मार्ग फुटले. जुनी एकता भंगली. तिने कधी तात्त्विक विरोधाची भूमिका घेतली. कधी हात मिळवणी. त्यात पुन्हा तिकिटे आणि सत्तेचा घोळ आला. हे सर्व झाले. यातूनही काही चांगले वर आलेच. काटोलच्याच परिसरातील श्री. बॅ. वानखेडे आणि श्री. शंकरराव गेडाम हे अनुक्रमे अर्थमंत्री आणि महाराष्ट्र काँग्रेसचे सचिव झाले. हा आनंद आपली आणि इथलीच माणसे इतकी मोठी झाली यावद्दलचा. परंतु त्याबरोबरच दैनंदिन प्रश्न बिकट होतच राहिले. अन्नधान्य आणि इतर प्रश्न गुंतागुंतीचे होतच गेले. देशातल्या एकूण स्थितीप्रमाणेच येथीलही समाजजीवनात अंतर्विरोध निर्माण व्हायचे थांबले नाहीत. आणि म्हणूनच समाजमनाचा आलेख हा एका सरळसोट रेषेने दाखविणे अशक्य.

चोरघडे हे वडील पुरुष

परंतु हे सर्व घडत असताना सांस्कृतिक संचिताचा अंतःप्रवाह त्याचवेळी वहात होता. समाज गोंघळला तरीही त्या स्थितीचे (स्वतः लेखकाने न गोंधळता) केलेले सच्चे आलेखन दिसू शकते ते कोणत्याही श्रेष्ठ साहित्यात आणि कलाविष्कारात. या दृष्टीने श्री. वामनराव चोरघडे हा या परिसरातील वडील माणूस. आम्ही गेल्या पिढीतील मराठी कथेला पाचापैकी एक पांडव पुरविला हा आमचा अभिमान अर्थातच अनाठायी नाही. जुनी समाजमूल्ये आणि नवीन मूल्ये यांतील मधल्या काळाचे चित्रण वामनरावांनी केले. त्यांची भागावुढी आणि चंदनाच्या खोडामधील म्हातारी ही त्याची उदाहरणे. प्रादेशिकतेतूनही विश्वात्मकतेकडे प्रवास, हा त्यांच्या कथांतील व्यक्तींचा स्वभावधर्म.

चोरघडयांच्याच जोडीला सर्वश्री वसू भगत प्रा. मधुकर लोही, सौ. लीला श्रीवास्तव, अविनाश वरोकर, वैकुंठराव इंगळे, यशवंत मनोहर, नीलकांत ढोले, सुलभा केने, सौ. सुमतीबाई भांडारकर या लहान मोठया साहित्यिकांनी काटोलचे हे सांस्कृतिक लोण कमीजास्त प्रमाणात महाराष्ट्रभर पसरविले. (त्यात पुन्हा 'वसंत' मासिकाचे एक लेखक श्री. मा. रा. आठवले हेही या दोन महिन्यांपासून नोकरीनिमित्त येथे आले आहेत.) या सर्वांची कलात्मक ताकद कमीजास्त आणि क्षेत्रेही भिन्नभिन्न आहेत. परंतु चक्रधर आणि महाभारत कालाशी सांस्कृतिक सांधा जोडतोच म्हटले तर तो या मंडळीचा एक वेळ जोडताही येईल. परंतु भोवतीचे समाजमन मात्र नवनव्या प्रश्नांनी विचकलेले, काहीसे मवाळ आणि पारंपरिक असेच आहे, असे दिसून येते.

संगीत नाट्य आणि चित्र

संगीत आणि चित्रकला याही क्षेत्रात काटोलच्या काही कलावंतांनी वेगळे स्थान निर्माण केले आहे. सर्वश्री रामकृष्णराव तिवसकर आणि रामराव देशमुख हे त्यांपैकी अखिल भारतीय कीर्तीचे. सर्वश्री विघे, वेखंडे आणि अनिल खोना ही चित्रकार मंडळी पुढेमागे तीच पाऊलवाट चोखाळतील. परंतु संगीत आणि नाट्य क्षेत्रातील दृश्य यापेक्षा जरा वेगळे आहे. सर्वश्री अल्काझी, चितामणराव कोल्हटकर आणि अरविंद देशपांडे या मंडळींचा सहवास लाभलेले श्री. बाळासाहेब विघे हे गुणी नट आणि कल्पक दिग्दर्शक आहेत. 'रसरंगकलामंदिर' आज आहे त्याच चालीने चालले

तर त्याला 'रंगायन' आणि 'रंजन कला मंदिर' या संस्थांचा नावलौकिक प्राप्त होणारच नाही असे नाही. महाराष्ट्रात बिसमिल्लाएवढा सनईय्या झाला नाही. हे खरे. परंतु त्यांच्यानंतर ज्यांचे नाव घ्यावे लागेल त्या घोंगडुवुवा गायकवाडांनी जांबेच्याच तीरावर पहिले धडे घेतले. तिरखवाँ आणि भीष्मदेवांचा संयुक्त बाज डौलात वाजविणारे सुप्रसिद्ध तबलिये बालमास्कर तिवसकर यांनी मूळचा बाज काटोलच्या परिसरातूनच उचलला. महाराष्ट्रात बासरीवादक बोटावर मोजण्या-इतके. त्यांपैकी श्री. पट्टलवारांना काटोलनेच नागपूर नभोवाणीच्या ओटीत घातले. त्याशिवाय सर्वश्री करमरकर, देवघरे, काळे, दामुआप्पा, रामेश्वरआप्पा, नत्थूमामा काटोलचे संगीत विश्व.

काटोलचा खरा आत्मा दंडारी आणि लावणीबाज

परंतु शास्त्रीय संगीत हा झाला खास उच्चवर्गीय आणि मध्यवर्गीय षोक. वहुजनांचा तो मार्ग नव्हे. काटोलचा परिसर गणगौळणी आणि लावण्यांनी निनादतो तो ऐन दिवाळीच्या मोसमात. त्या दोन दिवसात वातावरण ढोलकीच्या आवजांनी आणि 'ज्वांनी माझी मारते लहरा…'च्या शृंगारिक छक-डचांनी भरून जाते. पंचमीच्या दुसऱ्या दिवशी कै० गुलाबराव देशमुखांचा वाडा खच्च भरून निघायचा. त्या दिवशी गुलाबरावांच्या रसिकतेला उधाण पूर यायचा आणि हजार दोन हजार रुपये लावणीकारांना सहज प्रसादासारखे वाटले जायचे. सर्वश्री. कै. गणपतराव डंगळे, पांडुरंग पुंजे, करीमुद्दीन काझी, नॅमदमियाँ हिरामणजी, वलांसे, नारायणराव चरडे, नामदेवराव खाती ही त्यांपैकी काही बिनीच्या कलावं-तांची नावे. परंतु आज या लोककलेला पूर्वीसारखे दिवस राहिले नाहीत. शास्त्रीय संगीताला जसा थोडा फार सरकारी आश्रय मिळाला तसा काटोलात तो या कलेला मिळाल्याचे दिसत नाही. शिवाय सुशिक्षित माणसाचे काही शिष्ट भ्रम आड येतात. त्याला शास्त्रीय संगीताची बैठक (बहुधा) जशी आवडत नाही तसेच तो या जानपद काव्याकडे काहीशा हलक्या नजरेने पहातो. (स्वतः मात्र एखादे वात्रट सिनेमातले स्वस्त गाणे गुणगुणतो.) राजकारणी माणसाची तऱ्हा तिसरीच. त्याला निर्जीव आणि वटवटीत का होईना पण प्रचाराचे पोवाडे हवे असतात. अशा वटवटीत प्रचारी शब्दजुळवणीपेक्षा निरोगी शृंगारावर आधार-लेल्या लावणीचा सूर मानवी आत्म्याशी अधिक संवाद साधतो हे त्यांना पटतच नाही. देशप्रेमाची तोंडी उजळणी करणाऱ्यांचा हा खोटा दृष्टिकोन बदलेल त्याच दिवशी या कलेला चांगले दिवस येऊ शकतील. आज ती शेवटचे आंचके देत आहे हे मात्र खरे.

येत्या संमेलनापासूनच्या अपेक्षा

काटोलचे हे कलासंस्कृतीविश्व जसे एका अबोधातून येते तशीच त्याची जाण विशेषतः शिक्षित माणसालाच नाही असेही दिसून येते. शब्द, सूर, नाट्य, शिल्प म्हणजे नुसती वेळ काढण्याची साधने आहेत आणि त्याची महत्ता राजकारणावगैरेपेक्षा कमी आहे असा अनाहुत तुलनेचा दृष्टिकोन व्यर्थच निर्माण होतो. खरी समाजसेवा आणि खरी साहित्य–संगीत–साधना यात मानवी जीवनाच्या संदर्भात तरतम मूल्य-भाव संभवूच शकत नाही. ती मानवी जीवनाची सम योग्यतेची अंगे आहेत. परंतु खोटी समाजसेवा आणि खरी साहित्यसंगीत साधना (आणि व्हाईस व्हर्सा) यात मात्र तुलना होऊ शकेल आणि सच्चे ते सच्चेच राहील यात संशय नाही. येत्या साहित्य संमेलनामुळे साहित्य कलेकडे पाहण्याचा असा निरोगी दृष्टिकोन शिक्षितात स्थिरपद होऊ शकला आणि मराठीच्याच घरी मराठीचा वनवास टळू शकला तर संमेलनाची खरी फलश्रुती साधली जाऊ शकेल. सर्वांप्रमाणेच मराठी मनेही संकटात एक होतात ही गोष्ट खरी आहे. परंतु सांस्कृतिक एकता शोषण्यासाठी नेहमीच संकटांची गरज पडू नये. अशी निरपेक्ष आणि सावकालिक एकात्मता येत्या संमेलनाने निर्माण होण्यास मदत होऊ शकली तर दुधात साखर पडली असे समजायचे. संमेलन यशस्वी होऊन कांतीयेच्या लीळांचा वाङ्मयीन सुगंध दिगंत पसरो अशी सदिच्छा आहे.

मुहूर्त व जन्म–कुंडली

पानिपतच्या पराभवाविषयी, जे तर्क–वितर्क केले गेले त्यात एक तर्क असा आहे की प्रथमावस्थेत अबदालीला हतबल करण्याएवढे सामर्थ्य असताना, मुहूर्तापायी मराठ्यांनी जवळपास दोन महिने घालवले. तोवर शत्रूने, चोहोबाजूने मराठ्यांची रसद कापली. चारा–पाण्याच्या अभावी "कितीक" घोडी व्यर्थ हातून गमावली. शेवटी त्रस्त होऊन, अग्नि–कुंडात उडी टाकावी तशी मराठ्यांनी चढाई केली. शर्थीने लढून प्राण पणाला लावले. शेवटी अपजय टळला नाही.

अनुष्ठाने, ब्राह्मण-भोजने अशा धार्मिक कृत्यांच्या अवडंबरात फाजिल वेळ जातो व पर्यायाने राज-कारणाकडे लक्ष द्यावे तसे पेशवे देत नाहीत म्हणून अनेक वेळा, त्यांच्या हयातीत, रामशास्त्री प्रभुण्यांनी पेशव्यांचे कान टोचल्याचे दाखले आहेत.

महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदारांनी मराठ्यांच्या इतिहासावर बोलताना, नाना फडणिसांनी, मोहिमेत यश मिळावे म्हणून, वाईच्या गणपतीला व इतर देवतांना नवस बोलल्याबद्दलचे हिशेबाच्या कागद-पत्रांचा उल्लेख, वेळीवेळी केला आहे. मोहीम जिंकली गेली तर हिशेबाच्या त्या मोहिमेबाबतच्या खर्चाच्या तक्त्यावर "घडले" व एरव्ही "घडले नाही" अशी स्वाक्षरी नाना फडणिसानी लिहिली आहे, असे आढळले आहे.

कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांच्या, या विषयावर लिहिलेल्या, एका लेखाच्या प्रारंभी "वेणीसंहार" या नाटकातील एक श्लोक उद्धृत केला आहे. त्याचा अर्थ असा की, ग्रहांचे योग, शकून, अपशकून, यांचे फळ काकतालीय न्यायाने मिळते. वास्तव, जाणते पुरुष प्रतिकूल ग्रहमान असले तरी त्यामुळे भयभीत होत नाहीत.

शास्त्रिबोवा पुढे म्हणतात, "ग्रहाचे योग तर चोहोकडे शुभावह अथवा अशुभावह मानलेले असून, आमच्या देशात तर त्यावाचून काहीही चालत नाही. स्वयंपाक–घरात चुली घालण्यापासून तो मोठ्या मोहिमेस बाहेर पडण्यापर्यंत ग्रहांचे अनुकूल्य अगोदर करून घ्यावे लागते. एकतर, शकून–अपशकून म्हणजे सारी भ्रांती. त्यातून त्यास यदृच्छेने घडू न देता अपशकुनास पिटाळून लावून चांगल्या शुभ अशा शकुनास मुद्दाम कैद करून आणून, पुढे उभे करणे व तसल्या मारून मुटकून आणलेल्या शकुनाचे शुभत्व मानणे म्हणजे मूर्खपणाची सीमा झाली. अशा प्रकारच्या नानाविध निरर्थक निबंधांनी, वेळ व पैसा यांचा व्यय होऊन, कार्यास पुष्कळ मोठा व्यत्यय घडतो व वेडेपणाची शुष्क भये मनात माजतात."

कै. नरसोपंत केळकरांनी आपल्या याच विषयावरील एका लेखात म्हटले आहे की

"मोंदूनी फसवावे आणि दुधखुळ्यांनी फसावे असले अनेक प्रकार जगात आहेत, त्यातलाच एक प्रकार "भविष्य–कथन" हा होय. उठल्या सुटल्या ज्योतिषापुढे पत्रिका टाकून किंवा हात

पसरून, भविष्य-कथनाची याचना करणाऱ्या शंभर लोकांपैकी, एक मनुष्य तरी ज्योतिषा-पासून होणाऱ्या भविष्य-ज्ञानामुळे सन्मार्गाला लागलेला सापडेल की नाही याची शंकाच वाटते."

मी, अमरावतीस असताना, कै. दादासाहेब खापर्डे यांच्या दरबारात वरील विषय निघाला असताना ते म्हणाले,

"अहो, एरव्ही करती-सवरती माणसे असल्या भोळ्या भावनेने कमकुवत बनतात हा एक भाग व स्वार्थी माणसे अशा भावनांचा फायदा घेऊन आपले भरपूर कल्याण साधतात हा दुसरा भाग. हुंड्याच्या हव्यासाच्या आहारी जाऊन एरव्ही उत्तम लौकिक असणारी माणसे, कधी उघड तर कधी कावेबाजीने, मुलीला मंगळ आहे म्हणून भरपूर हुंडा न देणाऱ्या तिच्या आई-वडिलांना निराश करतात व १०० तोळे सोने अथवा तत्सम भक्कम हुंडा देणाऱ्याची मंगळाचीच मुलगी हसत हसत पत्करतात, असा अनुभव आहे."

असे आहे आमच्या महान् भरत-खंडात शुभ-अशुभाचे सोंग व स्वभाव-वैशिष्टय.

पत्रव्यवहार

संपादक, युगवाणी यास,

स. न. वि. वि. आपल्या ऑगस्ट १९६६ च्या अंकात पृ. १२८ वर श्री. र. द. सरंजामे यांच्या सहीखाली "कुंभेरांच्या लढाईत मल्हारराव होळकरांना वीरमरण आल्यावर" इत्यादि मजकूर आला आहे. यात अनवधानाने नावाची चुकी झालेली दिसते. अहल्यादेवीच्या पतीचे नाव खंडेराव हे होते व त्यांना १७५४ मध्ये वीरमरण आले. त्यांचे वडील मल्हारराव होळकर हे २० मे १७६६ रोजी अलमपूर येथे वारले. वरील कुंभेरीचा प्रसंग मोठा भीषण आहे. ते सूरजमल जाटाविरुद्ध युद्ध होते व ते ४ महिने लांबले. या वेळी खंडेरावाबरोबर त्याच्या तीन पत्न्या व ७ रखेल्या सती गल्या. अहल्याबाई तेवढी मागे राहिली. तिला मालराव नावाचा मुलगा होता, तो पुढे १७६७ त वारला. (आधार न्यू. म. हिस्टरी, खंड २). कृपाकरून पुढील अंकात दुरुस्ती करावी.

घनतोली, नागपूर
दि. ६-८-६६

दे. गो. लांडगे

पुस्तक परीक्षण

बारा गावचं पाणी

ले.–श्री. वसंत बापट, प्रकाशक : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, किंमत रु. ७–००

'बारागावचं पाणी'—लेखक आहेत कवी श्री. वसंत बापट; वर्षभरात ३६ हजार मैलांचा प्रवास–'देशाची यात्रा, दिशांची यात्रा; चारीधाम यात्रा!' या दिगंत यात्रेत बापट कृतार्थ झाले!

त्यांनी जे पाहिले, जे मनी साठवले, जे डोळयांनी टिपले ते सर्व शब्दमय केले. नाव आहे 'बारागावचं पाणी.' पण आहे तेरा स्थळांचे वर्णन! 'डोळे उघडले, नवे फुटले'—त्यातूनच हे सगळे घडले. 'या प्रचंड चित्रात काही बिंदू पक्के ओळखीचे झाले' ते त्यांनी रसिकांना दाखविण्याचा यत्न केला. श्री. बापट यांची या भ्रमंतीमध्ये कुठे निराशा झाली, कुठे त्यांना आनंद झाला, कुठे डोळे पाणावले, कुठे ते न कळत नतमस्तक झाले. आणि हे सगळे शब्दमय करण्यात कुचराई मुळीच नाही. एक गद्यकाव्यच निर्माण झाले आहे या तेरा गावांवर!

रामेश्वराचे दर्शन घेतले पण त्यांना रामेश्वर दिसला नाही. बापटांना शंका आली—रामेश्वर वस्तीला असतील का? आणि मग त्यांची कल्पना, काय झाले असेल रामेश्वराला, यावर भरारी मारू लागली.

'माझ्या कल्पनेप्रमाणे त्याने रामाप्रमाणेच पाण्यात उडी घेतली आहे. समुद्रसंगमात तो अंतर्धान पावला. आता पाण्याच्या अगदी तळाशी उसळत्या पाण्याचेच शिवलिंग कोणा मोतीवेच्याला दिसले तर त्याने हातातली मुक्तांजली त्याला वाहावी,' अशी श्री. बापट विनंती करतात.

डुप्लेचा पुतळा पाहून त्यांना वाटले, 'कोणत्याही हेस्टिंग्ज–डलहौसीसारखाच हा साम्राज्यलोलुप पण पराभूत म्हणून किंचित हुतात्मा वाटणारा! समुद्राकडे पहात त्यांची पाषाणमूर्ती उंच चवुतऱ्यावर उभी आहे' श्री. बापट म्हणतात, पण तुम्ही त्याच्यावर रागावू नका. 'डुप्ले! तुझ्यावर आमचा राग नाही. पण एकच गोष्ट मनात येते: आमच्या राज्यकर्त्यांची आणि म्हणून 'ऐतिहासिक' ठरलेली ही पाषाण स्मारके फोडण्याचा आग्रह वेडेपणाचा असेल; पण थारेपालट म्हणून असल्या चार डुप्लेंच्या माथ्यावर एका स्वातंत्र्यवीराचा पुतळा उभारायला काय हरकत आहे!'

असा सुवर्णमध्य आजपावेतो कुणी सुचविल्याचे माझ्या ऐकण्यात नाही—वाचण्यात नाही.

आपल्या ज्या काही धार्मिक कल्पना आहेत, आचार आहेत, ज्या प्रथा आहेत—रुढी आहेत त्या बापटांना पटत नाहीत. ती भावना, ती श्रद्धा त्यांच्या ठिकाणी नाही, असे तेच म्हणतात. काशी पाहून त्यांना उबग आला. गंगेचे दर्शन त्यांना आनंद देऊ शकले नाही. गंगेचा उपयोग ज्याप्रकारे केला जातो ते सर्व प्रकार त्यांना घृणास्पद वाटले. पण श्री. बापट यांच्यामध्ये त्या पूर्वापार श्रद्धा नसल्या तरी त्यांचे अंतःकरण श्रद्धामय आहे. यात्रेकरूंच्या श्रद्धा अंध तर श्री. बापट यांची डोळस! म्हणूनच जेथे जेथे त्यांना सौंदर्याचा साक्षात्कार झाला तेथे तेथे ते नमले आहेत—गहिवरले आहेत.

कन्याकुमारीच्या दर्शनाने व तेथील तीन समुद्रांच्या संगमाने कवी बापट असेच भारावले—

'मध्यरात्री कन्याकुमारीच्या समुद्रापाशी उभा राहिलो मात्र, उगीचच डोळे भरून आले. असे वाटले, समुद्रस्नान न करणारे आपण मूर्ख आहोत. आपल्या अंगाला खोटया सभ्यतेची घाण येत आहे. आपण नास्तिकतेचे ढोंग करीत आहो. निदान या देशावर तरी आपली अपार निष्ठा आहे हे जर खरे तर इथल्या समुद्रात प्रवेश केल्याशिवाय ही जागा सोडणे पाप नाही का?.....इथे मुलापेक्षा मूल व्हायला,

कणातला कण व्हायला, अहंकाराचे ओवळे बाजूला ठेवायला काय हरकत आहे? ब्रम्हपुत्रेने, गंगेने, यमुनेने माझ्यावर आपली पुण्यशील मोहिनी घातली नाही; पण या समुद्राने माझा सगळा पीळ उलगडून टाकला. रात्री बारा वाजता केलेल्या त्या समुद्र-स्नानाची आठवण विसरणे अशक्य आहे. सायंकाळी आपण खोटचा अभिमानाने तीर्थस्नान टाळले, या अनुतापाने, प्रायश्चित्तबुद्धीने, देशाचे स्मरण राम-नामासारखे करीत स्वतःला खुशाल भावनावश होऊ देत केलेले हे स्नान माझ्याकडून पुन्हा घडेल असे वाटत नसल्याचा', निर्वाळा श्री. बापटांनी दिला आहे.

कन्याकुमारीची मूर्ती सर्वच बघत असतील पण बापटांना जे दिसले ते कुणाला दिसले असेल, असे वाटत नाही. कारण तसा पुरावा नाही—श्री. बापट म्हततात :

'देवळातून बाहेर पडलो त्यावेळी ही लक्ष्मी किंवा पार्वती किंवा सरस्वती किंवा अमुकच नाव धारण करणारी मूर्ती मी पाहिली असे मनातही येईना. इतकेच नव्हे तर, ही माया, ही शक्ती असलाही विचार ठरेना. माझे, तुमचे, आपणा सर्वांचे शैशव एकत्र साठ-वून घडवलेली कोणा कल्पकाची एक कल्पना हेच या देवीचे रूप. अशी बालभावाची देवता आणखी कोठे असेल असे वाटत नाही.'

असे व अशा प्रकारचे भावनांना आवाहन देणारे, डोळे पाणवणारे, गतवैभवाचे दर्शन घडविणारे कित्येक प्रसंग बापटांनी या पुस्तकात शब्दरूप केले आहेत.

मांडूगड म्हणजे बाजवहाद्दुर व रूपमती यांच्या प्रेमाचे प्रतीक ! श्री. बापट ते मानतात. पण त्यांना मांडवगड दिसतो तो 'रणचंडीचा आवास आणि कामी जनांचा विलास' या स्वरूपात ! 'दक्षिणतटावर एकीकडे रूपमतीच्या दर्दभरी कहाणीने डोळे पाणाव-तात तर दुसरीकडे दिसत राहते ते नेमाडचे अफाट मैदान, थेट नर्मदेपर्यंत. दूरवर महेश्वराचे दर्शन घड-विणारे, जवळ पाहिले तर गपकन् हृदय खाली पडेल अशा उभ्या कडयाखाली असलेले. मांडवगडच्या दक्षिण तटाखाली बाराशे फुटांचा सरळ पहाड आहे. असे सांगतात की, महंमदखान बंगश या दक्षिण तटावरून खाली मैदानात नजर लावून उभा होता. मैदानात मराठयांचा सेनासागर शाही फौजांवर कोसळत होता. त्याच्या अग्रभागी होता शुभ्र घोडयावर स्वार बाजी-राव बल्लाळ पंतप्रधान. त्याची ऐट, त्याचे तेज, त्याची चपळाई, त्याची डौलदार हालचाल पाहून, त्याच्या तलवारीचे ते तांडव पाहून बंगश म्हणाला— 'लाहोल कुवत ! बिरहमन होते भी क्या शमशेर चलाता है !' हे खरे का खोटे इतिहास जाणे. पण आज त्या मैदानाकडे पाहताना आपल्याला जाणवते की उत्तर आणि दक्षिण यांच्या मध्यरेषेवर आपण मोर्चाच्या जागी उभे आहोत; बाजबहादुराच्या आणि रूपमतीच्या विलासाचे स्वर आपल्याभोवती रेंगाळत आहेत. पण दक्षिणच्या मैदानावरून उत्तरेकडे सरकत आहे मराठी पराक्रमाची धगधगती आग. परमार-पवारांच्या या चित्रदुर्गावरून ही आग, तिच्या ज्वालेचे ते शुभ्र शिखर पाहणे हा एक अनुभव असल्याचा निर्वाळा बापटांनी दिला आहे. आणि म्हणूनच 'यासाठी तरी मांडवगडला गेलेच पाहिजे' असा त्यांचा 'सांगावा' आहे.

उदेपूरचा 'उदे उदे' लक्षात ठेवण्यासारखा आहे. उदयपूरचा 'अस्त' कधी झाला नाही, 'शिसोदे रजपुतांचा आणि गाडी-लोहारांचा पराभव कधी झालाच नाही.' हे काही खोटे नाही. ज्यांची जिद्द कायम त्यांना जय हा मिळणारच. म्हणूनच बापटांनी म्हटले—'पण अपयशानंतरही ज्यांची जिद्द जिरत नाही, ज्यांचा हट्ट पेटून उठतो, ज्यांचे अंकुरही विद्रो-हाच्या खतपाण्यावर फोफावतात त्यांचा, म्हणजे त्यांच्या तेजाचा पराजय कसा होणार ?'

'जनानी जयपुरी', 'सौंदर्यतीर्थ कोणारक', ह्या-विषयी केलेले वर्णन वाचण्यासारखे आहे. श्री. बाप-टांनी शब्दाची किमया प्रत्येक प्रवास वर्णनात प्रकट केली आहे; 'शब्दशिल्प' उभे केले आहे.

अशी ही श्री. वसंत बापटांची मुशाफरी ! प्रत्येक गावचे त्यांना वेगवेगळे पाणी दिसले. त्यांनी मनाचीं कावड भरून घेतली. 'डोळयांच्या शिपलीत' ते मावेना. म्हणून ते म्हणतात, 'ते अंगातच भिनले.' त्याने बापटांना 'बडबडायला' लावले हेही एक वेडच ! 'जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे' हे काहीं खोटं नाही. त्यांनी हे 'वेड' श्रोत्यांमध्ये, वाचकांमध्ये वाटून देण्याचा मार्ग चोखाळला.

'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाळ'— हेच खरे !

—न. दि. घारपुरे

संपादकीय—

ह्या अंक वस्तुतः केशवसुत विशेषांक निघायचा. परंतु ह्या पुढील अंक म्हणजे ऑक्टोबरचा अंक केशवसुत विशेषांक निघेल. केशवसुतांच्या जन्मदिनाची तारीख ऑक्टोबरात नक्की झाली आहे. तेव्हा त्याच महिन्यात जन्मशताब्दी विशेषांक काढणे उचित. विदर्भ साहित्य संघाच्या विशेष कार्यक्रमात एक कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. कवींनी एक केशवसुतांची कविता वाचून तिच्यावर भाष्य करायचे आहे. हे भाष्य आणि ती कविता आम्ही विशेषांकात प्रकाशित करणार आहोत. कार्यक्रम दि. २ ऑक्टोबराला असल्यामुळे अंकाचे प्रकाशन दोन ऑक्टोबरला करावे असे ठरविले आहे. विशेषांकाच्या निमित्ताने आमच्याकडे काही लेख कितीतरी आधी आलेले होते. त्या लेखकांनी दर्शविलेल्या तत्परतेबद्दल आणि त्यांच्या सौजन्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

* * *

पांडित्य आणि संशोधन ह्या दोन्ही क्षेत्रात विख्यात असलेले नागपूरचे म. म. नानासाहेब मिराशी ह्यांना यंदाच्या स्वातंत्र्य समारोहाच्या समयी संस्कृत पंडितांना लाभणारा महान पुरस्कार लाभला ह्याबद्दल गुरुवर्य नानासाहेबांचे अभिनंदन. अध्ययन आणि अध्यापन आणि त्याच्या जोडीला संशोधन ह्या क्षेत्रात नानासाहेबांनी आपले आयुष्य वेचले आहे. कुठलाही अभिनिवेश न स्वीकारता त्यांनी संशोधनाच्या कार्यातं मौलिक कामगिरी केलेली आहे. आणि विशेष गोष्ट ही की, भावी संशोधकांना दीपस्तंभासारखे वाटणाऱ्या नानासाहेबांनी आपले मोठेपण चांगले पचविले आहे. त्यांच्या सान्निध्यात वावरणाऱ्या मंडळींना त्यांच्या मोठेपणाचा ताप कधीच सहन करावा लागला नाही. उलट एका प्रसन्न व्यक्तिमत्वाचा वावर आपल्या आसपास आहे ह्याचा आनंदच सर्वांच्या वाट्याला आला आहे. एवढ्या वयातही त्यांचा कामाचा उरक आणि त्याग पाहिला असता नवल वाटते. नानासाहेबासारखा प्राध्यापक विरळा. Let his tribe increase असे म्हणताना आम्ही प्राध्यापकाचा अधिक्षेप करतो असा आरोप आमच्यावर येऊ नये.

* * *

ह्या अंकात श्री. जयंत परांजपे ह्यांचा एक प्रदीर्घ लेख दिला आहे. पिढ्यान् पिढ्या वाङमयप्रेम असलेली काही कुटुंबं असतात. जयंत परांजपे तसल्याच एका कुटुंबातला. त्याच्या '१९४५ नंतरच्या मराठी कवितेचे नवे स्वरूप' ह्या लेखाला मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचा पुरस्कार लाभला आहे, हे येथे नमूद करणे अवश्य आहे.

* * *

सप्टेंबरमध्ये काटोलला संमेलन भरणार आहे. त्या निमित्तानं 'काटोल'वरचा एक लेख, श्री. वामन इंगळे ह्यांच्या सिद्ध हस्तातून उतरलेला, ह्या अंकात दिला आहे. श्री. वामन इंगळे ह्याजवरील प्रा. मधुकर केचे ह्यांचा लेखही ह्याच अंकात असल्यामुळे एक औचित्य साधले गेले असे म्हणण्यास प्रत्यवाय असू नये.

अनुक्रमणिका

संघवार्ता

बापुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ, यांजकडून

सांस्कृतिक समिती

लो. टिळक पुण्यतिथीनिमित्त दि. १ ऑगस्ट ६६ रोजी सायं. ६-३० वा. वि. सा. संघ धनवटे रंगमंदिरात म. म. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांचे 'लो. टिळक आणि सशस्त्र क्रांतीची चळवळ' या विषयावर भाषण झाले.

कवी "बी" (कै. ना. मु. गुप्ते) स्मृतिदिनानिमित्त मंगळवार दि. ३० ऑगस्ट ६६ रोजी सायं. ७ वाजता सुप्रसिद्ध कवी श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांचे उपस्थितीत प्रा. सौ. उषाताई लिमये यांचे व्याख्यान झाले.

नाटय समिती

दि. १४ आणि १५ ऑगस्ट ६६ रोजी अनुक्रमे दुपारी ४ वा. आणि दुपारी २ वाजता श्री. रंगनाथ कुळकर्णी (मुंबई) यांनी 'सुरईतला राक्षस' हा ८ ते १४ वर्षे वयाच्या मुलामुलींकरिता एकपात्री साभिनय कथाकथनाचा कार्यक्रम सादर केला.

शुक्रवार दि. २६ ऑगस्ट ६६ रोजी सायं. ६-३० वा. नाटयाचार्य कृ. प्र. खाडिलकर स्मृतिदिनानिमित्त प्रा. रू. पां. पाजणकर यांचे व्याख्यान झाले.

साहित्य गोष्टी—

दि. २७ जुलै ६६ रोजी रात्री ८ ते ११ पर्यंत गडकरी सभागृहात 'साहित्यगोष्टी'तर्फे 'कवितामैफिल'चे आयोजन करण्यात आले. यावेळी एकूण २६ कवी-कवयित्रींनी भाग घेतला.

आजीव सभासद—

श्री. महादेवराव घोटे, गोंदिया, हे वि. सा. संघाचे आजीव सभासद झाल्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

अनुक्रमणिका

शाखावृत्त

वर्धा शाखा

वर्धा येथे वि. सा. संघाची शाखा स्थापन करण्यात आली असून दि. ४ मे ६६ रोजी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते यांचा शाखेतर्फे साकार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. एम्. एम्. शाह यांनी भूषित केले. यावेळी शाखेच्या नवीन कार्यकारिणीचे उद्घाटन करण्यात आले.

इ. स. ६६–६७ करिता शाखा कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

अध्यक्ष—प्रा. देवदास सोटे, **उपाध्यक्ष**–प्रा. मधुकरराव वर्णेकर, **सचिव**–प्रा. मधुकर काळ, **सहसचिव**–श्री. भैयाजी देशमुख, **कोषाध्यक्ष**–प्रा. गोविंद कोटस्थाने, **सदस्य**–श्री. पंजाब कुडे, सौ. निर्मला दाते.

मलकापूर शाखा—

शाखेच्या सभासदांची साधारण सभा दि. २७–७–६६ रोजी घेण्यात आली. शाखा कार्यकारिणीची निवड करण्यात येऊन प्रा. सौ. विभावरी हस्तक यांची एकमताने अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. अध्यक्षांच्या सूचनेनुसार दि. १२–८–६६ रोजी सभा घेण्यात येऊन पदाधिकारी निवडण्यात आले.

अध्यक्ष—प्रा. सौ. विभावरी हस्तक; **कार्यवाह**–श्री. ह. कृ. चौधरी, **सहकार्यवाह**–श्री. ना. गो. खडसे, **कोषाध्यक्ष**–श्री. प्र. ना. चौधरी, समासदं–श्री. न. पं. टेंभुर्णे, श्री. स. ना. मेरेकर.

गोंडवन शाखा–चंद्रपूर

नवनिर्वाचित शाखाध्यक्ष श्री. अ. ज. राजूरकर यांचे अध्यक्षतेखाली दि. १४ ऑगस्ट ६६ रोजी सकाळी ८–३० वा. श्रीगणेश मुद्रणालयाचे कार्यालयात नवीन निवडून आलेल्या सभासदांची सभा घेण्यात आली. प्रारंभी पूर्वाध्यक्ष प्रा. रा. ना. घाटोळे यांना शाखेतर्फे हार अर्पण करून निरोप देण्यात आला. तसेच नवनिर्वाचित अध्यक्षांना हार अर्पण करून स्वागत करण्यात आल्यावर खालील पदाधिकारी निवडण्यात आले.

उपाध्यक्ष—सौ. सुधाताई पोटदुखे, **कोषाध्यक्ष**—श्री. छगनलाल खजानची, **सरचिटणीस**—श्री. भगवंत ठाकरे, **पदसिद्ध सदस्य**—सा. भू. तु. ना. काटकर.

सदस्य—सर्वश्री शा. गो. ऊर्फ बाळासाहेब गवालपंची, म. ह. देशपांडे, ग. ना. कुळकर्णी, शि. दे. कक्कड, भ. सो. खणके, आणि प्रा. सौ. प्रभावती मुठाळ.

या व्यतिरिक्त सांस्कृतिक समिती, नाटयसमिती, परीक्षा समिती ह्या समित्या स्थापन करण्यात आल्या.

अनुक्रमणिका

गोंदिया शाखा—

इ. स. ६६-६७ करिता पुढील प्रमाणे कार्यकारी मंडळावर पदाधिकारी निवडण्यात आले.

अध्यक्ष—श्री. महादेवराव घोटे, कार्याध्यक्ष—प्रा. द. वा. पांडे, उपाध्यक्ष— प्रा. अ. द. देशपांडे, श्री. कमलाकर कुळकर्णी; कोषाध्यक्ष-श्री. प्र. शं. तनखीवाले, कार्यवाह-प्रा. अ. आ. खंडकर, संघटन-मंत्री-प्रा. हे. ल. चाटी, सहकार्यवाह-श्री. द. वा. देव, श्री. व. हि. मातुरकर; सदस्य—सर्वश्री प्रभाकरराव क्षत्रिय, शांताराम घोटे, श्री. नानासाहेब तेलंग, वा. का. देशमुख, वा. खु. देशपांडे, भा. गो. बाळापुरे, द. कृ. चरडे, म. वा. जोशी, न. वा. पाळेकर, कृ. गो. बाकांत आणि कु. अनसूया देशमुख.

यवतमाळ शाखा—

इ. स. १९६६-६७ करिता पुढीलप्रमाणे कार्यकारी मंडळावर पदाधिकारी निवडण्यात आले.—

अध्यक्ष—श्री. ब. ना. एकबोटे, उपाध्यक्ष-सौ. मंगलाबाई श्रीखंडे, कार्यवाह-प्रा. गोविंद देशपांडे, सहकार्यवाह-श्री. सुधाकरराव तोरणे, सदस्य-सर्वश्री शरदचंद्र टोंगो, डॉ. गो. वा. पंडित, पां. श्रा. गोरे, द. बा. महाजन, वि. रा. श्रीखंडे, गं. मो. नगरकर, सौ. सुशिलाबाई पंडित.

शाखेतर्फे स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. दि. १५ ऑगस्ट रोजी सायं. ५ वा. शाखाध्यक्ष श्री. ब. ना. एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. यावेळी स्वामी विवेकानंद (सौ. आशाताई बर्वे), म. गांधी (श्री. सुधाकर तोरणे), स्वातंत्र्यवीर सावरकर (प्रा. चरेगावकर), सुभाषचंद्र (श्री. यशवंत भीष्म), पं. नेहरू (श्री. शैलेश देखमुख), लो. अणे (प्रा. गोविंद देशपांडे) आदी नेत्यांच्या लेखनातील-वक्तव्यातील स्फूर्तिप्रद उताऱ्यांचे मंत्रवत वाचन करण्यात आले.

श्री. द. बा. महाजन यांनी तात्या टोपे यांच्या दुर्मिळ परंतु महत्त्वाच्या पत्राच्या साह्याने त्यांचा विदर्भाशी आलेला संबंध स्पष्ट केला. प्राचार्य कासलीकरांनी 'शूरा मी वंदिले' आणि सौ. दंडवते यांनी 'सागरा प्राण तळमळला' ही गीते गाऊन दाखविली.

श्री. ब. ना. एकबोटे यांनी न्या. दावर यांच्या कोर्टातील लो. टिळकांचे अमर भाषण वाचून दाखविले.

यवतमाळ शाखेला, दि. १८-८-६६ रोजी प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख, श्री. खर्डेनवीस आणि श्रीमती पुष्पाबेन मेहता यांनी भेट दिली. यावेळी अध्यक्ष श्री. ब. ना. एकबोटे यांनी स्वागत केले.

यावेळी डॉ. मा. गो. देशमुख यांनी शाखेला मार्गदर्शनपर असे भाषण दिले.

श्रीमती पुष्पाबेन मेहता यांनी महिला समाजाला मार्गदर्शपर भाषण दिले.

केंद्राधिकाऱ्यांना विनंती आणि सूचना

परीक्षांच्या तारखांमध्ये बदल

संस्थेतर्फे घेण्यात येणाऱ्या (मराठी प्रवेश ते साहित्य स्नातक) सर्व परीक्षा, काही अपरिहार्य कारणांमुळे दि. २४ आणि २५ सप्टेंबर ६६ ऐवजी दि. ८ आणि ९ ऑक्टोबर ६६ रोजी घेण्यात येणार आहेत. केंद्राधिकाऱ्यांनी हा बदल लक्षात घ्यावा, अशी विनंती आहे.

दि. १० सप्टेंबर ६६ पर्यंत परीक्षार्थी आवेदनपत्रे सशुल्क भरून घेऊन केंद्रीय कार्यालयाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.

या सत्रात जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसवून सहकार्य द्यावे, ही विनंती.

दि. १ सप्टेंबर ६६
नागपूर

ग. स. देशपांडे
संचालक, परीक्षा समिती

मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १.
प्रकाशक : मा. नी. गलगलीकर, विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १.